यशवंतराव चव्हाण
महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ

(बी.ए.) मराठी पदवी शिक्षणक्रम
Vocational Skills Course (VSC)
सूत्रसंचालन आणि निवेदन कौशल्ये (2CP)
Course Code : MARV101
Book Code MARV1011

वर्ष पहिले - सत्र पहिले

पुस्तक : २

सूत्रसंचालन आणि निवेदन

लेखक : श्रीमती छाया भोंजाळ

घटक १	:	सूत्रसंचालन आणि निवेदनाचे स्वरूप व व्याप्ती	०१
घटक २	:	सूत्रसंचालन आणि निवेदनाची पूर्वतयारी	१८
घटक ३	:	सूत्रसंचालन आणि निवेदनाची भाषाशैली	३१
घटक ४	:	सरावासाठी नुमने	३९

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

संचालक : प्रा. नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा परिषद

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. जयदीप निकम
संचालक व वरिष्ठ प्राध्यापक
निरंतर शिक्षण विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. शिवाजी सरगर
संचालक
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षणकेंद्र
मुंबई विद्यापीठ, मुंबई

प्रा. प्रकाश पवार
प्रमुख, राज्यशास्त्र विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. राजेंद्र कुंभार
(सेवा निवृत्त) ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

प्रा. संजय तांबट
प्रमुख, संज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

प्रा. चेतना कामळस्कर
संचालक
विज्ञान विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. संदिप चौधरी
प्रमुख, समाजशास्त्र विभाग
सरस्वती भुवन महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

प्रा. देवेंद्र इंगळे
प्रमुख, इतिहास विभाग
मूळजी जेठा महाविद्यालय (स्वायत्त)
जळगाव

डॉ. लतिका गायकवाड
सहयोगी प्राध्यापक
वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. सुभाष सोनुने
सहायक प्राध्यापक,
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

राज्यस्तरीय शिक्षणक्रम सल्लागार समिती (मराठी)

प्रा. नागार्जुन वाडेकर (अध्यक्ष)
संचालक
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

डॉ. प्रमोद मुनघाटे
(सेवा निवृत्त), प्रमुख, मराठी विभाग
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विद्यापीठ,
नागपूर

डॉ. अरुणा दुभाषी
सहयोगी प्राध्यापक
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ
मुंबई

डॉ. वंदना महाजन
प्राध्यापक, मराठी विभाग
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. दासू वैद्य
प्रमुख, मराठी विभाग
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
छत्रपती संभाजीनगर

डॉ. तुकाराम रोंगटे
प्रमुख, मराठी विभाग
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

डॉ. सुनील रामटेके
प्रमुख, मराठी विभाग
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई

डॉ. केशव तुपे
संचालक, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था
अमरावती

डॉ. महेंद्र कदम
प्राचार्य, विठ्ठलराव शिंदे महाविद्यालय
टेंभूर्णी, सोलापूर

डॉ. महेबूब सय्यद
प्राध्यापक, मराठी विभाग
न्यू आर्टस, कॉमर्स व सायन्स महाविद्यालय,
अहिल्यानगर

डॉ. रणधीर शिंदे
प्राध्यापक, मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

डॉ. अनिल सपकाळ
प्राध्यापक, मराठी विभाग,
मुंबई विद्यापीठ, मुंबई

डॉ. नितीन रिंढे
प्रमुख, मराठी विभाग
श्रीमती कुसुमताई चौधरी महाविद्यालय
बांद्रा, मुंबई

डॉ. आनंद काटीकर
प्राध्यापक, मराठी विभाग
फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

कुलगुरू : प्रा. संजीव सोनवणे

संचालक : प्रा. नागार्जुन वाडेकर, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

लेखक

श्रीमती छाया भोंजाळ
निवृत्त वरिष्ठ उदघोषिका
आकाशवाणी मुंबई केंद्र, मुंबई

संपादक

डॉ. सुधाकर शेलार
प्रमुख, मराठी विभाग
अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर

परिशीलन समिती

प्रा. डॉ. रविंद्र नारायण ठाकूर
सेवा निवृत्त प्राध्यापक
मराठी विभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रा. डॉ. सुनिता उंब्रजकर
प्रमुख, मराठी विभाग
गोवा विद्यापीठ, गोवा

प्रा. डॉ. प्रमोद भगवान पडवळ
प्रमुख, मराठी विभाग
बनारस हिंदू विद्यापीठ
वाराणशी, (उ.प्र.)

डॉ. संजय कांबळे
सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग
राणी चेनम्मा विद्यापीठ,
बेळगाव, (कर्नाटक)

प्रा. डॉ. संजय वाघोजी जगताप
प्रमुख, मराठी विभाग
यशवंत महाविद्यालय, नांदेड

प्रा. डॉ. गुंफा कोकाटे
प्रमुख, मराठी विभाग
कला व वाणिज्य महाविद्यालय
बेलापूर, श्रीरामपूर, अहिल्यानगर

अनुदेशन संपादन व शिक्षणक्रम संयोजक

डॉ. बाळासाहेब दिघे
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

प्रा. विश्वनाथ साठे
मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाख
य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक

निर्मिती

प्रमुख, ग्रंथनिर्मिती केंद्र,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
© 2026, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

- **प्रथम प्रकाशन** : डिसेंबर, २०२६ **प्रकाशन क्र.**
- **मुखपृष्ठ रेखाटन**: श्रीमती सरिता सोनवणे
- **मुद्रितशोधक** :
- **अक्षरजुळणी** : श्री. गुलाब घाटाळ, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
- **प्रकाशक** : कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ISBN:

सूत्रसंचालन आणि निवेदनकौशल्ये (MARV101)

अभ्यासक्रम संरचना

पुस्तक १. कार्यक्रम संहितालेखन

घटक १ : कार्यक्रमांचे प्रकार आणि संहितालेखन

घटक २ : सांस्कृतिक कार्यक्रमांचे संहितालेखन

घटक ३ : चर्चाप्रधान कार्यक्रमांचे संहितालेखन

घटक ४ : आभासी कार्यक्रमांचे संहितालेखन

पुस्तक २. सूत्रसंचालन आणि निवेदन कौशल्य

घटक १ : सूत्रसंचालन आणि निवेदनाचे स्वरूप व व्याप्ती

घटक २ : सूत्रसंचालन आणि निवेदनाची पूर्वतयारी

घटक ३ : सूत्रसंचालन व निवेदनाची भाषाशैली

घटक ४ : सरावासाठी नमुने

सूत्रसंचालन आणि निवेदन (MARV1012)

अभ्यासक्रमाचे उद्दिष्टे व निष्पत्ती

उद्दिष्टे

- विद्यार्थ्यांना सूत्रसंचालन आणि निवेदनाचे स्वरूप व व्याप्ती याविषयी मूलभूत माहिती समजावून सांगणे.
- विद्यार्थ्यांना कार्यक्रमासाठी आवश्यक असलेली सूत्रसंचालन व निवेदनाची पूर्वतयारी स्पष्ट करणे.
- विद्यार्थ्यांमध्ये योग्य भाषाशैली, शब्दनिवड व सादरीकरण कौशल्ये विकसित करणे.
- विद्यार्थ्यांना विविध कार्यक्रमांसाठी सूत्रसंचालनाचे नमुने विश्लेषित करून सराव करण्यास प्रवृत्त करणे.

निष्पत्ती

- विद्यार्थी सूत्रसंचालन व निवेदनाचे स्वरूप, उद्देश आणि व्याप्ती ओळखू व स्पष्ट करू शकतील.
- विद्यार्थी कार्यक्रमासाठी सूत्रसंचालनाची योग्य पूर्वतयारी नियोजनपूर्वक करू शकतील
- विद्यार्थी योग्य भाषाशैली व प्रभावी शब्दनिवड वापरून सूत्रसंचालन करू शकतील.
- विद्यार्थी विविध कार्यक्रमांसाठी सूत्रसंचालनाचे नमुने तयार करून त्यांचे विश्लेषण व सादरीकरण करू शकतील.

पुस्तक २ : सूत्रसंचालन आणि निवेदन (MARV1012)

प्रास्ताविक

सूत्रसंचालन आणि निवेदन हे कोणत्याही कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनातील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्टपणे मांडणे, विविध घटकांना एकसंधपणे जोडणे आणि प्रेक्षकांपर्यंत कार्यक्रमाचा आशय प्रभावीपणे पोहोचवणे या दृष्टीने सूत्रसंचालनाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरते. प्रभावी सूत्रसंचालनासाठी केवळ कार्यक्रमाचे ज्ञान पुरेसे नसून त्यासाठी योग्य पूर्वतयारी, स्पष्ट व प्रभावी भाषाशैली तसेच प्रसंगानुरूप सादरीकरण कौशल्य आवश्यक असते.

या पुस्तकातील चार घटकांमध्ये सूत्रसंचालन व निवेदनाचे स्वरूप आणि व्याप्ती यांचा परिचय करून दिला आहे. तसेच कार्यक्रमापूर्वी करावयाची तयारी, विषयानुरूप भाषाशैलीचा वापर आणि प्रभावी निवेदनाची तंत्रे यांची माहितीचा समावेश केला आहे. याशिवाय विविध कार्यक्रमांसाठी उपयुक्त असलेले सूत्रसंचालनाचे नमुने दिल्यामुळे अध्ययनार्थ्यांना प्रत्यक्ष सरावाची संधी मिळते. त्यामुळे अध्ययनार्थ्यांमध्ये आत्मविश्वास वाढून ते विविध प्रसंगांसाठी योग्य पद्धतीने सूत्रसंचालन व निवेदन करू शकतील असा विश्वास वाटतो.

घटक १ : सूत्रसंचालन आणि निवेदनाचे स्वरूप व व्याप्ती

अनुक्रमणिका

१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय-विवेचन
    १.२.१ संवाद कौशल्य- सूत्र संचालन आणि निवेदन
    १.२.२ संवाद कौशल्यासाठीचे गुण
    १.२.३ संवाद कौशल्यात स्पष्टता येण्यासाठी....
    १.२.४ मुलाखतीचे तंत्र
    १.२.५ निवेदनाचे स्वरूप आणि व्याप्ती
१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ क्षेत्रीय कार्य
१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१.० उद्दिष्टे

या घटकाचे अध्ययन केल्यावर आपल्याला-

- सूत्रसंचालन आणि निवेदनाचे स्वरूप आणि व्याप्ती या विषयी माहिती मिळेल.
- सूत्रसंचालन आणि निवेदन यातील फरक कळेल.
- सूत्रसंचालन म्हणजे काय हे लक्षात येईल.
- निवेदन म्हणजे काय हे लक्षात येईल.
- संवाद कौशल्य आणि सूत्रसंचालन यातील नाते कळेल.
- मुलाखत घेण्यासाठी कोणती कौशल्ये आत्मसात करावी लागतील ते कळेल.

१.१ प्रास्ताविक

संस्कृत नाटकातील सूत्रधार ह्या संकल्पनेवरून सूत्रसंचालक ही संकल्पना आलेली असावी. सूत्रधार याचा अर्थ ज्याच्या हातात सूत्र आहेत अशी व्यक्ती. भरत नाट्यशास्त्रात नाटकाचे संचालन करणाऱ्या नटाला सूत्रधार म्हणत असत. नाटकाची सुरूवात आणि शेवट करण्याची जबाबदारी सूत्रधारावर असे. तो रंगमंचावर येऊन नाटकाची प्रस्तावना करीत असे. कठपुतळीच्या खेळातही सूत्रधार असे. भारतीय तत्त्वज्ञानात ईश्वराला संसाररुपी रंगमंचाचा सूत्रधार मानले जाते. तो सृष्टीतील सर्व व्यवहारांवर नियंत्रण

ठेवून असतो असे मानले जाते. नाट्यशास्त्रानुसार एका कुशल सूत्रधाराला नांदीपाठ, संगीत, नीतिशास्त्र आणि वेशभूषेचे ज्ञान असते. संस्कृत नाटकात नाटकाची सगळी सूत्र सूत्रधाराच्या हातात असत. सूत्रधार नाटकाच्या कथासूत्राला पुढे घेऊन जाण्याचे काम करतो तर सूत्रसंचालक एखाद्या कार्यक्रमात मंच आणि श्रोते यामधील 'सेतू' चे काम करतो.

भरतनाट्यशास्त्रात सूत्रधाराचे पुढीलप्रमाणे वर्णन केलेले आहे.

'गानस्य च वाद्यस्य च पाठ्यस्यापि एकभावविहितस्य शास्त्रोपदेशयोगात सूत्रज्ञ: सूत्रधारस्तु |' (ना. शा. ३५.३०) असे भरत म्हणतो. म्हणजे नाटकातील गायन, वादन व पाठ्य यांच्या सुसंगत एकीकरणाचे सूत्र जो जाणतो व त्याप्रमाणे नटांना आदेश करतो तो सूत्रधार होय. इतरांनीही सूत्रधाराची व्युत्पत्ती याप्रमाणेच दिली आहे. सर्व नाट्योपकरणे म्हणजे सूत्र व तो जो धारण करतो तो सूत्रधार. कवीचा अभिप्राय, संविधानकाचा रोख व नायकाचे गुण या तिहींमध्ये जो एकसूत्रता आणतो तो सूत्रधार. जो नाटकाच्या आरंभी प्रवेश करून पुढील कथासूत्र सुचवतो तो सूत्रधार.

सूत्रसंचालनाची सुरुवात कधी आणि कोणत्या परिस्थितीत झाली याची जरी आपल्याला नक्की तारीख सांगता येत नसली तरी ती व्यासपीठावरील कार्यक्रमांचे आयोजन आणि श्रोत्यांशी संवाद साधण्याच्या गरजेतून ही परंपरा विकसित झाली असावी असे म्हणता येईल. महाराष्ट्रात ती १९ व्या शतकात उदयास आली असे म्हणता येईल. सुरवातीला व्यासपीठावरील अध्यक्षच हे काम करीत असे. पण एकाहून अधिक वक्ते कार्यक्रमात बोलणार असतील तर सूत्रसंचालकाची गरज भासू लागली. कार्यक्रमांचे प्रकार वाढत गेले तसा सूत्रसंचालक आवश्यक झाला. आता तर सूत्रसंचालन हा एक वलयांकित व्यवसाय झालेला आहे. कार्यक्रमांचे स्वरूप, त्यातील विविधता, त्यांची संख्या आणि दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमांची रेलचेल यामुळे सूत्रसंचालनाला अतिशय महत्त्व प्राप्त झालेले आहे. त्यामुळे सूत्रसंचालन ही केवळ हौस किंवा छंद न राहता व्यवसाय होतोय. काही लोक पूर्णवेळ तर काही लोक नोकरी, व्यवसाय सांभाळून उत्तम प्रकारे सूत्रसंचालक म्हणूनही काम करीत आहेत. सूत्रसंचालन ही कला आहे, शास्त्र आहे आणि कौशल्यही आहे. त्यामुळे ते सरावाने आणि अभ्यासाने विकसित करता येते. सूत्रसंचालन हे वक्ता आणि श्रोता यांना जोडण्यासाठी काळानुसार विकसित झालेले आहे. सूत्रसंचालन हे पूर्वीपासूनच सभेचे कामकाज सुसूत्रपणे चालवण्यासाठी व्यासपीठावरून केले जायचे. जे आता अधिक व्यापक झाले आहे. आजच्या आधुनिक काळात श्राव्य (रेडिओ) आणि दृकश्राव्य (दूरचित्रवाणी) माध्यमावरून प्रसारित होणारे कार्यक्रम, सामाजिक आणि राजकीय मंचावरून होणारे कार्यक्रम आणि मनोरंजनाचे कार्यक्रम यासाठी सूत्रसंचालन करावे लागते. त्यामुळे सूत्रसंचालन ही महत्त्वाची गोष्ट बनलेली आहे. भारतात दूरचित्रवाणीची सुरवात १९५९ मध्ये झाली. त्या नंतर सूत्रसंचालनाला अधिक व्यावसायिक ओळख मिळाली. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार निवेदन करून कार्यक्रम पुढे नेण्याला 'सूत्रसंचालन' असे म्हणतात. सूत्रसंचालकाला कार्यक्रमातील इतर मान्यवर व्यक्तींप्रमाणेच महत्त्व असते. जर सूत्रसंचालन करणारी व्यक्ती नवखी असेल आणि त्या व्यक्तीने तयारी केलेली नसेल तर कार्यक्रमावर त्याचा परिणाम होण्याची शक्यता असते. कारण सूत्रसंचालक हा व्यासपीठ आणि श्रोते यांच्यातील दुवा असतो. सूत्रसंचालक हा कार्यक्रमातील विविध टप्पे उदा. स्वागत, परिचय, मुख्य कार्यक्रम आणि आभार यांचे सुसूत्र आयोजन करतो. हे सगळे टप्पे एका सूत्रात बांधून ते श्रोत्यांपर्यंत पोहोचवण्याचे महत्त्वाचे काम सूत्रसंचालकाला करायचे असते. सूत्रसंचालक हा कार्यक्रमाचा

आत्मा असतो. तो कार्यक्रमाची शोभा वाढवतो आणि नियोजित वेळेत कार्यक्रम पूर्ण करतो. शासकीय, सामाजिक, सांस्कृतिक, अशा विविध कार्यक्रमानुसार सूत्रसंचालनाची शैली बदलते. सूत्रसंचालन ही एक कला आहे. कारण यात भाषेचा प्रभावी वापर केला जातो आणि कल्पकता देखील उपयोगात आणावी लागते. तसेच ते एक शास्त्र देखील आहे. कारण त्यात नियोजित संहिता (Script) आणि कार्यक्रमाची पूर्वतयारी आवश्यक असते. कार्यक्रमाच्या एका भागाकडून दुसऱ्या भागाकडे जाताना कार्यक्रमाची रंजकता, उत्साह व लय टिकवून ठेवणारा दुवा म्हणजे सूत्रसंचालक.

मराठीतील प्रसिद्ध सूत्रसंचालक सुधीर गाडगीळ यांनी सूत्रसंचालकाची व्याख्या करताना एके ठिकाणी म्हटले आहे "जो कंटाळा येऊ न देता, वेळेची मर्यादा सांभाळून कार्यक्रम रटाळ न होऊ देता, कार्यक्रमाची विविधता जपत एका सूत्रात बांधतो तो खरा सूत्रसंचालक." सुधीर गाडगीळ जसे प्रसिद्ध सूत्रसंचालक आहेत तसेच ते प्रसिध्द मुलाखतकार देखील आहेत. त्यांना सूत्रसंचालन करताना अनेकेवेळी त्या कार्यक्रमातील मान्यवरांच्या मुलाखती देखील घ्याव्या लागल्या आहेत. म्हणजे सूत्रसंचालकाला मुलाखतीचे तंत्र अवगत असणे देखील आवश्यक आहे. आपण याच घटकात मुलाखती विषयी आणि निवेदनाविषयी देखील जाणून घेणार आहोत. सूत्रसंचालन आणि निवेदन यामध्ये खूप थोडा फरक आहे. सूत्रसंचालन ही संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन, मांडणी आणि गती संभाळण्याची व्यापक प्रक्रिया आहे. तर निवेदन हे त्यातील शब्दांच्याद्वारे माहिती सांगणे व भाव प्रकट करण्याचे कौशल्य आहे. सूत्रसंचालक हा कार्यक्रमाचा कणा असतो तर निवेदक हा त्यातील दुवा असतो. पण सूत्रसंचालकाला निवेदक असेच संबोधले जाते हेही आपण लक्षात घेतले पाहिजे. सूत्रसंचालन आणि निवेदन प्रभावी होण्यासाठी संवाद कौशल्य आत्मसात करणे खूप आवश्यक आहे.

१.२ विषय-विवेचन

१.२.१ संवाद कौशल्य- सूत्रसंचालन आणि निवेदन

संवाद कौशल्य म्हणजे आपले विचार, भावना आणि माहिती दुसऱ्या व्यक्तीपर्यंत स्पष्टपणे आणि प्रभावीपणे पोहोचवणे. तसेच दुसऱ्याचे म्हणणे समजून घेणे होय. यामध्ये बोलणे, ऐकणे, देहबोली यांचा समावेश होतो. हे एकदा समजले की, सूत्रसंचालन करताना त्याचा कसा उपयोग होतो हे आपल्याला समजेल.

निवेदन म्हणजे एखाद्या विषयावर, घटनेवर किंवा मतावर आधारित माहिती, विचार किंवा भावना स्पष्टपणे आणि प्रभावीपणे मांडणे. ते लिखित किंवा इतर माध्यमाद्वारे केले जाऊ शकते. ज्याचा उद्देश श्रोत्यांपर्यंत किंवा वाचकांपर्यंत निश्चित माहिती पोहोचवणे हा असतो. निवेदनामुळे माहिती प्रभावीपणे व्यक्त होते. हे मत मांडण्यासाठी किंवा माहिती पोहोचवण्यासाठीचे प्रभावी साधन आहे. बहुतेक ठिकाणी सूत्रसंचालकालाच निवेदक म्हटले जाते. कारण त्या दोन्ही संकल्पनांमध्ये फारसा फरक नाही. जो काही थोडा फरक आहे तो याच घटकात पुढे स्पष्ट केला आहे. त्यामुळे पुढील घटकातून त्या विषयी वेगळे लिहिले जाणार नाही.

संवाद कौशल्याचे मुख्य घटक याप्रमाणे आहेत.

१.२.१.१ स्पष्ट बोलणे

आपल्याला जे सांगायचे आहे ते सोप्या भाषेत, योग्य शब्दात आणि आत्मविश्वासाने मांडायला शिकले पाहिजे. कित्येकवेळा आपण पुस्तकी भाषेत किंवा आलंकारिक भाषेत बोललो म्हणजे ते प्रभावी वाटेल असे समजतो. पण ते सूत्रसंचालनासाठी उपयोगी नसते. जगामध्ये सात हजार पेक्षा जास्त भाषा बोलल्या जातात. व्यक्त होण्याच्या मध्यमानुसार हे प्रकार पडतात. १) नैसर्गिक / मौखिक भाषा (बोलून व्यक्त होणारी), २) सांकेतिक/ लिखित भाषा. (हावभाव-मूकबधीरांची भाषा/ लिहून व्यक्त होणारी भाषा) भाषेनुसार शब्दांचे अर्थ बदलतात. मराठी साहित्यात अनेकवेळा वेगवेगळ्या प्रकारचे शब्द आपल्याला वाचायला मिळतात. असे शब्द जेंव्हा आपण बोलतो तेंव्हा त्यामधून कधी कधी दोन अर्थ निघतात. तसेच भाषेतील विरामचिन्हांच्या वापराबद्दलही म्हणता येईल. उदा. एका वाक्यात ठरावीक ठिकाणी स्वल्प विरामचिन्हे लिहिले नाही तर गोंधळ उडतो. अनेक कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी 'इथे थुंकू नये' असे लिहिलेले असते. हेच वाक्य 'येथे थुंकून ये' असा फक्त लिहिण्यात / वाचण्यात फरक झाला तर अर्थ पूर्ण बदलतो. म्हणून सूत्रसंचालनाची संहिता लिहिताना शब्द आणि विरामचिन्ह यांचाही योग्य वापर करावा.

भाषेनुसार शब्दांचे अर्थ बदलतात असे आपण वर पाहिलेच आहे. आता काही द्विअर्थी शब्दांची माहिती घेऊयात. असे शब्द भाषेमध्ये वैविध्य आणि खोली आणतात. बऱ्याचदा एका शब्दाचे दोन अर्थ होतात. तेही परस्परविरोधी असतात. संदर्भाप्रमाणे त्यांचा अर्थ बदलतो. उदा.

शब्द	अर्थ १	अर्थ २
१) मान	नाव /गळा	आदर
२) वार	दिवसाचे नाव (सोमवार)	प्रहार
३) हार	पराजय	फुलांचा हार
४) नाव	होडी	व्यक्तीचे नाव

हिंदी आणि मराठीतील भाषेनुसार विरुद्ध अर्थ असलेले काही शब्द

हिंदी शब्द /अर्थ	मराठी शब्द /अर्थ
१) फल –नतीजा	झाडाचे फळ
२) कल –आनेवाला दिन / बिता हुआ दिन	उद्या
३) कर –हाथ	कर (टॅक्स)/शुल्क

१.२.१.२ उच्चार शास्त्र

स्पष्ट बोलण्यात उच्चारांना खूप महत्व आहे ते कसे ते आता आपण पाहुयात.

उच्चारशास्त्रात भाषेतील ध्वनी, त्यांचे निर्मितीस्थान आणि उच्चारपद्धतीचा अभ्यास केला जातो. मराठी भाषेत ६२ वर्णांची वर्णमाला देवनागरी लिपीत लिहिली जाते. कंण्ठ्य, तालव्य, दंतव्य, ओष्ठ्व्य, आणि मुर्धन्य या सारख्या विविध अवयवांच्या सहाय्याने हे वर्ण उच्चारले जातात.

१) कंठ्य : याचे उच्चारण करताना घसा आणि ओठ या दोन्हींचा उपयोग केला जातो. उदा. ओ, औ.

२) तालव्य : याचे उच्चारण करताना टाळूचा वापर केला जातो. उदा. इ, ई, च, छ, ज, झ, य.श.

३) दंतव्य : या व्यंजनांचा उच्चार करताना दात आणि ओठ यांचा उपयोग केला जातो. उदा, त, थ, द, ध, न, ल, स.

४) ओष्ठ्व्य : ज्यांचा उच्चार करताना दोन्ही ओठांचा उपयोग केला जातो. उदा.उ, ऊ, प, फ, ब, भ, म.

स्पष्ट शब्दोच्चारासाठी अक्षरांचे अचूक ज्ञान, घसा आणि जिभेच्या हालचालींवर नियंत्रण, तसेच वाचनाचा नियमित सराव आवश्यक आहे. 'ळ', 'ण', 'श', 'ष', 'स' या सारख्या वर्णांचे शुध्द उच्चारण, स्वरांचे योग्य दीर्घ ऱ्हस्वत्व आणि शब्दांवर योग्य आघात देणे या मुळे संवाद प्रभावी होतो.

उदा. 'ळ' (डाळ), 'ण' (गणपती), 'श' (शाळा) 'ष' (भाषा), 'स'(ससा). यातील फरक समजून घेऊन उच्चार करावा.

दीर्घ आणि ऱ्हस्वत्व शब्दांची काही उदाहरणे,

उदा: उदासीन, माननीय, म्हणी, दीन (गरीब)

सामाजिक, गलिच्छ, दिन (दिवस)

दोन किंवा अधिक व्यंजने एकत्र येऊन शेवटी एक स्वर मिसळून जोडाक्षरे तयार होतात. त्यांचे उच्चार स्पष्ट करावेत. उदा: स्वच्छ, आश्चर्य, प्रयत्न, विद्या.

जोडाक्षरांचा अचूक सराव केल्याने भाषा अधिक स्पष्ट आणि प्रवाही होते. शब्दांचा चुकीचा उच्चार टाळण्यासाठी योग्य उच्चार ऐकणे आणि समजून घेणे आवश्यक आहे. सूत्रसंचालन करताना संस्थेची, व्यक्तींची नावे बरोबर उच्चारावीत कारण नावे ही ओळखीचे प्रतिबिंब असतात, तसेच त्यांचा अनेकदा वैयक्तिक अर्थही असतो. नावांचा सतत चुकीचा उच्चार एखाद्याची ओळख कमी करू शकतो. म्हणून या संदर्भात जागृत राहणे आवश्यक आहे.

१.२.१.३ सक्रीय ऐकणे

फक्त ऐकणे पुरेसे नसते तर समोरच्या व्यक्तीचे बोलणे लक्षपूर्वक समजून घेणे, त्याला योग्य प्रतिसाद देणे आवश्यक असते. हा संवादकौशल्यातील महत्वाचा घटक आहे. त्याचा उपयोग सूत्रसंचालन करताना होतो. एखाद्या कार्यक्रमात सहभागी व्यक्ती काहीतरी महत्त्वाचे विधान करते. ते सूत्रसंचालकाला माहिती नसते. त्यामुळे त्याने लक्षपूर्वक ऐकले आणि त्याला आपल्या वक्तव्यात योग्य प्रतिसाद दिला तर त्याला प्रेक्षकांकडून योग्य प्रतिसाद मिळतो. त्यामुळे संवादकौशल्यातील हा घटक सूत्रसंचालकासाठी अत्यंत महत्वाचा आहे.

अ) सक्रिय ऐकण्याचे तंत्र

- ऐकताना थोडे थांबून विचार करा. (पॉज) लगेच उत्तर न देता, थोडावेळ थांबून पूर्ण विचार ऐका

- अधिक माहितीसाठी किंवा स्पष्टीकरणासाठी प्रश्न विचारा.
- समोरच्या व्यक्तीच्या मतांबद्दल पूर्वग्रह न ठेवता ऐका.

या सर्व तंत्राचा वापर करून आयोजकांकडून कार्यक्रमाची सविस्तर माहिती घेतली तर मनात शंका राहणार नाही. तसेच मंचावर प्रत्यक्ष कार्यक्रमात वक्ते, गायक, कलाकार इत्यादी काय म्हणताहेत हेही समजण्यास मदत होईल. त्यानुसार निवेदनात काही मुद्दे समाविष्ट करता येतील

आ) सक्रिय ऐकण्याचे फायदे

- सक्रिय ऐकण्याने गैरसमज टाळता येतात.
- समोरच्याला आदर मिळाल्याची भावना निर्माण होते आणि विश्वास वाढतो.
- कामाच्या ठिकाणी परस्परातील संवाद सुधारतो.
- वक्ता काय म्हणू इच्छितो आहे हे समजण्यास मदत होते.
- माहिती नीट लक्षात राहते.

१.२.१.४ देहबोली

भाषेचा वापर न करताही आपण आपल्या देहातून दुसऱ्यांना कितीतरी सांगत असतो. दुसरी माणसेही त्यांच्या देहाच्या हालचालीतून आपल्याला काही सांगत असतात. याचा अर्थ डोळ्यांचे हावभाव, आणि चेहऱ्यावरील भाव वाचण्याचा सराव करणे. सूत्रसंचालन करणाऱ्या व्यक्तीला प्रमुख पाहुण्याची किंवा अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीची देहबोली समजून घेता आली पाहिजे. केवळ आपण कागदावर आधी तयार केलेले वाचून कार्यक्रम पुढे नेता येणार नाही. त्याला मंचावर ऐनवेळी काय घडते आहे, मुख्य संयोजक तुम्हाला नजेरेने काही बदल सुचवतो आहे का हेही समजून घ्यावे लागते. देहबोली (Body Language) म्हणजे शब्दांशिवाय शरीराच्या हालचाली, हावभाव, मुद्रेद्वारे व्यक्त होणारा अमौखिक संवाद (Non verbal communication). हा आपल्या मनातील विचार, भावना, आणि आत्मविश्वास दर्शविणारा आरसा आहे. यात डोळे, हात-पाय, चेहऱ्यावरील भाव आणि शरीराची उठण्या-बसण्याची, उभे राहण्याची पद्धत (postures) या द्वारे संवाद साधला जातो.

देहबोलीचे मुख्य प्रकार आणि संकेत :

१) चेहऱ्यावरील हावभाव : आनंद, दु:ख, भीती, राग हे भाव चेहऱ्यावर स्पष्ट दिसतात .

२) डोळ्यांचा संपर्क (Eye contact) आत्मविश्वास असलेली व्यक्ती सरळ डोळ्यात बघून बोलते. नजर चोरणे, अस्वस्थता, किंवा असुरक्षितता दर्शविते.

३) हातांची हालचाल : बोलताना हातांचा नैसर्गिक वापर खरेपणा दर्शवतो. तर हात बांधणे, हातांची घडी घालणे हे संरक्षणात्मक किंवा संभाषणात रस नसल्याचे लक्षण आहे.

४) शरीराची मुद्रा (posture) ताठ बसणे किंवा उभे राहणे आत्मविश्वास दर्शवते. तर खांदे पाडून बसणे नैराश्य किंवा थकवा सुचवते.

५) स्मित हास्य (smile) खरे स्मितहास्य समोरच्या व्यक्तीशी जुळवून घेण्यात मदत करते.

६) सामाजिक संवादात सकारात्मक देहबोली (झुकून ऐकणे, मान डोलवणे) समोरच्या व्यक्तीला महत्त्व दिल्याचे जाणवते.

थोडक्यात संवादकौशल्य म्हणजे महितीची देवाणघेवाण प्रभावी करण्याची कला आहे, जी सरावाने विकसित करता येते. आपणास कुठल्याही क्षेत्रात यशस्वी व्हायचे असेल तर, त्या क्षेत्रात आपली ओळख निर्माण करायची असेल तर उत्तम संवादकौशल्य अंगी बाणवणे आवश्यक असते. त्याचा सूत्रसंचालन करताना उपयोग होतो.

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) सूत्रसंचालन करणाऱ्या व्यक्तीला प्रमुख पाहुण्याची किंवा अत्यंत महत्त्वाच्या व्यक्तीची --------- समजून घेता आली पाहिजे.

२) देहबोली म्हणजे शब्दांशिवाय शरीराच्या हालचाली, हावभाव, मुद्रेद्वारे व्यक्त होणारा ----------.

१.२.२ संवाद कौशल्यासाठीचे गुण

१) उत्तम वाचन : उत्तम संवादकौशल्य साधण्यासाठी आपणास भरपूर वाचन करावे लागेल. वाचनामुळे आपल्या विचारात समृद्धी येते आणि आपल्या शब्दसाठ्यात देखील वाढ होते. आपण प्रगल्भ होतो. त्यामुळे आपला आत्मविश्वास देखील वाढतो. आपल्या व्यक्तिमत्त्वातील कमतरता भरून काढण्यास मदत होते. वाचन म्हणजे केवळ शब्द वाचणे नसून माहिती आत्मसात करणे होय. म्हणून समजून वाचनावर भर दिला पाहिजे. वाचनाचे काही मुख्य प्रकार असे आहेत. प्रकट वाचन (मोठ्याने वाचणे), मूक वाचन (मनातल्या मनात वाचणे), सखोल वाचन, मनन, विस्तृत वाचन, निरीक्षणात्मक आणि झपाट्याने वाचन असे उपप्रकार आहेत. जे उद्देशानुसार वापरले जातात.

२) ऐकण्याची सवय : संवादकौशल्यात ऐकण्याची सवय लावून घेणे खूप महत्त्वाचे ठरते. काही जणांना केवळ बोलत राहण्याची सवय असते. पुढचा काय म्हणतो आहे हे तो ऐकतच नाही.त्यामुळे त्या व्यक्तीला चांगला संवाद साधता येत नाही. त्याचा संवाद हा एकतर्फी होतो. सूत्र संचालन करताना तर ही सवय घातक ठरण्याची शक्यता आहे. सूत्रसंचालकाला सजग राहावे लागते. तरच मंचावरील व्यवहार सुरळीत चालण्याची शक्यता आहे.

३) भावना आणि विचारात स्पष्टता : संवादकौशल्यात हा गुण खूप महत्त्वाचा ठरतो. तुमच्या मनात गोंधळ असेल तर तुमच्या बोलण्यात त्याचे प्रतिबिंब पडल्याशिवाय रहाणार नाही. हाच गुण सूत्रसंचालन करताना महत्त्वाचा ठरतो. आपण ज्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत आहोत त्याबद्दल आपल्याला सर्व माहिती असणे आवश्यक असते. गोंधळलेल्या मन:स्थितीमध्ये जर आपण संचालन करायला उभे राहिलो तर तो कार्यक्रम यशस्वी होणार नाही.

४) डोळ्यात डोळे घालून बोलणे : संवादकौशल्यात हा गुण विशेष महत्त्वाचा ठरतो. आपण समोरच्या व्यक्तीकडे बघून बोलले पाहिजे. तसेच चेहरा नेहमी हसरा ठेवायला शिकले पाहिजे. हा गुण जर तुम्ही अंगी बाणवलात तर तुमचे व्यक्तिमत्त्व आणि संवादकौशल्य अधिक विकसित करू शकता. हाच गुण

सूत्रसंचालन करताना उपयोगी पडतो. तुम्ही कागदात बघून वाचत राहिलात आणि प्रेक्षकांकडे बघितलेच नाहीत तर श्रोते आणि तुम्ही यात संवादच प्रस्थापित होणार नाही. आणि तो कार्यक्रम यशस्वी होणार नाही.

५) बोलण्यापूर्वी विचार आणि योग्य शब्दांची निवड : हा गुण देखील संवादकौशल्य विकसित करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. तोच गुण सूत्रसंचालन करताना उपयोगी ठरतो.

६) सराव : वरील सर्व गोष्टींचा सराव करणे आवश्यक असते. आता हा सराव कसा करणार असा प्रश्न तुमच्या मनात उभा राहिला असेल. तर याची सुरूवात आपण घरापासून करू शकतो. आपल्या असे लक्षात येईल की, आपण घराच्यांशी देखील नीट संवाद साधू शकत नाही. मित्रांशी संवाद साधू शकत नाही. तर सुरूवातीला आपण घराच्यांशी आणि मित्रांशी विविध विषयावर चर्चा करायची सवय लावून घेतली पाहिजे. त्यामुळे आपली बोलण्यातील भीड चेपेल आणि आपण आपल्या मनातील विचार व्यवस्थित मांडू शकू. मग लोकांशी संवाद साधण्याचा सराव करा. यातून आपले संवादकौशल्य विकसित होईल आणि त्याचा आपल्याला सूत्रसंचालन करण्यासाठी उपयोग होईल.

७) निरीक्षण करणे : संवादकौशल्य विकसित करताना निरीक्षण करणे खूप आवश्यक असते. त्याचा उपयोग आपल्याला सूत्रसंचालन आणि निवेदन करताना होतो. ध्वनिवर्धकाच्या (माईकच्या) वापराचा सराव करणे आवश्यक आहे. त्यामुळे सूत्रसंचालकाला आवाजाचे नियंत्रण आणि प्रभाव साधता येतो.

अशा प्रकारे आपण संवादकौशल्य विकसित केल्यास उत्तम सूत्रसंचालन आणि निवेदन करणे शक्य होते.

१.२.३ संवादकौशल्यात स्पष्टता येण्यासाठी

आपण जेव्हा संवादकौशल्य विकसित करायचे आहे असे म्हणतो आहोत तेव्हा ते आपण कोणत्या भाषेत करीत आहोत हे महत्वाचे नाही तर त्याचा संबंध आपण कुणाशी बोलतो आहोत या गोष्टीशी आहे. ते बोलणे किती स्पष्ट आहे हेही महत्वाचे आहे. यासाठी आवाजाचा प्रभावी वापर करायला हवा.

१) योग्य पवित्रा : (posture) सरळ उभे राहून किंवा बसून बोला, यामुळे श्वासोच्छवास सुलभ होतो आणि आवाज स्पष्ट निघतो.

२) ओरडू नका, प्रोजेक्ट करा : आवाज मोठा करण्यासाठी घशावर ताण देऊ नका.

३) आवाज सुसंगत ठेवा : हळू बोलण्याऐवजी शांत आणि स्थिर आवाजात बोलण्याचा प्रयत्न करा .

जर आपल्या संवादात स्पष्टता असेल तर पुढे काय? (व्हॉट नेक्स्ट?) आणि आता काय करायचे आहे? (नाऊ व्हॉट?) या प्रश्नांची उत्तरे आपोआप मिळतात.

संवाद साधताना पाच 'डब्ल्यू' (W) आणि एक 'एच' (H) महत्वाची भूमिका बजावतात. सूत्रसंचालन करताना हे सहा मुद्दे जर स्पष्ट असतील तर तो कार्यक्रम यशस्वी व्हायला मदतच होते.

१) व्हॉट? : संवाद साधताना तो प्रस्थापित होणे खूप महत्त्वाचे असते. तो कसा प्रस्थापित करता येतो हे आपण पुढील घटकातून जाणून घेणार आहोतच. आपण कोणत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहोत? त्यात कोणत्या अडचणी येऊ शकतात हे आधीच जाणून घेणे महत्वाचे असते.

२) व्हाय?: हा विचार करताना नेमकी अडचण काय आहे त्यावर गोष्टींची प्राथमिकता ठरते. म्हणजे अमुक एक मुद्दा महत्त्वाचे आहे का आणि जर वेळेवर त्याकडे लक्ष दिले नाहीतर काय होऊ शकते याचे उत्तर 'व्हाय' मधून मिळते.

३) व्हेन? : संवाद साधताना वेळ फार महत्त्वाची असते. एखादा कार्यक्रम कधी होणार हे लक्षात घेणे महत्त्वाचे असते. त्याप्रमाणे तयारी सुरु करावी लागते. ऐनवेळी मारून नेण्याची प्रवृत्ती घातक ठरू शकते.

४) व्हेअर? आपण ज्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणार आहोत तो कार्यक्रम कुठे होणार आहे, हे माहिती करून घेतले पाहिजे. एकदा ठिकाण कळले की, सूत्रसंचालनाच्या सुरूवातीला स्थान माहात्म्य ओळखून तसा उल्लेख आपल्या बोलण्यात आलाच पाहिजे. त्या परिसरातील महान व्यक्ती, ठिकाणे, देवस्थाने यांचा उल्लेख करून त्यांना वंदन करून मगच पुढील कार्यक्रमाकडे वळणे आवश्यक ठरते. म्हणून 'व्हेअर' हा प्रश्न महत्त्वाचे आहे.

५) हू ? : त्या कार्यक्रमाची नेमकी जबाबदारी कुणाची आहे हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे असते. ऐन वेळी कुणीही येऊन काही बदल सुचवतो, एखादी उद्घोषणा करायला सांगतो, त्यानुसार बदल करणे चुकीचे ठरू शकते. त्यामुळे सुचना कुणाकडून घ्यायच्या ते ठरवले गेले पाहिजे.

६) हाऊ ? : शेवटचा आणि महत्त्वाचा मुद्दा म्हणजे हे सगळे कसे पार पडणार आहे? त्यासाठी कोणत्या गोष्टींची तयारी करावी लागेल? आपल्याला कोण मदत करणार आहे? हे ठरवून घ्यायला हवे.

आता हीच गोष्ट सोपी करून सांगायची झाली तर अशी सांगता येईल 'व्हॉट?' मध्ये कार्यक्रम काय आहे? त्याचे स्वरूप काय आहे? 'व्हेन?' मध्ये तो कधी करायचा आहे? 'व्हेअर' मध्ये तो कुठे होणार आहे? 'हू' मध्ये ती करणारी संस्था किंवा व्यक्ती कोण आहे? आणि त्यासाठी कशाकशाची आवश्यकता आहे ते 'हाऊ?' या प्रश्नातून समजून घ्यायचे असते. हे एकदा नक्की झाले की, आपण आत्मविश्वासाने सूत्रसंचालन करू शकतो.

१.२.४ मुलाखतीचे तंत्र : सूत्रसंचालक-निवेदकाला बऱ्याचदा उपस्थित कलाकार, साहित्यिक, वक्ते, पुरस्कारप्राप्त व्यक्ती, खेळाडू, डॉक्टर, समाजसेवक, कवी, अभिनेता-अभिनेत्री, दिग्दर्शक अशा विविध क्षेत्रातील व्यक्तींच्या मुलाखती घेण्याची संधी मिळू शकते. मुलाखत म्हणजे एक प्रकारचा संवाद. मात्र हा संवाद हेतुपूर्वक घडवून आणला जातो. मुलाखत घेणारा, मुलाखत देणारा, मुलाखत ऐकणारा, पाहणारा, वाचणारा या सगळ्यांच्या सहभागातून मुलाखत पार पडते. एका वेळी एक व्यक्ती दुसऱ्या एका व्यक्तीची मुलाखत घेऊ शकते, तसेच एक व्यक्ती एका वेळी अनेक व्यक्तींचीही मुलाखत घेऊ शकते. मुलाखत लिखित, मौखिक, ध्वनिमुद्रित, किंवा प्रकट मुलाखत अशा विविध स्वरूपाची असते. मुलाखती विचार प्रवर्तक, भावनाप्रधानही असतात. श्रोत्यांचे कुतुहल शमवणाऱ्या, एखाद्या विषयाच्या सर्व बाजू स्पष्ट करणाऱ्या, अनुभवकथन करणाऱ्या, वाङ्मयीन सौंदर्य उलगडून दाखवणाऱ्या, पुढील पिढ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या अशा कितीतरी वेगवेगळ्या स्वरूपाच्या मुलाखती असतात. मुलाखत म्हणजे काय? ती कशी घ्यावी? त्यासाठी काय तयारी करावी? मुलाखत यशस्वी होण्यासाठी काय केले पाहिजे? वगैरे मुद्यांविषयी आपण आता जाणून घेऊयात.

१) मुलाखत म्हणजे काय ?

मुलाखत घेणे ही सुद्धा एक कला आहे. मुलाखत म्हणजे दोन किंवा अधिक व्यक्तींमध्ये एखाद्या विशिष्ट विषयावर, नियोजित हेतूने केलेला वैचारिक आणि प्रश्नोत्तररुपी संवाद असतो. यामध्ये मुलाखतकार (मुलाखत घेणारा) समोरच्या व्यक्तीचे विचार, अनुभव, व्यक्तिमत्त्व आणि कार्यक्षेत्रातील माहिती जाणून घेतो. मुलाखत हे त्या व्यक्तीचे जीवन आणि कर्तृत्व जाणून घेण्याचे एक प्रभावी माध्यम आहे. मुलाखत घेण्यासाठी पूर्वतयारी, सुसंवाद, आणि आत्मविश्वासाची गरज असते. मुलाखतीची उद्दिष्टे ठरविणे, व्यक्तीची पार्श्वभूमी समजून घेणे, विषयानुसार थेट प्रश्न विचारणे आणि संवाद साधत समोरच्याला बोलते करणे आवश्यक असते. हे करताना प्रामाणिकपणा, निष्पक्षता आणि सौजन्य राखून संवाद रंजक आणि माहितीपूर्ण बनवावा लागतो.

२) मुलाखत कशी घ्यावी अर्थात मुलाखतीची प्रक्रिया

अ) पूर्वतयारी : ज्या व्यक्तीची मुलाखत घ्यावयाची त्या व्यक्तीविषयी माहिती मिळवली पाहिजे. मुलाखतीचा उद्देश आणि विषय स्पष्ट केला पाहिजे.

ब) प्रश्नावली तयार करणे : थेट आणि स्पष्ट प्रश्न तयार करावेत. प्रश्न साधे आणि सोपे तसेच मुलाखत देणाऱ्याला बोलते करणारे असावेत.

क) स्वागत आणि सुरूवात : मुलाखत देणाऱ्याचे प्रथम स्वागत करावे. आणि संवादाची सुरूवात हलकी फुलकी करावी.

ड) सुसंवाद आणि कौशल्य : विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे स्पष्ट आणि लक्षपूर्वक ऐकावीत, त्यामुळे विषयासंबंधीचे काही उपप्रश्नही विचारता येऊ शकतात.

इ) संयमित भूमिका : मुलाखतकार म्हणून भूमिका बजावताना मुलाखत देणाऱ्याच्या मतांवर स्वतःची मतं, विचार लादू नये. त्यांना बोलण्याची स्वातंत्र्य द्यावे.

ई) समापन : मुलाखत योग्यवेळी संपवावी. मुलाखत देणाऱ्याला धन्यवाद द्यावेत आणि शेवटी संवादाचे सकारात्मक निष्कर्ष काढावेत.

३) मुलाखत यशस्वी होण्यासाठी

अलीकडच्या काळात व्याख्यानाऐवजी मुलाखतीच्या माध्यमातून व्यक्तीचे विचार ऐकण्याला रसिकांची पसंती मिळू लागलेली आहे. मुलाखत क्षेत्रालाही प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. मुलाखतीच्या यशस्वीतेसाठी मुलाखतीचा आरंभ, मध्य आणि समारोप असे तीन टप्पे आखावे लागतात. हे टप्पे रसिकांना प्रत्यक्ष न जाणवू देता सहजपणे एका टप्प्यातून दुसऱ्याकडे जावे लागते. हे मुलाखतकाराच्या संभाषण कौशल्यावर अवलंबून असते. यासाठी खालील सूचना लक्षात घ्याव्यात.

मुलाखतीची सुरूवात आकर्षक असावी. ज्यामुळे सुरूवातीपासूनच श्रोते गुंतलेले राहतील. प्रश्नांची निवड करताना उपस्थित श्रोतृवर्ग लक्षात घ्यावा. मुळ विषय सोडून असंबद्ध प्रश्न टाळवेत. तणाव किंवा संघर्ष निर्माण होईल असे मुद्दे उपस्थित करू नयेत. मुलाखत प्रभावी होईल अशा पद्धतीने संवाद साधावा.

विचारायच्या प्रश्नांची यादी समोर असतेच. त्यांचा क्रमही ठरवलेला असतो. परंतु उत्तरे काय मिळतील याची खात्री नसते. म्हणून प्रश्नात लवचिकता असावी. मिळालेल्या उत्तराचा धागा पकडून पुढचा प्रश्न तयार करता आला पाहिजे. हे कौशल्य आहे, पण सरावाने ते जमू शकते. मात्र हे करताना मुलाखतीचा हेतू विसरता कामा नये.

मुलाखत नमुना

विद्यार्थी मित्रांनो, सोबत दिलेली मुलाखत जरी आकाशवाणीवरून प्रसारित झालेली असली तरी त्यात आपण वर शिकलेले सर्व घटक समाविष्ट आहेत. म्हणून ही मुलाखत तुम्ही नीट अभ्यासावी असे मी तुम्हाला सांगेन. यावरून जर एखाद्या कार्यक्रमात तुम्हाला मुलाखत घ्यायची वेळ आली तर ती कशी घ्यावी याचा अंदाज येईल.

११ मे १९९८ या दिवशी राजस्थानात पोखरण येथे भारताने अणुस्फोट केले, या संबंधी आकाशवाणी पुणे केंद्रावरून दुसऱ्याच दिवशी म्हणजे १२ मे रोजी सकाळी ७.४५ ला निवृत्त लष्करी अधिकारी आणि संरक्षण विषयातील एक तज्ज्ञ कर्नल डॉ. अनिल आठल्ये यांची मुलाखत प्रसारित करण्यात आली. ही मुलाखत भालचंद्र जोशी यांनी घेतली होती. एखाद्या महत्त्वाच्या घटनेसंबंधी प्रासंगिक मुलाखत कशी असावी त्याचा नमुना म्हणून या मुलाखतीचा अभ्यास करता येईल. या संहितेत प्रश्नकर्त्याचे अधून मधून काढलेले "अस्सं, खरं आहे, हो ना," इत्यादी उदगार काढलेले आहेत.

भालचंद्र जोशी : श्रोते हो, काल आपल्या देशात एक फार महत्त्वाची, अगदी ऐतिहासिक घटना घडली. राजस्थानमध्ये पोखरण इथं आपल्या सरकारनं तीन अणुस्फोट केले. या स्फोटाचे पडसाद अक्षरश: आणि लाक्षणिक अर्थानंही सर्व जगभर उमटणं स्वाभाविक आहे. आपल्या शत्रूंना भारतीय लष्करी सामर्थ्याचा खणखणीत इशारा देणारी आणि सर्व भारतीयांच्या मनात अभिमानाचा हुंकार उमटवणारी ही विलक्षण घटना आहे. या अणुस्फोटांसंबंधी आज आपण कर्नल अनिल आठल्ये यांचे विचार जाणून घेणार आहोत. या विषयावर बोलायचा कर्नल साहेबांचा दुहेरी अधिकार आहे. एक म्हणजे ते स्वतः अनुभवी लष्करी अधिकारी आहेत. १९६८ साली त्यांनी लष्करात ऑफिसर म्हणून प्रवेश केला आणि वेगवेगळ्या जबाबदऱ्या पार पाडल्या. १९९० साली कर्नल म्हणून त्यांनी लष्करातून स्वेच्छानिवृत्ती घेतली. १९७१ च्या बांगलादेश युद्धात त्यांनी पश्चिम आघाडीवर भाग घेतला होता.

या शिवाय कर्नल आठल्ये हे त्यांच्या युद्धशास्त्राच्या अभ्यासाकरिताही प्रसिद्ध आहेत. त्यांनी 'प्रादेशिक सुरक्षितता' या विषयावर पुणे विद्यापीठातून पीएच.डी. ही पदवी मिळवलेली आहे. भारत-चीन युद्ध, अरब-इस्त्रायल युद्ध, काश्मीरचा प्रश्न, इत्यादीविषयी त्यांनी ग्रंथ लिहिले आहेत. लोकसत्ता, संडे ऑब्झर्व्हर, या सारख्या दैनिकातून त्यांनी स्तंभ लेखन केलं आहे. १९९३ साली ब्रिटन सरकारच्या निमंत्रणावरून ते उत्तर आयर्लंडच्या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी तिकडे गेले होते. १९९५ साली आपल्याच केंद्र सरकारनं त्यांना श्रीलंकेत वांशिक समस्येचा अभ्यास करण्यासाठी श्रीलंकेला पाठवलं होतं. अशा रितीनं सेनापती आणि वाचस्पती अशा दुहेरी अधिकारातून ते अणुस्फोटांविषयी बोलायला अगदी समर्थ, पात्र असे जाणकार आहेत.

नमस्कार कर्नल साहेब.

कर्नल आठल्ये : नमस्कार.

भालचंद्र जोशी : काल पोखरणमधल्या अणुस्फोटांची बातमी ऐकल्यावर तुमची अगदी पहिली, उत्स्फुर्त प्रतिक्रिया काय झाली?

कर्नल आठल्ये : मला अर्थातच आनंद झाला आणि अभिमान वाटला. हे शक्तिशाली अणुस्फोट आपल्या देशानं केले त्यामुळे मी भारतीय आहे याचा मला अभिमान वाटला आणि एव्हढी महत्वपूर्ण घटना पहायला मी जिवंत आहे याचा अभिमान वाटला. भारताच्या आणि संपूर्ण जगाच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही घटना आहे. आपल्या देशाचा आजवरचा इतिहास पाहिला तर युद्ध तंत्रज्ञानात आपण कायम मागासलेले राहिलो आणि त्याची जबरदस्त किंमत आपल्याला वर्षानुवर्षे गुलामगिरीच्या रुपानं द्यावी लागली. अगदी १५२६ साली बाबरनं भारतावर हल्ला करून तोफांचा वापर केला, तेव्हा आपल्याकडे तोफा नव्हत्या, त्यामुळे आपण हरलो. अगदी अलीकडे १९६२ साली चिनी आक्रमणाच्या वेळी चिनी सैनिकांकडे स्वयंचलित बंदुका होत्या तर आपल्या सैनिकांकडे पहिल्या महायुद्धाच्या काळातल्या ३०३ जातीच्या बंदुका! याही वेळी आपण मार खाल्ला. कालच्या अण्वस्त्र चाचण्यांमुळे मात्र भारताच्या पाच हजार वर्षाच्या इतिहासात प्रथमच आपला देश एवढा शक्तिसंपन्न झाला आहे की, आता आपल्याकडे वाकड्या नजरेनं बघण्याची कोणाचीही हिंमत होणार नाही.

भालचंद्र जोशी : खरं आहे. बरं कर्नल साहेब काल करण्यात आलेल्या अणुस्फोटांविषयी आपण थोडी स्तरीय माहिती देऊ शकाल का?

कर्नल आठल्ये : कालच्या अणुस्फोटांचं वैशिष्ट्य म्हणजे ते हायड्रोजन बॉम्बचे स्फोट होते. हायड्रोजन बॉम्ब हा संहारक अस्त्रांमधला अगदी निर्णायक प्रकार समजला जातो. ते जणू ब्रम्हास्त्रच आहे म्हणा ना. या बॉम्बच्या क्षमतेला कोणतीच मर्यादा नाही. अणुबॉम्ब आपण जास्तीत जास्त एक टन क्षमतेचा बनवू शकतो; पण हायड्रोजन बॉम्ब कितीही क्षमतेचा बनिविता येतो. १९६१ साली रशियानं सैबेरियात ६ टन क्षमतेच्या हायड्रोजन बॉम्बची चाचणी केली होती. त्यावेळी जगात अनेक ठिकाणी दूरपर्यंत भूकंपासारखे धक्के जाणवले होते.

भालचंद्र जोशी : १९७४ साली इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या तेव्हा आपण प्रथम अणुस्फोटाची यशस्वी चाचणी केली होती.त्या स्फोटात आणि कालच्या स्फोटात काय फरक आहे?

कर्नल आठल्ये : १९७४ साली आपण साध्या अणुस्फोटाची चाचणी केली होती. हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अमेरिकेने टाकलेले अणुबॉम्ब त्या क्षमतेचे होते. पण कालचे स्फोट हे हायड्रोजन बॉम्बचे स्फोट आहेत. त्यांचे सामर्थ्य आणि आवाका अणुबाँबच्या तुलनेत शेकडो-हजारो पटींनी जास्त आहे.

भालचंद्र जोशी : कालच्या अणुचाचण्यांचं आणखी काही वैशिष्ट्य सांगता येईल का?

कर्नल आठल्ये : हो, हे वैशिष्ट्य असं की, भारताकडे अणुचाचण्यांची क्षमता आहे हे सर्व जगाला ठाऊक होते, अगदी हायड्रोजन बॉम्बची चाचणी आपण घेऊ शकतो हेही सर्वांना माहिती होतं. त्यामुळेच अमेरिकेचा उपग्रह भारताच्या टेहेळणीवर आला होता, त्यांची या प्रकारची कडक पाळत असूनही त्याला गुंगारा देऊन आपण अणुस्फोट केले हे आपलं मोठं यश आहे. अणुस्फोटाची चाचणी ही काही साधी बाब नाही. त्यात

शेकडो-हजारो लोकांचा संबंध येतो. पण एवढा व्यापक खटाटोप करूनही कोणत्याही देशाला, त्यांच्या गुप्तहेरांना किंवा उपग्रहांना त्याचा पत्ता लागला नाही, ही आपल्या लष्कराच्या दृष्टीनं, सरकारच्या दृष्टीनं आणि शास्त्रज्ञांच्या दृष्टीनं फार अभिमान वाटावी अशी बाब आहे.

भालचंद्र जोशी : अणुचाचण्यांबाबत दोन आक्षेप घेतले जातात. एक तर भारतासारख्या देशानं, जिथं महात्मा गांधींसारखा महापुरुष झाला तिथं अणुस्फोट व्हावा ही बाब उचित नाही. दुसरा आक्षेप म्हणजे भारतासारख्या गरीब देशानं अणुचाचण्यांवर खर्च करावा का?

कर्नल आठल्ये : गांधींच्या बाबतीत म्हणायचं झालं तर त्यांची अहिंसा शुराची होती, भेकड माणसाची अहिंसा नव्हती. गांधीजी हा विलक्षण धैर्यवान, निर्भय महापुरुष होता. दुसरं असं की, जगात 'बळी तो कान पिळी' हा जुना कायदा आहे. तुमची बाजू कितीही न्यायाची, सत्याची आणि नैतिकतेची असली तरी त्याला शक्तीची जोड नसेल, सामर्थ्याची जोड नसेल तर तुम्हाला कोणी विचारत नाही. आर्थिक स्थिती ढासळल्यानं आपण इंग्रजांचे गुलाम झालो असं काही तथाकथित बुद्धिवादी म्हणतात; पण अगदी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धातही सोन्याचा ओघ भारताकडे वाहत होता. इंग्लंडमधल्या ईस्ट इंडिया कंपनीच्या दप्तरातल्या त्या विषयीच्या नोंदी मी स्वतः पाहिल्या आहेत. तेंव्हा राजकीय गुलामी झाल्यामुळेच आपली दुर्दशा झाली हे समजून घेतले पाहिजे.

आता राहिला मुद्दा भारतासारख्या गरीब देशानं अणुचाचण्यांवर खर्च करण्याचा. खरं तर असं आहे की, जो काही खर्च लागेल तो करावाच लागेल. त्यात तडजोड करता येणार नाही. दुसरं म्हणजे अगदी परकीय तज्ज्ञांनी मुद्दाम फुगवून सांगितलेले आकडे खरे जरी धरले तरी आपल्या अणुचाचण्यांवर केवळ आठ कोटी रुपये खर्च झाले आहेत. आपल्या देशाची एकूण अर्थव्यवस्था पाहता ही रक्कम म्हणजे दर्यामे खसखस असंच म्हणावं लागेल.

भालचंद्र जोशी : आपला मुद्दा अगदी सर्वांना पटावा असाच आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या रक्षणाचा, देशाच्या सार्वभौमत्वाचा जेव्हा प्रश्न येतो तेव्हा त्यासाठी कितीही किंमत मोजावी लागली तरी सर्व भारतीय जनता त्यासाठी तयार होईल. भारत शक्तिवान झाला आहे. याचा स्वातंत्र्यवीर सावरकरांना अत्यंत आनंद झाला असता. कर्नलसाहेब, आपण या अणुस्फोटाबद्दल फार उत्तम माहिती सांगितली त्याबद्दल धन्यवाद. या अणुस्फोटांमुळे फार मोठ्या प्रमाणावर भौतिक उर्जा निर्माण झाली हे जरी खरं तरी सर्व देशभर राष्ट्रीय आभिमान आणि गौरवाची प्रचंड उर्जा निर्माण झाली आहे. या उर्जेच्या जोरावरच आपला देश समर्थ आणि संपन्न देश म्हणून उभा राहील यात काहीच शंका नाही. पुन्हा एकदा आपले आभार.

स्वयं-अध्ययन प्रश्न-२

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) वाचन म्हणजे काय?

२) संवाद कौशल्यासाठी आवश्यक गुण कोणते आहेत ते लिहा.

३) मुलाखतीसाठी प्रश्न कसे तयार करावेत?

४) मुलाखत घेताना संयमित भूमिका का घ्यावी?

******

१.२.५ निवेदनाचे स्वरूप आणि व्याप्ती

निवेदन आणि सूत्रसंचालन यात किंचित फरक असतो हे आपण वर म्हटलेच आहे. तर हा फरक काय आहे हे समजून घेऊयात.

निवेदन म्हणजे काहीतरी सांगणे. हे जे सांगणे आहे ते लेखन किंवा इतर माध्यमाद्वारे समाजापुढे मांडले जाते. हा एक प्रकारचा संवादच आहे. ज्यामध्ये कुणीतरी कशाबद्दल तरी माहिती किंवा संदेश देतो. निवेदन हे लिखित किंवा मौखिक असू शकते.

निवेदनाचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

१) मौखिक निवेदन : जेव्हा कुणीतरी कशाबद्दल तरी माहिती किंवा संदेश देते तेव्हा ते मौखिक असते. पूर्वी खेडेगावात दवंडी दिली जायची. ते एक प्रकारचे मौखिक निवेदनच होते.

२) लिखित निवेदन : हे लिखित स्वरूपात दिले जाते. अशी निवेदने ही वृत्तपत्रातून किंवा श्राव्य आणि दृकश्राव्य माध्यमातून दिली जातात. त्याद्वारे लोकांपर्यंत संदेश पोहोचवला जातो. कोविड काळात आपल्याला याचे महत्त्व लक्षात आले होते. त्याचा एक नमुना खाली देत आहोत

१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

स्क्रिप्ट (Script): संहिता म्हणजेच आपण सूत्रसंचालनासाठी लिहिलेला मजकूर

देहबोली (Body language) : म्हणजे शब्दाशिवाय, शरीराच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव, डोळ्यांतील भाव, या द्वारे आपले विचार प्रकट करणे.

निरीक्षण : (Observation) म्हणजे व्यक्ति, घटना किंवा परिस्थिती याकडे बारकाईने, लक्षपूर्वक पाहणे. माहिती गोळा करणे.

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१) देहबोली, २) अमौखिक संवाद.

स्वयं-अध्ययन प्रश्न-२

१) वाचन म्हणजे केवळ शब्द वाचणे नसून माहिती आत्मसात करणे होय.

२) उत्तम वाचन, ऐकण्याची सवय, भावना आणि विचारात स्पष्टता, डोळ्यात डोळे घालून बोलणे, बोलण्यापूर्वी विचार आणि योग्य शब्दांची निवड, सराव आणि निरीक्षण करणे हे संवाद कौशल्याचे गुण कोणते आहेत.

३) मुलाखत घेताना थेट आणि स्पष्ट प्रश्न तयार करावेत. प्रश्न साधे आणि सोपे तसेच मुलाखत देणाऱ्याला बोलते करणारे प्रश्न विचारावेत.

४) मुलाखतकार म्हणून भूमिका बजावताना मुलाखत देणाऱ्याच्या मतांवर स्वत:ची मतं, विचार न लादता बोलण्याचे स्वातंत्र्य द्यावे अशा प्रकारे मुलाखत घेताना संयमित भूमिका घ्यावी.

१.५ सारांश

या घटकात आपण सूत्रसंचालन आणि निवेदन कौशल्य या विषयी माहिती घेतली. सूत्रसंचालन आणि निवेदन या मध्ये सूक्ष्म फरक कसा असतो हे देखील आपण समजून घेतले. सूत्रसंचालनासाठी आणि निवेदनासाठी आपण संवाद कौशल्य कसे प्राप्त केले पाहिजे, त्याचे महत्व काय आणि त्याचा उपयोग चांगला सूत्रसंचालक बनण्यासाठी कसा होतो हे देखील आपण पाहिले. तसेच मुलाखतीचे तंत्र देखील समजून घेतले.

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१) संवाद कौशल्यासाठीचे कोणते गुण आवश्यक आहेत ते लिहा.

२) संवाद कौशल्यात स्पष्टता येण्यासाठी काय करावे? याबद्दल तुमच्या शब्दांत लिहा.

३) मुलाखतीचे तंत्र सविस्तर लिहा.

१.७ क्षेत्रीय कार्य

- आपल्या आसपास आयोजित केलेल्या कार्यक्रमाची पत्रिका मिळवून त्यावरून सूत्रसंचालनासाठी संहिता लिहून पहा.
- नगरपालिका अथवा महानगरपालिका विभागातील पाणी पुरवठा, किंवा वीज पुरवठा विशिष्ट दिवशी, ठराविक वेळेला खंडित केला जाणार आहे. त्या विषयीचे निवेदन लिहा.
- एखाद्या सामाजिक किंवा संस्कृतिक कार्यक्रमाला उपस्थित राहून त्या कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाचे निरीक्षण करा आणि त्यातील वैशिष्टे आणि त्रुटींची नोंद करा.
- एखाद्या कार्यक्रमातील मुलाखत बघून त्याचे निरीक्षण करा. आणि आपल्या परिचयातील एखाद्या व्यक्तीची मुलाखत घ्या.

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) केळुस्कर महेश, आपला आवाज, अनघा प्रकाशन, ठाणे.

२) लागू श्रीराम, वाचिक अभिनय, राजहंस प्रकाशन, पुणे.

घटक २ : सूत्रसंचालन आणि निवेदनाची पूर्वतयारी

अनुक्रमणिका

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय-विवेचन
    २.२.१ सूत्रसंचालकाची भूमिका
    २.२.२ सूत्रसंचालकातील आवश्यक गुण -जिवंतपणा
    २.२.३ सूत्रसंचालक कार्यक्रमाचा आवश्यक घटक
    २.२.४ सूत्रसंचालनात यशस्वी होण्याची चार सूत्रे
    २.२.५ कार्यक्रमानुसार प्रकार
    २.२.६ पूर्वतयारी
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ क्षेत्रीय कार्य
२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

२.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला –

- सूत्रसंचालन करण्यापूर्वी किंवा निवेदन करण्यापूर्वीकाय तयारी केली पाहिजे हे कळेल.
- त्या घटकांच्या अभ्यासाला कशी सुरुवात करावी हे समजेल.
- सूत्रसंचालनाचे आधारभूत नियम लक्षात येतील.
- सूत्रसंचालक आणि निवेदक हा कार्यक्रमाचा अविभाज्य घटक कसा आहे हे समजेल.

२.१ प्रास्ताविक

आजच्या काळात सूत्रसंचालनाला किती महत्त्व आले आहे याविषयी आपण मागच्या घटकात चर्चा केली आहेच. त्यामुळे निवेदन करणे किंवा सूत्रसंचालन करणे वाटते तितके सोपे नाही. त्या मागे श्रम आहेत, गायकाप्रमाणे रियाज आहे, वक्त्याप्रमाणे वाचन आहे आणि श्रोत्याप्रमाणे रसिकता आहे. या सोबतच सगळ्यात मोठी जबाबदारी सूत्रसंचालकावर असते ती म्हणजे कार्यक्रमाचा तोल सांभाळणे, निर्धारित गती-दिशा कायम ठेवत नेटक्या शैलीत कार्यक्रम पुढे नेणे. असे म्हणतात की, आपल्या वर्तुळात मित्रमंडळींच्या ग्रुपमध्ये जो छान गप्पा मारू शकतो, विविध विषयांवर चुरचुरीत बोलू शकतो, विनोदी

कोट्या करू शकतो, घडामोडीचे विश्लेषण करू शकतो तो चांगला निवेदक-सूत्रसंचालक होऊ शकतो. सूत्रसंचालक आणि निवेदक हे आज सांस्कृतिक क्षेत्रात ठसा निर्माण करणारे कलाकार आहेत. सूत्रसंचालन हा सहज चालता-बोलता करण्याचा प्रकार आहे हा गैरसमज आधी मनातून काढून टाका. हा अभ्यासाचा भाग आहे. त्याला शास्त्रशुध्द तयारी करावी लागते. सूत्रसंचालन हे शास्त्र आहे तसेच ते अस्त्र देखील आहे. त्या साठी सूत्रसंचालनाचे 'बेसिक्स' समजून घेतले पाहिजे. आधारभूत नियम जाणून घेतले पाहिजेत आणि पाया रचला पाहिजे.

२.२ विषय-विवेचन

'बोलणाऱ्याची माती ही विकली जाते' असे म्हणतात. पण अनेक कार्यक्रम व्यवस्थापना अभावी नीरस होतात. कोसळतात. तिथे खरे तर 'जमलं नाही.' हा प्रकार नसतो. तर 'माहिती नव्हती' हे कारण असते. अशा वेळी कार्यक्रम आयोजनाची माहिती, त्यासाठी लागणारी एकूणच साधने इत्यादीचा या घटकात विचार करणार आहोत. तसेच सूत्रसंचालनाची आणि निवेदनाची पूर्वतयारी कोणती करावी ते जाणून घेण्यापूर्वी इतर काही गोष्टी जाणून घ्याव्या लागतील, त्या माहिती असतील तरच आपल्याला पुढे जाता येईल.

१.२.१ सूत्रसंचालकाची आणि निवेदकाची भूमिका

कविवर्य सुरेश भट यांच्या चार ओळी म्हणजे सूत्रसंचालकाने आणि निवेदकाने कसे असावे हे सुद्धा सांगणाऱ्या आहेत.

रंगूनी रंगात साऱ्या, रंग माझा वेगळा.
गुंतुनी गुंत्यात साऱ्या, पाय माझा मोकळा.

कार्यक्रमात गुंतल्यावरही सूत्रसंचालकाला अलिप्तपणे कार्यक्रमाचा, मग तो कुठलाही असो, एखादा उद्घाटन समारंभ किंवा गाण्यांची मैफल असो त्या कार्यक्रमाचा त्याला पूर्ण अंदाज सातत्याने घेता आला पाहिजे. क्षणात उपस्थित श्रोत्यांच्या, प्रेक्षकांच्या भूमिकेतून त्याला कार्यक्रमाचा रंगतदारपणा किंवा रटाळपणा जोखता आला पाहिजे. व्यासपीठावर आपण कार्यक्रमात रंगून गेलो आहोत असे श्रोत्यांना वाटत असताना सूत्रसंचालकाने श्रोत्यांना गुंतवून ठेवणे आणि त्यानंतरही स्वतः अलिप्त राहणे, सातत्याने भानावर असणे अत्यंत गरजेचे असते. केवळ निवेदन वाचणे वा बोलणे एवढेच त्याचे काम नसते. तर कार्यक्रम फुलवणे, खुलवणे, हे त्याच्या/ तिच्या हाती असते.कार्यक्रम भरकटतो आहे का? नियोजितरित्या होतो आहे की नाही? हे सुद्धा त्याने बघितले पाहिजे. जर फक्त निवेदन करायचे असेल तर ते देखील अलिप्तपणे करावे लागते.

१.२.२ जिवंतपणा : सूत्र संचालनातील आणि निवेदनातील आवश्यक गुण

आपण इतरांनी केलेले सूत्रसंचालन ऐकलेले असते. ते सुरुवात एखाद्या कवितेने करतात किंवा एखादा विनोद सांगून करतात. त्याचा परिणाम श्रोत्यांवर चांगला झालेला आपण पाहतो. पण केवळ दोनचार कवितेच्या ओळी किंवा विनोद हा सूत्रसंचालनाचा अविभाज्य भाग ठरू नये. काही जण ठरावीक ओळी वापरून वेळ मारून नेतात. जरी कार्यक्रमाची जागा आणि श्रोते बदलले असले तरी तुमचे कार्यक्रम

ऐकलेले काही लोक इथेही असू शकतात त्यांना तुमची तयारी खूप कमी आहे हे लक्षात येते म्हणून प्रत्येक वेळी कवितेच्या ओळी प्रसंगानुरूप निवडण्यात याव्यात, नाहीतर निवेदनात तोचतोचपणा येतो. म्हणून सूत्रसंचालकाच्या निवेदनात जिवंतपणा असायला हवा. सतर्क राहत संवाद साधणे आणि कार्यक्रमाची रंगत वाढवत नेणे आवश्यक असते. आपण कुठेही कार्यक्रमाच्या वरचढ होणार नाही याचे भान ठेवले पाहिजे. शब्दांचा अतिरिक्त वापर न करता कार्यक्रम पुढे नेला पाहिजे. यासाठी पूर्वतयारी करावी लागते. ती कशी करायची ते आपण पुढे पाहणार आहोतच.

१.२.३ सूत्रसंचालक आणि निवेदक हा कार्यक्रमाचा अविभाज्य घटक

आजच्या काळात सूत्रसंचालक अर्थात निवेदक हा कार्यक्रमाचा अविभाज्य घटक झाला आहे. केवळ दोन गाण्यांमधील, दोन भाषणांमधील निवेदन करणे म्हणजे सूत्रसंचालन करणे नव्हे. कार्यक्रमाचा सूत्रसंचालक कोण आहे, यावर देखील कार्यक्रमाचा दर्जा आणि रंगत अवलंबून असते. सूत्रसंचालक आणि निवेदक हा कार्यक्रमातील दोन घटकांना जोडणारा दुवा असतो हे आपण पाहिले आहेच. त्याने नव्या उत्साहाने श्रोत्यांना प्रेरित करून उत्सुकता वाढवणारा एक सुसंवाद प्रस्थापित करावा अशी अपेक्षा असते

१.२.४ सूत्रसंचालन आणि निवेदन यात यशस्वी होण्याची चार सूत्रे

यशस्वी सूत्रसंचालक किंवा निवेदक बनायचे असेल तर सूत्रसंचालन करताना किंवा निवेदन करताना खालील गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत.

बोलताना साधे, सोपे आणि अनौपचारिक बोलावे. उगीच आलंकारिक शब्द वापरून आपले बोलणे विद्वतजड करू नये. त्यामुळे तुमच्यामध्ये आणि ऐकणाऱ्यांमध्ये अंतर पडते. शब्द निवडीतील साधेपणा, शब्द मांडणीतील अनौपचारिकता, शब्दोच्चारातील स्पष्टता, क्वचित प्रसंगी वापरली जाणारी उत्स्फूर्तता ही चार महत्त्वाची सूत्रे संभाळल्यास यश नक्की मिळते.

१.२.५ कार्यक्रमानुसार प्रकार

साधारणपणे आपल्याला सूत्रसंचालन करण्यासाठी किंवा निवेदन करण्यासाठी कार्यक्रमाचे स्वरूप काय आहे? कार्यक्रमाच्या ठिकाणी नियोजित कार्यक्रमाव्यतिरिक्त इतर कोणत्या प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन केले आहे याविषयी माहिती घेऊन त्यानुसार सूत्रसंचलनाचे, निवेदनाचे सादरीकरण ठरते. यात प्रत्येक प्रकारात सादरीकरणाची भाषा बदलते. म्हणून आपल्याला कार्यक्रमांचे कोणते प्रकार आहेत हे पाहावे लागेल. यात इतरही अनेक कार्यक्रमांचा समावेश करता येईल.

१) सांस्कृतिक कार्यक्रम : यामध्ये संगीत मैफली, ऑर्केस्ट्रा, सुगम आणि शास्त्रीय संगीताच्या मैफली, प्रकाशन समारंभ, गौरव समारंभ इत्यादी

२) शासकीय आणि औपचारिक कार्यक्रम : उदघाटन सोहळे, स्वागत समारंभ, निरोप समारंभ, स्पर्धेचे संचालन, राजकीय सभा-संमेलने इत्यादी

३) साहित्यविषयक कार्यक्रम : साहित्य संमेलने, कवी संमेलने, परिसंवाद, कार्यशाळा, अभिवाचनाचे कार्यक्रम, इत्यादी.

१.२.६ पूर्वतयारी

आता या सगळ्या साठी पूर्वतयारी काय आणि कशी करायची ते आपण टप्प्या टप्प्याने बघणार आहोत.

अ) आवाजाची तयारी

सूत्रसंचालकाचा किंवा निवेदकाचा आवाज हे त्याच्या प्रत्यक्ष सादरीकरणातील महत्त्वाचे माध्यम आहे. त्यामुळे ज्याला या क्षेत्रात काही करायचे आहे त्याने आवाजाची काळजी घेणे खूपच आवश्यक आहे. 'तिळगूळ घ्या, गोड बोला' असे आपण संक्रांतीला म्हणतो. पण तिळगुळ खाल्याने आवाज गोड होतो हा गैरसमज आहे. तो कुणीही बाळगू नये. एखाद्या व्यक्तीचा आवाजच भारदस्त असतो. पण तसा प्रभावी आवाज ही नैसर्गिक देणगी असते. पण केवळ असा आवाज लाभल्याने प्रभावी संवाद साधता येतोच असे नाही. या नैसर्गिक आवाजाला रूप आणि आकार देण्यासाठी परिश्रम करावे लागतात. अर्थात असा चांगला आवाज आपल्याला लाभला नाही म्हणून निराश होण्याचे देखील कारण नाही. प्रत्येकाच्या आवाजाची स्वतःची एक मुद्रा (Identity) असते. परिश्रमपूर्वक आवाजाची साधना करीत राहिल्यास, आपला आवाज संवादासाठी प्रभावी करता येतो.

स्वरतंतूंच्या कंपनक्रियेमुळे जो ध्वनी निर्माण होतो त्याला उच्चारशास्त्रात 'आवाज' ही संज्ञा आहे. सर्व मनुष्यप्राण्यांच्या स्वरतंतूंची (vocal cords) लांबी, रुंदी, जाडी समान नसते. त्यामुळे एकाचा आवाज दुसऱ्यापेक्षा थोडा वेगळा असतो. प्रत्येकाची स्वरमर्यादा वेगळी असते. प्रत्येकाने आपल्या आवाजाच्या स्वाभाविक मर्यादेत मेहनत केल्यास त्या आवाजाची गुणवत्ता वाढवता येते.

आवाजाच्या साधनेला 'voice culture' असेही म्हटले जाते. आवाजाची साधना करणाऱ्याने आपल्या आवाजाची उंची आणि खोली, घनता, आवाजाचा पोत लक्षात घेऊन, त्याला लय द्यावी लागते. आणि त्याला एक विशिष्ट तालही द्यावा लागतो. काहींचा आवाज अतिशय 'सपाट' आणि नीरस असतो, काहींचा 'कर्कश्य' आणि 'खरखरीत' असतो तर काहींचा आवाज 'क्षीण' असतो. अशा प्रकारचे आवाज विशिष्ट तंत्र वापरून आणि आवाजाचे व्यायाम करून हळू हळू सुधारता येतात. म्हणजे स्वरसाधना करणाऱ्यांनी केवळ 'थिअरी' शिकून चालत नाही. तर त्यासाठी तज्ज्ञांकडून प्रत्यक्ष प्रयोग करवून घ्यायला हवेत.

काही माणसे बोलताना अडखळतात. चित्रपट, नाटक यामध्ये बऱ्याचदा विनोदासाठी किंवा गंमत म्हणून असे अडखळत बोलणारे पात्र असते. नेहमीच्या आयुष्यात मात्र याकडे वाचादोष किंवा वैगुण्य म्हणून बघितले जाते. तोतरेपणा हा एक वाचादोष आहे. बोलताना जीभ, ओठ, दात, टाळू, पडजीभ, स्वरयंत्र, स्वरनलिका, आणि फुप्फुस या अवयवांचा वापर होतो. या अवयवांचे नियंत्रण समन्वयन हे काम मेंदू करतो. बोलताना ओठ, जीभ, आणि स्वरयंत्राच्या स्नायूंमध्ये अनावश्यक ताण आला तर बोलणे अडखळते. असे असले तरी वाचा उपचार (स्पीच थेरेपी) पद्धतीचा उपयोग करून तोतरेपणावर मात करता येते. पण आपण एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, सूत्रसंचालन आणि निवेदन करताना कधीही कृत्रिम आवाज लावून बोलू नये. आता आवाजाची तयारी करण्यासाठी पुढे काही नाटकातील उतारे दिले आहेत. ते मोठ्याने वाचावेत ते स्वत:शीच वाचा किंवा चारचौघात वाचा. पण ते मोकळ्या आवाजात वाचा. ते वाचताना अत्यंत काळजीपूर्वक वाचायचे आहेत. वाचताना स्पष्ट शब्दोच्चार करीत ते वाचायचे आहेत. आपल्या वाचनातून त्यातील भाव देखील प्रकट होईल या कडे लक्ष द्यायचे आहे. वाचनाची लय किंचित

कमी ठेवल्यास उच्चारांची स्पष्टता वाढू शकते. शब्दातील प्रत्येक अक्षराचा उच्चार स्पष्ट झाला पाहिजे. विशेषत: शेवटच्या शब्दाचा उच्चार स्पष्ट झाला पाहिजे. एकसुरीपणा टाळला पाहिजे. असो. तर आता काही उतारे देत आहोत.त्यांचे वाचन केल्याने तुमचा आवाज सूत्रसंचालनासाठी तयार होईल.

उतारा- १) रायगडाला जेंव्हा जाग येते ...लेखक- वसंत कानेटकर.

(सुचना – हा ऐतिहासिक नाटकातील उतारा आहे. याचे भान ठेवावे.)

शंभूराजे : समज? आपण आमचा तो केवळ एक 'समज' मानता? युवराज्ञी, तुम्ही थोर घरी जन्मलात. मातापित्यांच्या मांडीवर लाडात वाढलात. आबासाहेबांच्या लाडक्या सुनबाई म्हणून तुम्ही आजवर थाटामाटात रायगडावर वावरलात! आमच्या पोरक्या जीवनाची दर्दभरी कहाणी तुम्हाला नाही कळायची ! आम्हाला जाण आल्यापासून ठाऊक आहे फक्त आबासाहेबांच्या डोळ्यातला धाक! आमच्या मनावर कोरली आहे त्यांच्या ओठावरील सुन्न जरब! आमच्या पोटात अजून कालवतं आहे त्यांचं छत्र, त्यांचं सिंहासन, त्यांची राजमुद्रा! (भूतकाळातील स्मृतींची याद येऊन व्याकूळ होत) आग्र्याहून सुटकेच्या प्रसंगाची याद आली की, अजून रक्त जळू लागतं. मस्तक फिरू लागतं. पोटात आतडी तटातटा तुटू लागतात. (क्षणार्ध थबकून दृष्टीसमोर चित्र न्याहाळत) एक आठ वर्षाचा कोवळा पोर महाराजांच्या पाठोपाठ रानावनातून, उन्हांतान्हातून दिवसरात्र पळताना अजून आमच्या डोळ्यासमोर स्पष्ट दिसतो आहे. अंगात ज्वर भरला, पायाला टरटरून फोड आले. तरी हू की चू नाही. रात्री मथुरेला एका ब्राम्हणाच्या घरात मुक्काम पडला. मध्यरात्री खलबत सु झालं, तेंव्हा निराजीपंत सल्ला देतात- "महाराज, सहीसलामत सुटायचं असेल तर युवराजांना इथंच मागं सोडून दौड केली पाहिजे!" आत माजघरात ग्लानी येऊन तळमळत पडलेला पोर ते शब्द ऐकतो आणि धडपडत तस्सा उठून बाहेर धावतो; महाराजांच्या कमरेला मिठी घालीत दीनवाण्या मुद्रेनं तो हंबरडा फोडतो - "आबासाहेब, आबासाहेब, आम्हाला एकट्याला टाकून तुम्ही नाही ना हो जाणार?" आबासाहेब एक शब्द बोलत नाहीत. कमरेची इवल्या हातांची मिठी ते पोलादी बोटांनी सोडवतात आणि माजघराकडे बोट दाखवतात. चिमुकल्या मनाला ब्रम्हांड आठवलं. शेकडो कोसांची पायपीट बिनतक्रार करणाऱ्या पोराचे पाय ओसरीवरून माजघरात जाईतो पांगळे होतात. महाराज त्या रात्री निघून जातात. न भेटता, न बोलता. (क्षणार्ध थबकून) युवराज्ञी, एकच सवाल पुसतो - आम्ही आमच्या पुत्राशी असे वागतो तर आपण आमची संभावना कशी केली असतीत?

उतारा -२ : संगीत स्वयंवर – लेखक- कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर.

(स्थळ : राजवाड्यासभोवारचा बाग. रुक्मिणी प्रवेश करते)

रुक्मिणी : त्यांचे दहन झाल्यावर ह्या लतांना नवीन पालवी का फुटावी? ह्या नव्या कळ्या फुलझाडांवर कश्या दिसाव्या? आम्रमंजिरीचे सुगंधी द्रव्य वाहणारा वायु दिमाखाने का फिरू लागावा? ती मदनमूर्ती जळून खाक झाल्यावर हा वसंतकाळ कसा जिवंत राहिला? -काय म्हणतां, मी त्यांच्या प्रेमाशी बेईमानी करून शिशुपालाच्या गळ्यांत माळ घालीन म्हणून मजवर सूड उगवण्याकरिता तुम्ही पृथ्वीवर रेंगाळत आहां? - अथवा दुसरे कोणते कारण असणार? त्यांच्या दहनाची वार्ता ऐकल्यावर मी जर मरून पडले नाही तर ह्या नव्या कळ्यांनी मला हंसण्याकरिता का फुलू नये? आम्रमंजिरीच्या उन्मत्त गंधाचे विष मला देण्याकरिता या

वायुने माझ्याभोवती लपत छपत कां फिरू नये? काळाच्या पोटात अग्निमुखाने ते जसे शिरले, त्याप्रमाणे मीही शिरते की नाही हे पाहण्याकरिता वसंताने - त्यांच्या मित्राने - टेहाळणी कां करू नये ? - करा, खुशाल माझा छळ करा. खरे खरे तुम्हाला सांगते मी जिवंत आहे, कारण तेही जिवंत आहेत असेच मला वाटते. (पडद्यात कोकिलरव) काय म्हटलेस कोकिळे, माझ्याप्रमाणेच तुलाही वाटते म्हणून तू आनंदाने गात आहेस? (पडद्यात कोकिलरव) तुझे हे गाणे म्हणजे मी आकाशवाणीच समजते; हो श्रीकृष्ण जिवंत आहेत - (पडद्यात कोकिलरव) आहेत, आहेत जिवंत आहेत; खरेच गडे ते जिवंत आहेत - (पडद्यात कोकिलरव) कोठे आहेत म्हणून विचारतेस? - वेडे; तुला जिवंत आहेत हे समजले, आणि कुठे आहेत हे समजत नाही? तुला नाही समजले, पण मला माहीत आहे कुठे आहेत ते (पडद्यात कोकिलरव) सांगू म्हणतेस कोठे आहेत ते ? ऐक तर –

श्रीकृष्ण जळाला असे हे म्हणतात तरी कसे? श्रीकृष्ण येथे फुललेला मला दिसतो; श्रीकृष्ण माझ्या अंगाला स्पर्श करीत असून त्याच्या अंगाचा सुगंधही मला येतो; श्रीकृष्णाच्या मुरलीचा मंजुळ ध्वनी मला ऐकू येतो; श्रीकृष्ण सांग जळेल कसा? - हां हां बरोबर आहे. श्रीकृष्ण प्रत्यक्ष मदनच आहे, हे मला सांगण्याकरीता मदनदहनाप्रमाणे श्रीकृष्ण-दहनाची कथा यांनी रचली असावी ! मदनाला शंकरांनी जाळले, पण प्रत्येक प्राण्याच्या – प्रत्येक वस्तुच्या मनाने त्याला उत्पन्न केले; श्रीकृष्ण जळाला म्हणून तुम्ही सांगता, पण मी म्हणते, तो प्रत्येक मनाचा – प्रत्येक वस्तुचा -मालक झाला आहे. मदनाहून त्यांची योग्यता अधिक. मदन मनांत उत्पन्न होतो. ते मनावर अधिकार चालवितात. जो प्रत्येकाचा स्वामी झाला, तो मला सनाथ केल्याशिवाय कसा राहील? हो हो झालेच मी सनाथ; ज्यावेळी श्रीकृष्ण जळाला म्हणून तुम्ही मला सांगितलेत त्याच वेळी मी सनाथ झाले.

फुलांनो तुम्ही खुशाल फुला; श्रीकृष्णाच्या यशाच्या फैलावाशिवाय तुम्ही दुसरे तिसरे कोणते कार्य फुलून करणार? वायो खुशाल वाहा; श्रीकृष्णाच्या गुणांशिवाय दुसरे द्रव्य तुझ्यापाशी कोणते असणार? – कोकिळे, खुशाल गा; श्रीकृष्णाच्या लीलाच तू गाणार ना? ये वसंता खुशाल ये ; सर्व सृष्टी कृष्णमय झाली आहे, तेंव्हा तूंहि कृष्णमयच असला पाहिजेस, आणि श्रीकृष्णाची आनंदाची बातमी तू सांगणार असला पाहिजेस. (दासी प्रवेश करते.)

(इ.स. १९१६)

३) उतारा -३ : एकच प्याला ..... लेखक- राम गणेश गडकरी.

सुधाकर : आता सोड? इतके दिवस दारू प्यायल्यावर? वेड्या, इतके दिवस कशाला? एकदाच प्याल्यावर दारू सोड? वेड्या, दारू ही अशी तशी गोष्ट नाही की, जी या कानानं ऐकून त्या कानानं सोडून देता येईल ! दारू ही एखादी चैनीची चीज नव्हे की, शोकाखातर तिची सवय आज जोडता येईल ! आणि उद्या सोडता येईल. दारू हे एखादं खेळणं नव्हे की, खेळता खेळता कंटाळून ते उशापायथ्याशी टाकून देऊन बिनधोक झोप घेता येईल ! अजाण मुला, दारू ही शक्ती आहे, दारू हे काळाच्या भात्यातलं अस्त्र आहे, दारू ही जगाच्या चालत्या गाड्याला घातलेली खीळ आहे. दारू ही पोरखेळ करता येण्यासारखी एखादी क्षुद्र वस्तू असती तर तिच्याबद्दल एवढा गवगवा जगात केंव्हाच झाला नसता ! हजारो परोपकारी पुरुषांनी आपल्या देहाची धरणं बांधली तरीसुद्धा तिचा अखंड ओघ चारी खंडात महापुरानं वाहत राहिला, वेदवेदांताची पानं जिच्या ओघावर तरंगत गेली, कठोर शक्तीचे मोठाले राजदंड जिच्या गाळात रुतून बसले ती दारू म्हणजे

काही सामान्य वस्तू नव्हे ! दारूची विनाशक शक्ती तुला माहीत नाही ! मुसळधार कोसळणाऱ्या पावसात टिकाव धरून राहणारी इमारत दारूच्या शिंतोड्यांनी मातीला मिळेल ! दारूगोळ्यांच्या तुफानी माऱ्यासमोर छाती धरणारे बुरुज या दारूच्या स्पर्शानं गारद होऊन पडतील ! फार कशाला पूर्वीचे जादुगार मंतरलेलेपाणी शिंपडून माणसाला कुत्र्या-मांजरांची रूपं देत असत, ही गोष्ट तुझ्यासारख्या शिकल्यासावरल्या आजच्या पंडिताला केवळ थट्टेची वाटेल; पण रामलाल, दारूची जादू तुला पाहावयाची असेल तर वाटेल तो बत्तीसलक्षणी आणि सर्वसद्गुणी पुरुष पुढे उभा कर आणि त्याच्यावर दारूचे चार थेंब टाक; डोळ्यांचं पातं लवतं न लवतं तोच तुला त्या मनुष्याचा अगदी पशु झालेला दिसू लागेल! अशी आहे दारू समजलास?

(इ.स. १९१९)

उतारा -४ : संगीत शारदा .... लेखक – गोविंद बल्लाळ देवल.

स्थळ – गंगापुरातील एक रस्ता.

दीक्षित : (स्वगत) या क्षेत्री येऊन जवळ जवळ महिना होत आला. इतक्या अवधीत आम्ही काय केलं? का, पुष्कळ केलं, पहिली गोष्ट ही की व्यवस्थित वळण बांधून येथील सरकारी हेरंब महालात आमच्या श्रीमंतांची स्थापना केली. काही माहिती मिळवून त्या माहितीला थोडं धोरण जुळवून आणि त्यात आमची स्वतःची कल्पना मिसळून श्रीमंतांना शोभण्यासारखं व लोकांना पटण्यासारखं एक नाव शोधून काढलं. ते कोणतं? तर मंडलेश्वरकरांचे सापत्न बंधू जयधुंडिराज. या क्षेत्री आल्या दिवसापासून, विद्वान, शास्त्री, हरिदास, पुराणिक, अशांची योग्य संभावना; तसेच दानधर्म, अन्नसंतर्पण, इत्यादिकांची गर्दी सुरु ठेवल्यानं श्रीमंतांच्या औदार्याचा चोहोकडे डंका झडू लागला. हे सर्व झालं, पण मुख्य कार्यासंबंधानं काय झालं? या बरं! त्या दिशेनंही या दीक्षितांच्या युक्तीचा जयच होत चालला आहे. श्रीमंत वृद्ध नसून तरणे आहेत, असा लोकांचा ग्रह केला. रुपानं, वयानं, आपल्याला हवी त्यापेक्षा रेसभर जास्त अशी कांचनभट म्हणून एका लोभी भिक्षुकाची लग्नाची मुलगी आहे, असा शोध काढला. त्या कांचनभटाचे स्नेही सुवर्णशास्त्री – बेट्यांचे गुण पाहून मग नावे ठेविलेली दिसतात. त्या शास्त्र्यांच्या मध्यस्थीनं कांचनभटाचं मन वळविण्याचं कारस्थान सुरू केलं आहे. मुलगी दिल्यास हुंडा म्हणून पाच हजार; शिवाय त्या भटाला श्रीमंताचे श्वशूर म्हणून वंशपरंपरेने मोठीशी तैनात करून देऊ असं आमिष दाखवायला सांगितलं आहे. हजार वाटांनी ही गोळी चुकवायची नाही. इकडे श्रीमंतांना तर लग्नाचं जसं काही वेडच लागलं आहे. अष्टौप्रहर लग्नाशिवाय गोष्ट नाही दुसरी. त्यांचा प्रश्नही लग्नच, आणि उत्तरही लग्नच.(दूर पाहून) हे सुवर्णशास्त्री कांचनभटाच्या घराकडून आले. बहुधा यश संपादन करून आले असतील. चला, त्यांनाच विचारू म्हणजे झालं. (जातो)

(इ.स. १८९९)

उतारा ५ : दिवाकरांच्या नाट्यछटा -लेखक : दिवाकर

कोकिलाबाई गोडबोले

".... मेले हात धुऊन पाठीस लागले आहे जसे ! काडीइतकेसुद्धा काट्यांपासून सुख नाही ! ... कस्से, करू तरी कसे आता ! जेवा मुकाट्याने ! नाहीतर चांगली फुकणी घालीन पाठीत एकेकाच्या ! काय, काय म्हटलेस गण्या? मेल्या ! मी मोठ्याने ओरडते का? ऊं ! चूप ! ओक्साबोक्शी रडतो आहे मेला ! जीव

गेला? का घालू पाठीत? का गं वेणे ? गप का बसलीस? भाकरीवर तूप हवे? – मेले माझे तोंड नाही धड आता ! बापाने ठेवले आहे तूप तुझ्या टवळे ! तूप पाहिजे नाही ? हे घे ! – गप्प ! नाही तर आणखी रपाटे घालीन चांगले ! मिटले का नाही तोंड ! का अस्सा आणखी ! हात् तुला घातले चुलीत नेऊन अवदसे ! कोण आहे ? कोण हाका मारते आहे बाहेर? – आहेत हो. आहेत ! आले, आले ! – या पोरट्यांच्या गागण्याने अंमळ ऐकू येईल तर ना? लग्न होऊन घरात आल्यापासून सारखी पाहाते आहे, रात्रंदिवस मेला जंजाळ पाठीमागे ! – सांडलेस पाणी ? बाई ! बाई ! भंडावून सोडले आहे या पोरट्यांनी ! पहा, आहे? नीट मुकाट्याने जेवायचे, त्या मिटक्या रे कशाला वाजवायच्या? थांब ! ! हा झारा तापवून चांगला चरचरून डाग देते तोंडाला ! दळिद्री कारटी ! खाऊन पिऊन मेली झाली आहेत पहा कशी ! मरु घातली आहेत जशी ! आलात? आज लवकर येणे केले? स्वारीचे भटकणे लवकर संपले म्हणायचे ! रोज उठून ती मेली मंडळे का फंडळे ! कर्माची करा आपल्या मंडळे ! उद्या जा तर खरे, की ही सगळी कारटी आणून तिथे उभी करते अन् पाहते तमाशा ! आले हो, आले – केव्हाच्या त्या मुरलीबाई हाकां मारीत आहेत, तेव्हा अंमळ ऐकले का? असे घुम्यासारखे बसायचे नाही ! संभाळा या कारट्यांना, नाहीतर मेली आग लावून देतील घरादाराला ! आले बाई !!” (इ.स.१९१२)

अशा प्रकारे ५ उतारे वर दिले आहेत. ते मोठ्याने वाचून आवाजाची तयारी करा. अर्थात हेच उतारे वाचले पाहिजेत असे नाही. तुम्ही स्वतःचे वेगळे उतारे निवडले तरी चालतील. पण आवाज तयार करायचा असेल तर असे काही प्रयत्न केले पाहिजेत, इतके लक्षात ठेवा.

आता काही कवितांची उदाहरणे बघूयात. पुढे कवी कुसुमाग्रज यांची एक कविता देत आहे. त्यांच्या इतर कविता त्यांचे कवितासंग्रह आणून वाचावेत अशी अपेक्षा आहे. कविता चांगली वाचता आली तर आपल्या वाचण्यात एक लय येते आणि आपले सूत्रसंचालन ऐकत राहावे असे वाटते म्हणून हा प्रयोग करून पहा.

एक कविता : प्रेमयोग ..... कवी कुसुमाग्रज

प्रेम –
कुणावर करावं?
कुणावरही करावं

प्रेम –
राधेच्या वत्सल स्तनावर करावं
कुबडेच्या विद्रूप कुबडावर करावं,
भीष्मद्रोणांच्या थकलेल्या
तीर्थरूप चरणांवर करावं,
दुर्योधन –कर्णाच्या अभिमानी
अपराजित मरणावर करावं.
प्रेम कुणावरही करावं

प्रेम-
सुदामा नावाच्या भटजीवर करावं
अर्जुन नावाच्या राजेंद्रावर करावं,
बासरीतून पाझरणाऱ्या
सप्तस्वरांच्या चांदण्यावर करावं,
यमुनेचा डोह जहरून टाकणाऱ्या
कालियाच्या फण्यावरही करावं,
प्रेम कुणावरही करावं.

प्रेम -
रुक्मिणीच्या लालस ओठांवर करावं
वक्रतुंडाच्या हास्यास्पद पोटावर करावं,
गाईच्या नेत्रातील
अथांग कारुण्यावर करवं,
मोराच्या पिसाऱ्यातील
अद्भुत लावण्यावर करावं,
प्रेम काळजाच्या नात्यावर करावं
आणि खड्गापात्यावरही करावं
प्रेम कुणावरही करावं.

प्रेम –
गोपींच्या मादक लीलांवर करावं
पेंद्याच्या बोबड्या बोलावर करावं,
यशोदेच्या दुधावर –
देवकीच्या आसवांवर –
प्रेम बलरामाच्या खांद्यावरील
नांगराच्या फाळावर करावं,
कंसाच्या काळजातील
द्वेषाच्या जाळावर करावं
ज्याला तारायचं
त्याच्यावर तर करावंच
पण ज्याला मारायचं
त्याच्यावरही करावं,
प्रेम कुणावरही करावं.

प्रेम –
योगावर करावं
भोगावर करावं.
आणि त्याहूनही अधिक
त्यागावर करावं.

प्रेम –
चारी पुरूषार्थाची झिंग देणाऱ्या
जीवनाच्या द्रवावर करावं,
आणि पारध्याच्या बाणानं घायाळ होऊन
अरण्यात एकाकी पडणाऱ्या
स्वतःच्या शवावरही करावं.
कारण –

प्रेम आहे माणसाच्या
संस्कृतीचा सारांश
त्याच्या इतिहासाचा निष्कर्ष
आणि भविष्यकालातील
त्याच्या अभ्युदयाची आशा
एकमेव !

आ) व्यायाम

आवाजाची जोपासना करण्यासाठी विविध शास्त्रशुध्द व्यायामप्रकार शिकणे अत्यंत आवश्यक असते. प्रभावी आवाजात सूत्रसंचालन, निवेदन करण्याची कला अवगत होऊ शकते. बोलणे प्रभावी झाले तर आत्मविश्वास वाढतो. कधी कधी हवामान बदल, आरोग्याच्या तक्रारी, अतिश्रम, अनावश्यक बडबड, किंवा मोठ्या आवाजात खूपवेळ बोलणे, श्वासनलिकेला सूज येणे, जिभेला किंवा ओठांना भेगा पडणे, अशा कारणांमुळे कधी कधी घसा बसला आहे, आवाज जड येतोय असे वाटते. जीभ, किंवा ओठांच्या त्रासामुळे बोलताना काही व्यंजनांचा उच्चार नीट होत नाही. दंतविहीन किंवा दातांची कवळी वापरणाऱ्या व्यक्तीचे उच्चार अस्पष्ट किंवा बोबडे ऐकू येतात. श्वासनलिकेच्या आजारामुळे फुप्फुसात कमी प्रमाणात श्वास मावत असेल तर, बोलताना श्वास कमी पडल्याने बऱ्याचदा वाक्य अर्धवटच बोलले जाते. त्यामुळे ऐकणाऱ्यांपर्यंत बोलणाऱ्याचे म्हणणे नीट पोहचू शकत नाही. काही व्यक्तींना पान, तंबाखू, इत्यादीचे व्यसन असेल तर त्यांच्या गालाच्या, जिभेच्या हालचाली मंदावतात. बोलताना तोंड पूर्ण न उघडता आल्याने उच्चार सुद्धा चुकीचे आणि अस्पष्ट होतात. उत्तम सूत्रसंचालक आणि निवेदक बनण्यासाठी हे सगळे मुद्दे लक्षात

घेऊन, आवश्यक ती काळजी घेणे खूप महत्वाचे आहे. त्यासाठी व्यायाम करण्याची नितांत आवश्यकता आहे. ज्यामुळे आवाजाचा घुमारा (Resonance), सहजता आणि पल्ला निश्चित वाढवता येतो.

उत्तम आवाज तयार करण्यासाठी, आरोग्य राखण्यासाठी काही व्यायामांचा, सूचनांचा इथे उल्लेख करूयात.

१) श्वासावर नियंत्रण मिळवण्यासाठी, श्वासाची लांबी वाढवण्यासाठी दीर्घ श्वसन, प्राणायाम या सारखे व्यायाम तज्ज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली करावेत.

२) सर्दी खोकला या सारखे आजार होणार नाहीत याची काळजी घ्यावी.

३) जिभेचे व्यायाम करणे आणि दातांची निगा राखणे महत्वाचे आहे.

४) संपूर्ण शरीर आरोग्यसंपन्न ठेवण्यासाठीही व्यायामाची आवश्यकता आहे. ज्यामुळे आत्मविश्वास वाढेल कार्यक्रमात वावरताना आपण व्यासपीठावर आहोत आणि असंख्य श्रोते, प्रेक्षक आपल्याला बघत आहेत, आपले बोलणे ऐकत आहेत याची जाणीव सूत्रसंचालकाला, निवेदकाला असावी लागते. त्यासाठी शरीर आरोग्यसंपन्न ठेवले पाहिजे.

५) मानसिक स्वास्थ्य पण तेवढेच महत्वाचे आहे. नकारात्मक विचारांना स्थान नको. कारण असे विचार लक्ष विचलित करू शकतात. यासाठी ध्यानसाधना करणेही उपयोगी पडू शकते.

६) श्वासाच्या व्यायामाबरोबरच मोठ्या आवाजात वाचन करण्याचाही नियमित सराव केला पाहिजे. रोज दहा ते पंधरा मिनिटे असा व्यायाम करावा. यातून आवाजाच्या पट्टीवर नियंत्रण मिळवता येईल. आवाज कमीजास्त करण्याची सवय होईल. त्यामुळे कविता, नाटकातील उतारे प्रभावीपणे सादर करता येतील. सरावाच्या वेळी त्याचे ध्वनिमुद्रण करणे शक्य झाल्यास करावे. त्यामुळे ध्वनिमुद्रण ऐकूनही त्यातील त्रुटी शोधता येतील, त्यात आवश्यकतेनुसार सुधारणाही करता येतील, जोड शब्द देखील बोलण्याची सवय करावी. उदा. जप्त, प्राण, धन्य,आद्य, ख्याती, सह्याद्रीच्या, अल्पोपहार, हस्ताक्षर, स्वाध्याय, वक्तव्य. इत्यादी.

इ) वाचन

सूत्रसंचालन आणि निवेदन करताना कार्यक्रमाचा विषय काय आहे, तो कशासंदर्भात केला जातो आहे हे जाणून घेतले पाहिजे. विषय कळल्यावर त्या विषयासंबंधी माहिती मिळवण्यासाठी योग्य माहिती मिळवून कार्यक्रमात सुसूत्रता आणण्यासाठी वाचन हे महत्वाचे आहे. चौफेर वाचनासाठी महत्वाचे आणि सहज उपलब्ध होणारे साधन म्हणजे दैनंदिन वर्तमानपत्र होय. यातून चालू घडामोडींची माहिती मिळते. स्वतःला अपडेट ठेवण्यासाठी हा एक सोपा मार्ग ठरू शकतो.

विविध साहित्यप्रकार जसे कथा, कादंबरी, कविता, आत्मचरित्र यांचे वाचन करावे. मराठी हिंदी संस्कृत, इंग्रजी एवढ्या भाषांची तरी ओळख असावी. वाचन करताना काही टिपणे काढावीत. आणि विषयानुसार त्यांची वर्गवारी नोंद वहीत लिहून ठेवावी वाचन करताना अनेक नवीन शब्द, त्यांचे पर्यायी शब्द किंवा त्या शब्दांच्या अर्थाचा इंग्रजी शब्द सापडतो, त्याची नोंदही करून ठेवावी. त्यांचा योग्य तिथे वापर करता येतो.

ऐतिहासिक, वैज्ञानिक, सांगीतिक कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करताना या विषयीचे संदर्भ अचूक असतील तरच त्याचा वापर करावा. कारण चुकीचा संदर्भ देणे घातक ठरू शकते. श्रोत्यांमध्ये किंवा

प्रेक्षकांमध्ये तुमच्यापेक्षा अधिक अभ्यास असणारी व्यक्ती असू शकते. अशावेळी जेवढी अचूक माहिती आहे तेवढीच सांगावी. विनोदी किस्से, भाषणातील उतारे, कवितेच्या ओळी, नाटकातील उतारे, आठवणी, सुविचार इत्यादींची ही स्वतंत्र टिपणे लिहून, नोंदवून ठेवावीत. नोंदवून ठेवलेले संदर्भ वापरताना कार्यक्रमाचे स्वरूप, सहभागी व्यक्ती किंवा संस्था, उपस्थित होणारे श्रोते किंवा प्रेक्षक यांचा वयोगट, महिला, पुरुष, लहान मुलं, जेष्ठ नागरिक, युवक-युवती, यांची पण माहिती घेऊन सूत्रसंचालनासाठी आवश्यक अशी संहिता तयार करावी. संहितेत योग्य ठिकाणी योग्य सन्दर्भ प्रस्तुत करणे ही देखील एक कला आहे. अप्रस्तूत संदर्भ घातक ठरू शकते. म्हणून या विषयी सजगता असणे आवश्यक आहे. सूत्रसंचालनाची संहिता पुस्तकी भाषेत नसावी, ती बोली भाषेतच असावी. म्हणजेच आपले उच्चार एकारान्त ऐवजी अकारान्त असावेत. उदा. मला असे वाहते ऐवजी मला असं वाटतं.

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१) सूत्रसंचालन आणि निवेदनाची पूर्वतयारी करण्यासाठीचे ठळक मुद्दे थोडक्यात सांगा?

२) आवाजाची तयारी कशी करावी हे थोडक्यात सांगा?

२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

संहिता (script) : कार्यक्रमासाठी आवश्यक माहिती, मजकुराचे सुव्यवस्थित संकलन.

आवाजाची साधना (voice culture) : आवाज कमावण्यासाठी जे प्रयत्न केले जातात ते.

घुमारा (Resonance) : काहीजणांचा आवाज गाभाऱ्यातून आल्यासारखा येतो. त्याला घुमारा असे म्हणतात. हे आवाजाचे एक वैशिष्ट्य समजले जाते.

वाचाउपचार (speech therapy) : वाणीतील दोष (उदा. अडखळणे, बोबडे बोलणे इत्यादी) सुधारण्यासाठी उपयोगात आणली जाणारी उपचारपद्धती.

थियरी (Theory) : सिद्धांत, स्पष्टीकरण, विचारसरणी.

स्वरतंतू (Vocal Cords) : ज्यांच्या कंपनामुळे ध्वनी निर्माण होतो.

२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१) सूत्रसंचालनाची किंवा निवेदनाची पूर्वतयारी करताना आवाजाची तयारी, वाचन, निरीक्षण, संदर्भ नोंदवून ठेवणे, आरोग्याची काळजी घेणे, स्पष्ट उच्चाराची सवय करणे, कार्यक्रमाचे स्थळ, स्वरूप, सहभागी तज्ज्ञ, प्रेक्षकांचा वयोगट, रंगमंचावरील व्यवस्था, ध्वनिक्षेपकव्यवस्था याची माहिती करून घेणे, कार्यक्रमाची वेळ इत्यादी सर्व बाबी लक्षात घेणे आवश्यक आहे.

२) आपल्या आवाजाची बलस्थाने आणि मर्यादा लक्षात घ्याव्या. त्यानुसार प्रस्तुती करावी. स्पष्ट शब्दोच्चार, स्वच्छ, स्पष्ट आवाज यासाठी आवश्यक ते व्यायाम आणि वाचनाचा सराव करावा. प्राणायाम, दीर्घश्वसन यासारखे व्यायाम तज्ज्ञ व्यक्तीच्या मार्गदर्शनाखाली करावेत.

२.५ सारांश

आजकाल सूत्रसंचालन हा केवळ छंद न राहता व्यवसाय झाला आहे. त्यामुळे ते कौशल्य प्राप्त करायचे असेल तर त्याचा अभ्यास करायला हवा. कारण सूत्रसंचालन हे शास्त्र आहे आणि अस्त्र देखील आहे. त्यामुळे त्याचे नियम जाणून घेतले पाहिजेत. सूत्रसंचालन आणि निवेदन यासाठी आवाज चांगला असणे गरजेचे आहे. पण ज्याचा आवाज चांगला नसेल तर त्याला हे काम करताच येणार नाही हा गैरसमज आहे. आवाजाची तयारी करता येते. त्यासाठीचे व्यायाम जाणून घेतले पाहिजेत.आपला आत्मविश्वास वाढवा म्हणून वाचन करणे गरजेचे आहे. हे सगळे केल्यावरच सूत्रसंचालनाला उभे राहावे.

२.६ सरावासाठी स्वाध्याय

१) सूत्रसंचालक –निवेदक हा कार्यक्रम आणि प्रेक्षक यातील दुवा असतो' हे स्पष्ट करा.
२) कार्यक्रमाच्या संहितालेखनाचे टप्पे स्पष्ट करा.

२.७ क्षेत्रीय कार्य

- आपल्या परिसरातील एखाद्या कार्यक्रमाची पत्रिका मिळवून त्यावरून त्या कार्यक्रमासाठी काय पूर्वतयारी करावी लागेल याच्या नोंदी करा.
- आपल्या परिसरात आयोजित केलेल्या एखाद्या कार्यक्रमाला प्रत्यक्ष हजर राहून त्याची वैशिष्ट्ये नोंदवा.

२.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) माझा आवाज : डॉ. महेश केळुस्कर, अनघा प्रकाशन, ठाणे
२) वाचिक अभिनय : श्रीराम लागू , राजहंस प्रकाशन, पुणे

घटक ३ : सूत्रसंचालन आणि निवेदनाची भाषाशैली

अनुक्रमणिका

३.० उद्दिष्टे
३.१ प्रास्ताविक
३.२ विषय-विवेचन
    ३.२.१ भाषेची जाण
    ३.२.२ भाषेचे स्वरूप
    ३.२.३ भाषेचा वापर
    ३.२.४ भाषेच्या वापरासाठी वाचनाची निकड
    ३.२.५ बोलण्याची पद्धती
    ३.२.६ शासकीय कार्यक्रमात घ्यावयाची काळजी
३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
३.५ सारांश
३.६ सरावासाठी स्वाध्याय
३.७ क्षेत्रीय कार्य
३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला –

- सूत्रसंचालनाची, निवेदनाची भाषा कशी असावी हे कळेल.
- सूत्रसंचालनात, निवेदनात भाषेतील कोणत्या साहित्यप्रकाराचा कुठे आणि कसा वापर करावा हे कळेल.
- प्रस्तुतीच्या वेळी भाषेचा पोत कसा असावा हे कळेल.
- कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार भाषा आक्रमक, मवाळ, काव्यमय की आलंकारिक हे समजेल.

३.१ प्रास्ताविक

कोणत्याही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, निवेदन करताना श्रोत्यांशी, प्रेक्षकांशी संवाद साधावा लागतो. त्यासाठी भाषा हेच मध्यम असते. आदिम काळात मानव चित्र वेगवेगळी चिन्हे या माध्यमातून एकमेकांशी संवाद साधत असे. ती चित्रभाषा होती. आजच्या जमान्यात तुमची जेन-झी पिढी इमोजीच्या माध्यमातून संवाद साधते आहे.

भाषा ही मानवी अस्तित्वाचा गाभा आहे. भाषेचा उगम हा मानवी उत्क्रांतीचा एक टप्पा आहे. आदिमानव सुरूवातीला संवाद साधण्यासाठी हावभाव (Gestural theory) आणि नंतर निसर्गातील

आवाजांची नक्कल करून संवाद साधू लागला. आदिमानवाच्या बुद्धिमत्तेचा विकास झाल्यावर, शिकारीसाठी, धोक्याची सूचना देण्यासाठी किंवा समूहाशी संवाद साधण्यासाठी एका माध्यमाची गरज भासली. त्यातूनच पुढे चित्रभाषेचा उगम झाला. गुहांच्या दगडी भिंतीवर आजही बऱ्याच ठिकाणी अशी चित्रे कोरलेली सापडतात.पण भाषेच्या आगमनानंतर संवादाला व्यापक स्वरूप मिळाले. विचारप्रकियेला गती मिळाली. सर्जनशीलतेला वाव मिळाला आणि सामाजिक जीवन अधिक संघटित झाले. संस्कृतीचे संवर्धन आणि पिढ्यांपिढ्याची विचार परंपरा हे भाषेमुळेच शक्य झाले. भाषा ही सांस्कृतिक, सामाजिक राजकारणाचा अविभाज्य भाग आहे. ती ओळख घडवते, समाजाची दिशा ठरवते आणि मूल्यव्यवस्था टिकवते. यावरून भाषेचे महत्त्व आपल्या लक्षात येईल.

मानवाच्या मेंदूचा, बुद्धिमत्तेचा विकास होत गेला. त्यातून विविध भाषांचा विकास होत गेला. प्रदेशानुसार त्यात वेगळेपणा येत गेला. असे म्हणतात की, 'दर बारा कोसावर भाषा बदलते.' म्हणजे त्या भाषेतील शब्द, उच्चाराच्या पद्धती, अर्थाच्या विविध छटा आपल्याला दिसून येतात.

भारताच्या नॉर्थइस्टच्या डोंगराळ भागात 'मेघालय' मध्ये 'काँ गथाँ गया गावात शीळ म्हणजे तोंडाने शिट्टी वाजवून संवाद साधतात. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे तिथली प्रत्येक आई आपल्या बाळाच्या जन्मानंतर त्या बाळासाठी 'विशिष्ट धून' तयार करते. बाळ मोठे झाल्यावर ती धून त्याला शिकवली जाते. पुढे आयुष्यभर ती शीळ / धून किंवा स्वररचना त्या व्यक्तीची ओळख (identity) ओळख बनते. इतर कुणीही त्या स्वररचनेचा वापर करीत नाही. प्रत्येकाची व्यक्तिगत धून / स्वररचना / शीळ या स्वर भाषेतर्फे आजही एकमेकांशी संवाद साधतात. सूचना, संदेश एकमेकांपर्यंत पोहोचवतात. 'व्हिसलिंग व्हिलेज' म्हणून हे 'काँ गथाँ ग गाव प्रसिद्ध आहे. आजही तिथे दूरवर संवाद साधण्यासाठी (लाँ ग डिस्टन्स कम्युनिकेशन) शीळ/ ट्युन्सचा वापर केला जातो.

सूत्रसंचालनाच्या बाबतीत बोलायचे झाल्यास कोणताही कार्यक्रम केवळ आयोजनामुळे यशस्वी होत नाही तर श्रोत्यांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रभावी पद्धतीमुळे यशस्वी ठरतो. सूत्रसंचालन आणि निवेदन हा त्या कार्यक्रमाचा आत्मा मानला जातो. योग्य शब्दांची निवड, स्पष्ट उच्चार, भावनांना साजेशी अभिव्यक्ती आणि प्रसंगानुरूप भाषाशैली यामुळे कार्यक्रम अधिक आकर्षक आणि संस्मरणीय बनतो.

३.२ विषय-विवेचन

सूत्रसंचालक हा कार्यक्रमाचा दुवा असतो हे आपण पाहिलेले आहेच. तो प्रेक्षक श्रोते आणि मंच यांना जोडण्याचे काम करतो. त्यामुळे त्याची भाषा साधी, सुबोध, प्रभावी, आणि श्रोत्यांना गुंगवून ठेवणारी असावी. निवेदन करताना प्रसंगानुसार गंभीरता, विनोद, उत्साह किंवा आदरभाव यांचा योग्य समतोल राखणे गरजेचे असते. म्हणूनच हा घटक अभ्यासताना भाषेचे सौंदर्य, शुद्धता, सुसंगती, आणि परिणामकारकता या बाबींचा सखोल विचार करणे आवश्यक ठरते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, निवेदन करताना श्रोते, प्रेक्षक यांच्याशी संवाद साधताना 'भाषा' हे माध्यम असते हे आपण सुरूवातीलाच पाहिले. या भाषेची तयारी करताना कुठले मुद्दे लक्षात ठेवायचे हे आता आपण बघुयात.

३.२.१ भाषेची जाण

आपल्याला ज्या भाषेत कार्यक्रम करायचा आहे ती भाषा आपल्याला चांगली लिहिता/वाचता आणि बोलता आली पाहिजे. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि एखादी प्रादेशिक भाषा नक्कीच लिहिता, वाचता, बोलता यायला हवी. कार्यक्रमाचे स्वरूप, सहभागी वक्ते, प्रेक्षक आणि कार्यक्रमाचा विषय या नुसार भाषेची निवड करावी लागते.

३.२.२ भाषेचे स्वरूप

कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार भाषेचे स्वरूप ठरते. सूत्रसंचालनाची / निवेदनाची भाषा प्रभावी, ओघवती, सुसंस्कृत आणि कार्यक्रमाच्या स्वरूपाला साजेशी असावी लागते. भाषा साधी आणि सोपी असावी. ज्यामुळे कार्यक्रमाचा गाभा प्रेक्षकांच्या लगेच लक्षात येईल. निवेदनाची भाषा सर्वसामान्य प्रेक्षकांना, श्रोत्यांना समजेल अशी असावी. बोलण्यात एक प्रकारचा उत्साह असावा. वाचताना स्पष्ट शब्दोच्चारांकडे लक्ष द्यावे. वाचनाची लय थोडी कमी केल्यास उच्चारांची स्पष्टता वाढू शकेल.

३.२.३ भाषेचा वापर

एखाद्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना भाषेचा वापर कशाप्रकारे करावा हे एक कौशल्य आहे. जर आपला भाषेचा अभ्यास असेल, ज्या भाषेत आपल्याला सादरीकरण करायचे असेल त्या भाषेतील साहित्याचे वाचन असेल तर आपल्यामध्ये भाषिक समृद्धी असते. त्याचा उपयोग करून आपण आपले निवेदन फुलवू शकतो. आकर्षक शब्दांचा आणि वाक्यरचनेचा वापर करून कार्यक्रम रंजक बनवता येतो. आता आपल्या निवेदनातील भाषा शुद्ध असावी की त्यात इंग्रजी शब्दांचा वापर केलेला चालेल असा प्रश्न तुमच्या मनात येऊ शकतो. तर त्याचे उत्तर असे की, शुद्ध मराठीसह आवश्यकतेनुसार हिंदी किंवा इंग्रजी शब्दांचा वापर करणे चांगले समजले जाते. विशेषत: जर हिंदी चित्रपट गीतांचा कार्यक्रम असेल आणि तो तुम्ही सूत्रात गुंफणार असाल तर मधून मधून हिंदी गाण्यांच्या ओळी, शेरोशायरी याचा वापर अवश्य करावा. याचा अर्थ असा की, गरजेनुसार, प्रसंगावधान राखून भाषेचा वापर करायचा असतो. भाषा अस्खलित आणि व्याकरणदृष्ट्या शुद्ध असावी. शब्दांच्या उच्चारानुसार शब्दांचे अर्थ बदलतात. उदा. 'संचालन' आणि 'संचलन' हे दोन वेगवेगळे शब्द आहेत. 'संचालन' म्हणजे एखाद्या कार्यक्रमाचे नेतृत्व करून, त्याची सगळी सूत्र आपल्या हातात घेऊन तो सुविहितपणे प्रस्तुत करणे. तर 'संचलन ' (March Past) या शब्दाचे दोन अर्थ होतात. १) सैनिकांची शिस्तबद्ध पद्धतीने आणि एकाच तालावर, एकाच हुकुमावर केली जाणारी सांघिक शारीरिक हालचाल होय. सैन्यात किंवा शाळेत देशभक्तीपर गीतांच्या तालावर, एका सूत्रात राहून केलेली हालचाल (परेड) म्हणजे संचलन होय. २) सरकारी प्रणाली मध्ये 'योजना संचलन' असाही उल्लेख केला जातो त्याचा अर्थ सरकारी योजनांचे व्यवस्थापन किंवा अंमल बजावणी असा होतो. या वरून भाषेचा वापर करताना किती सावधानता बाळगली पाहिजे हे आपल्या लक्षात येईल.

३.२.४ भाषेच्या वापरासाठी वाचनाची निकड

आपल्याला ज्या भाषेत कार्यक्रम सादर करायचा असेल त्यातील साहित्य वाचले पाहिजे हे आपण वर बघितलेच. त्या भाषेतील म्हणी, वाक्प्रचार, कवितेच्या ओळी. एखाद्या लेखकाच्या लिखाणातील विषयाला अनुसरून मजकूर आपल्या निवेदनातून पेरला गेला पाहिजे. अर्थात हा मजकूर आवश्यकतेनुसारच घ्यावा. त्याचा अतिरेक होता उपयोगाचा नाही. आपल्या निवेदनाची भाषा सहज सोपी असावी. खूप अवजड, अलंकारिक शब्द वापरले तर सुरूवातीला प्रेक्षकांना ते आवडेल देखील पण त्याचा अतिरेक झाला तर मात्र प्रेक्षक कंटाळण्याची शक्यता असते. कारण तुमचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाहीत. संवाद प्रस्थापित होण्यात अडचणी येतात. याचे एक उदाहरण बघू. समजा आपल्याला १ मे ला महाराष्ट्र दिनाचा कार्यक्रम करायचा आहे. तर त्याची सुरूवात कविवर्य वसंत बापट यांच्या या चार ओळींनी करता येईल . त्या ओळी अशा...

भव्य हिमालय तुमचा आमचा, केवळ माझा संह्यकडा.
गौरी शंकर उभ्या जगाचा, मनात पूजीन रायगडा.
तुमच्या आमच्या गंगा यमुना, केवळ माझी भिवरथडी
प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी ||

या शिवाय महाराष्ट्रावरील प्रेम अजून दुसऱ्या कोणत्या पद्धतीने चांगले व्यक्त करता येऊ शकेल? समजा आपल्याला मराठी भाषादिनाच्या कार्यक्रमाचे निवेदन करायचे आहे, तर मराठी भाषेसंबंधी ची काही कोटेशन्स किंवा कवितेच्या ओळी सुरवातीला वापरता येतील, उदा. फादर थॉमस स्टीफन्स यांच्या ख्रिस्त पुराण मधील या ओळी बघा...

जैसी दीपांमाझि दिवटी | का तिथींमासी पूर्णिमा गोमटी|
तैसी भाषांमध्ये मऱ्हाटी सर्वोत्तम ||
जैसी सरितांमध्ये गोदावरी | का पर्वतांमध्ये रत्नागिरी |
तैसी भाषांमध्ये साजरी | मऱ्हाटी पै ||
तिथी मध्ये काशी | व्रतांमध्ये एकादशी |
तैसी भाषांमध्ये सोज्वळ | शोभिवंत दिसे ||
परिमळांमध्ये कस्तुरी | का अंबरामध्ये शंबरारी |
तैसी मऱ्हाटी सुंदरी| भाषांमध्ये ||

या ओळींनी त्या कार्यक्रमाची सुरूवात केली तर त्याची उंची नक्कीच वाढेल. आता आपण नेहमीचे उदाहरण पाहू. मराठी भाषा गौरव दिन म्हटले की, संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या या ओळी हमखास वापरल्या जातात. पण त्या ही तुम्हाला माहितीसाठी देतो.

त्या कार्यक्रमाची सुरुवात तुम्ही अशी करू शकता.

मान्यवर उपस्थित सज्जनहो,

मराठी भाषेचा गोडवा, तिचे माधुर्य आणि तिचा अभिमान व्यक्त करणाऱ्या संत परंपरेत एक तेजस्वी नाव म्हणजे संत ज्ञानेश्वर. लोकभाषेतून ज्ञानाचा वर्षाव करणाऱ्या संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी या ग्रंथातून

मराठी भाषेला अद्वितीय असे सौंदर्य आणि गौरव प्राप्त करून दिला. मराठीच्या त्या माधुरतेचे वर्णन करताना ते अत्यंत प्रेमाने म्हणतात,

माझा मराठाची बोलू कौतुके | परी अमृतातेही पैजा जिंके |
ऐसी अक्षरे रसिके | मेळवीन ||

अशा ओवीतून मराठी भाषेचा गोडवा आणि अभिमान व्यक्त होताना दिसतो. या भाषेतील शब्द इतके गोड आहेत की त्यातून ज्ञान आणि आनंद दोन्हीही मिळतात. ज्ञानेश्वरांच्या काळात विद्या आणि धर्मग्रंथ प्रामुख्याने संस्कृतमध्ये होते. सामान्य माणसाला ते समजणे कठीण होते. पण संत ज्ञानेश्वरांनी धाडसाने संस्कृतमधील भगवत गीतेचा अर्थ मराठी भाषेत सांगीताला. त्यामुळे ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लोकांच्या घराघरात पोहोचला आणि मराठी भाषेला एक नवे वैभव प्राप्त झाले. आज त्याच मराठी भाषेच्या गौरवार्थ आपण इथे जमलेलो आहोत. ..... वगैरे

अशी सुरूवात आपण करू शकतो. काही कवितांच्या ओळी त्या कुठे आणि कशा वापरायच्या हे ज्याचे त्याने ठरवावे. आणि वाचन करताना अशा काही नोंदी करून ठेवाव्यात.

कणा : कवी कुसुमाग्रज

“ओळखलंत का सर मला’ - पावसात आला कोणी
कपडे होते कर्दमलेले केसावरती पाणी
क्षणभर बसला नंतर हसला बोलला वरती पाहून
‘गंगामाई पाहुणी आली, गेली घरट्यात राहून;
माहेरवाशीण पोरीसारखी चार भिंतीत नाचली
मोकळ्या हाती जाईल कशी बायको मात्र वाचली -
भिंत खचली चूल विझली होते नव्हते नेले
प्रसाद म्हणून पापण्यांमध्ये पाणी थोडे ठेवले -
कारभारणीला घेऊन संगे सर, आता लढतो आहे
पडकी भिंत बांधतो आहे, चिखलगाळ काढतो आहे.’
खिशाकडे हात जाताच हसत हसत उठला,
‘पैसे नकोत सर, जरा एकटेपणा वाटला -
मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा
पाठीवरती हात ठेवून नुसते लढ म्हणा.’

आपण अशा ओळी, उतारे वाचून नोंदवून ठेवावेत. त्या साठी वाचन करणे आवश्यकच आहे.

३.२.५ बोलण्याची पद्धती

सूत्रसंचालन करताना बोलण्याची पद्धत हीच तुमची ओळख ठरते. कोणत्याही कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना बोलण्याची गती योग्य असली पाहिजे. स्वागतासाठी योग्य गतीने बोलावे. तर शोक प्रसंगी शांत आणि संयत गतीने बोलावे. खूप गडबडीने, घाईने बोलले तर तुमचे म्हणणे लोकांपर्यंत पोहोचणार नाही आणि तुमचा आणि प्रेक्षकांचा संवादच प्रस्थापित होऊ शकणार नाही. जर तसा संवाद

प्रस्थापित झाला नाही तर मग प्रेक्षकांचा कार्यक्रमातील रस निघून जाईल. ते त्या कार्यक्रमाशी मनाने जोडले जाणार नाहीत. उदा. एखाद्या कार्यक्रमात निवेदक पाहुण्यांचे स्वागत करताना ' मी .... यांचे शब्द सुमनांनी स्वागत करतो.' असे म्हणतो. जर हाच शब्दसंच निवेदक सारखा वापरू लागला तर काही वेळानंतर प्रेक्षकांमधून प्रतिक्रिया येण्याची शक्यता असते. आणि मग सभागृहात हशा पिकण्याची शक्यता असते. त्यामुळे ज्या शब्दांचा अर्थ आपल्याला माहिती नाही अशा शब्दांचा वापर करू नये. काहींना बोलताना शेवटचे शब्द गिळून टाकायची सवय असते ते टाळावे. हजर असलेल्या पाहुण्यांची नावे उच्चारायला अवघड असल्यास त्याचा आधी सराव करून घ्यावा. आवाजात चढउतार असावेत. (Voice Modulation) एकाच सुरात बोलणे टाळावे. महत्त्वाच्या मुद्दावर जोर द्यावा. आनंद, आदर, उत्साह आणि गांभीर्य यानुसार आवाजात बदल करावा. बोलताना आत्मविश्वास दिसला पाहिजे. भाषा सभ्य, नम्र, आणि आदरयुक्त असावी. 'कृपया' ' आदरपूर्वक' 'मन:पूर्वक स्वागत' असे शब्द प्रसंगानुरूप वापरावेत. प्रसंगी हलका विनोद सांगावा. तसे विनोद आपल्या संग्रही असले पाहिजेत. बोलताना कृत्रिमपणा टाळावा. स्वतःच्या शैलीत, सहज, नैसर्गिकपणे बोलावे. अति नाटकीपणा टाळावा.आपण लिहिलेला मजकूर आधी वाचून, समजून, सराव करून घ्यावा. शक्य असल्यास आरशासमोर किंवा मोबाईलवर रेकॉर्ड करून सराव करावा.

३.२.६ शासकीय कार्यक्रमात घ्यावयाची काळजी

आपल्याला एखाद्यावेळी शासकीय कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करावे लागते. त्यावेळी काही पथ्ये पाळावी लागतात. सूत्रसंचालकाचा या कार्यक्रमात कस लागतो. शासकीय कार्यक्रमात प्रामुख्याने उद्घाटन समारंभ, पुरस्कार सोहळा, भूमिपूजन समारंभ, जयंती-पुण्यतिथी, यांचा समावेश असतो. शासकीय कार्यक्रमात राज्यपाल, मुख्यमंत्री, खासदार, आमदार उपस्थित असले तर त्यांचा वरिष्ठताक्रम (protocol) पाळावा लागतो. उपस्थितांची नावे सांगताना कुणानंतर कुणाचा क्रम यालाही महत्व दिलं जातं. तिथे सत्कार केले जातात. त्यावेळी कुणाच्या हस्ते कुणाचा सत्कार यालासुद्धा महत्व असते. अशा कार्यक्रमात तुम्ही ठरवलेली रूपरेषा गडबडण्याची शक्यता असते. कारण एखादा महत्त्वाचा पाहुणा लवकर जाणार असतो, तर एखादा महत्त्वाचा पाहुणा उशिरा दाखल होतो. अशावेळी काय करावे लागेल याचाही विचार करून ठेवलेला असावा. अशा कार्यक्रमात संदर्भाशिवाय बोलणे टाळावे. कुणाच्या भावना दुखावणार नाहीत याची काळजी घ्यावी. धार्मिक किंवा राजकीय भाष्य टाळावे. हातातील कागदाकडे बघून बोलणे टाळावे. त्यामुळे मंचावरील महत्त्वाच्या व्यक्तींकडे किंवा प्रेक्षकांकडे आपण दुर्लक्ष करतो आहोत असे वाटणार नाही.

स्वयं-अध्ययन प्रश्न -१

रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.

१) सूत्रसंचालन, निवेदन याची भाषा प्रभावी ----------,---------- असावी.
२) भाषा ---------- आणि ---------- शुद्ध असावी.
३) ----------आणि ---------- हे वेगळे शब्द आहेत.
४) गंभीर कार्यक्रमात ----------, ---------- किंवा ---------- भाष्य टाळावे.

३.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

Symbols : प्रतीक, चिन्ह.

Gestured theory : हावभाव, अशाब्दिक संवाद.

Identity : व्यक्तित्व, ओळख.

Speed : लय, गती.

March past : मानवंदना, संचलन.

Voice Modulation : आवाजातील चढउतार.

Protocol : वरिष्ठता क्रम

३.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न -१

१) ओघवती, सुसंस्कृत, २) अस्खलित, व्याकरणदृष्ट्या, ३) संचालन, संचलन, ३) अनावश्यक विनोद, राजकीय, धार्मिक.

३.५ सारांश

आपल्याला ज्या भाषेत कार्यक्रम करायचा आहे ती भाषा आपल्याला चांगली लिहिता, वाचता आणि बोलता आली पाहिजे. कार्यक्रमाच्या स्वरूपानुसार भाषेचे स्वरूप ठरते. भाषा साधी आणि सोपी असावी. सूत्रसंचालन करताना भाषेचा वापर कशा प्रकारे करावा हे कौशल्य आहे. आकर्षक शब्दांचा आणि वाक्यरचनेचा वापर करून कार्यक्रम रंजक बनवता येतो. सूत्रसंचालन करताना बोलण्याची पद्धत हीच तुमची ओळख बनते.

३.६ सरावासाठी स्वाध्याय

१) सूत्रसंचालनासाठी भाषेची तयारी करताना लक्षात घ्यावयाचे ठळक मुद्दे कोणते?

२) आवाजाची तयारी कशी करावी हे थोडक्यात लिहा.

३.७ क्षेत्रीय कार्य

- भक्तीसंगीताच्या कार्यक्रमाला हजर राहून त्या कार्यक्रमाच्या संहितेची मांडणी कशी केली जाते आणि त्यातील भाषेचा वापर कसा होता याची नोंद करा.
- आपल्या परिसरात आयोजित केलेल्या व्याख्यानमालेच्या कार्यक्रमाला हजर राहून त्यातील विषय नोंदवून ठेवा.
- तुमच्या आवडीची गीते, अभंग निवडून त्याच्या सादरीकरणाची संहिता लिहून पहा.

३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) माझा आवाज : डॉ. महेश केळुस्कर, अनघा प्रकाशन, ठाणे

२) वाचिक अभिनय : श्रीराम लागू , राजहंस प्रकाशन, पुणे

घटक ४ : सरावासाठी नमुने

अनुक्रमणिका

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय-विवेचन
    ४.२.१ कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका
    ४.२.२ प्रा. रमेश तेंडूलकर विशेषांकाच्या प्रकाशनाची पत्रिका, संहिता आणि इतर नमुना संहिता.
४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
४.५ सारांश
४.६ सरावासाठी स्वाध्याय
४.७ क्षेत्रीय कार्य
४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला –

- आपण या घटकात कार्यक्रम पत्रिकेचे नमुने पाहणार आहोत, त्यावरून तुम्हाला कार्यक्रमाचे प्रकार कळायला मदत होईल.
- पुढे आपण संहिता पाहणार आहोत, त्यावरून तुम्हाला संहिता लेखन कसे करायचं ते कळेल.

४.१ प्रास्ताविक

आपण पहिल्या तीन घटकातून सूत्रसंचालन आणि निवेदन याचे स्वरूप आणि व्याप्ती काय आहे ते पाहिले आहे. त्याच घटकातून सूत्रसंचालनाची पूर्वपीठिका ही पाहिली आहे. सूत्रसंचालनासाठी संवाद कौशल्याची आवश्यकता कशी आहे याचाही आपण अभ्यास केलेला आहे. दुसऱ्या घटकातून सूत्रसंचालन आणि निवेदन याची पूर्वतयारी कशी करायची हे आपण शिकलेलो आहोत. त्या घटकातून सूत्रसंचालकाची भूमिका, त्यासाठी आवश्यक गुण, सूत्रसंचालन यशस्वीपणे करण्यासाठी कोणते गुण आवश्यक आहेत आणि कार्यक्रमानुसार प्रकारही आपण पाहिले आहेत. आता या घटकात आपण वेगवेगळ्या कार्यक्रमांच्या पत्रिका बघणार आहोत. त्यापैकी काही कार्यक्रमांच्या प्रत्यक्ष संहिता (script) नमुना म्हणून अभ्यासणार आहोत. त्या संहितांचे निरीक्षण करून त्यातील वैशिष्ट्ये देखील नोंदवणार आहोत. त्यामुळे आपणास सूत्रसंचालनाची प्रत्यक्ष संहिता कशी असेल याची माहिती मिळेल आणि त्या माहितीच्या आधारे आपण संहिता तयार करताना कोणत्या गोष्टींकडे लक्ष दिले पाहिजे हेही लक्षात येईल.

४.२ विषय-विवेचन

प्रत्यक्ष नमुना संहिता अभ्यासण्यापूर्वी आपण वेगवेगळ्या कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिकांचे नमुने अभ्यासणार आहोत. त्यावरून आपल्याला कार्यक्रमाच्या पत्रिका कशा असतात हे लक्षात येईल. कार्यक्रमाचे प्रकार लक्षात येतील. या आधीच्या घटकातून शिकलेल्या माहितीशी आपणास त्या पडताळून पाहता येतील. आणि प्रत्येक प्रकारच्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्ये नोंदवता येतील.

४.२.१ कार्यक्रमाच्या निमंत्रण पत्रिका







Sahitya Akademi

Ministry of Culture
Government of India

साहित्य अकादेमी
आयोजित
कविसंधि
कार्यक्रम में

सुप्रसिद्ध मराठी कवि
अरूण म्हात्रे

अपनी कविताओं का पाठ करेंगे,
आप सादर आमंत्रित हैं.

शुक्रवार, 06 जून 2025,
सायं. 5.30 बजे

स्थान : साहित्य अकादेमी सभागार,
172, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग,
दादर (पूर्व), मुंबई - 400 014.

चाय : सायं. 5.00 बजे

साहित्य अकादेमी
आयोजित
कवीसंधी
कार्यक्रमांतर्गत

सुप्रसिद्ध मराठी कवी
अरुण म्हात्रे


यांचे कविता वाचन, आपण आवश्यक
उपस्थित रहावे ही विनंती.

शुक्रवार, 06 जून 2025,
संध्या. 5.30 वा.

स्थळ : साहित्य अकादेमी सभागृह,
172, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय मार्ग,
दादर (पूर्व), मुंबई - 400 014.

चहा : संध्या. 5.00 वा.

उत्तरापेक्षी : 022-24135744, 24147650
ई-मेल : secretary@sahitya-akademi.gov.in
po-romumbai@sahitya-akademi.gov.in
वेबसाईट : http://www.sahitya-akademi.gov.in



मौज प्रकाशन गृह, मुंबई
आणि
मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, दादर
'शतकोत्तर रौप्य महोत्सव उपक्रमांतर्गत'
यांच्या संयुक्त विद्यमाने

डॉ. प्रदीप कर्णिक लिखित
क्रोधें उत्पाटिला बळें
या कादंबरीचे प्रकाशन

हस्ते :
कथा-कादंबरीकार
श्री. भारत सासणे
अध्यक्ष : ९५वे अखिल भारतीय
मराठी साहित्य संमेलन

वक्ते :
ज्येष्ठ अनुवादक
श्री. चंद्रकांत भोंजाळ
समीक्षक, संशोधक
डॉ. नितीन रिंढे
कवयित्री
सुनंदा भोसेकर

सूत्रसंचालन :
लेखिका
राणी दुर्वे

सर्वांना आग्रहाचे आमंत्रण

शनिवार, दिनांक १७ डिसेंबर २०२२ रोजी
संध्याकाळी ५ वाजता.
स्थळ : शारदा मंगल सभागृह, मुंबई मराठी
ग्रंथ संग्रहालय, दादर (पूर्व), नायगाव,
मुंबई : ४०० ०१४.

रवींद्र गावडे
प्रमुख कार्यवाह,
मुंमग्रंस, दादर

श्रीकांत भागवत
मौज प्रकाशन गृह,
विलेपार्ले



मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय
दादर (पूर्व), मुंबई - ४०००१४.
मराठी अभ्यास केंद्र
व
साने गुरुजी बालविकास मंदिर

वरील तिन्ही संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पूज्य साने गुरुजी यांची
१२६ वी जयंती व मराठी भाषा पंधरवड्याच्या निमित्ताने
समयोचित व्याख्यान

"माझी भाषा, माझी शाळा"

कार्यक्रमाचे अध्यक्ष : **डॉ. भालचंद्र मुणगेकर** (ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ)
प्रमुख वक्ते : **डॉ. दीपक पवार** (अध्यक्ष : मराठी अभ्यास केंद्र)
: **श्रीमती चिन्मयी सुमीत**
(ज्येष्ठ अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छा दूत)
कार्यक्रमाची वेळ : **गुरुवार दि. २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता**
कार्यक्रमाचे स्थळ : **मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे सुरेंद्र गावस्कर सभागृह, दुसरा मजला, दादर अग्निशमन दलाच्या मागे, दादर (पूर्व), नायगांव, मुंबई - ४०० ०१४.**

कार्यक्रमात 'बालविकास मंदिर' मासिकाच्या 'पूज्य साने गुरुजी जयंती विशेषांका'चे प्रकाशन करण्यात येईल.

विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक, संस्था चालक सर्वांनीच या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाचा लाभ घ्यावा.

टीप : ज्येष्ठ नागरिकांसाठी लिफ्टची सुविधा उपलब्ध

नमस्कार,

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मराठी अभ्यास केंद्र आणि साने गुरुजी बाल विकास मंदिर या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने पूज्य साने गुरुजींची १२६ वी जयंती व मराठी भाषा पंधरवड्याचे औचित्य साधून गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजता "माझी भाषा, माझी शाळा" हा बहारदार कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मराठी शाळांतील मुले, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक, सर्वांचाच सहभाग अपेक्षित आहे.

या कार्यक्रमामध्ये माध्यमिक शाळांमधील विद्यार्थी, शिक्षक, पालक, मुख्याध्यापक आणि संस्थाचालक यांचे स्वागत आहे. कार्यक्रमाचे सर्वसाधारण स्वरूप पुढीलप्रमाणे असेल:

- ज्येष्ठ अभिनेत्री आणि मराठी शाळांच्या सदिच्छा दूत चिन्मयी सुमीत या मुलांशी "मराठी शाळेचे महत्त्व" या विषयावर संवाद साधतील. तसेच त्या साने गुरुजींच्या लेखनातील एका उताऱ्याचेअभिवाचन करतील.
- विज्ञान, गणित, इंग्रजी, भाषा, समाजशास्त्र आणि ओरिगामी या विषयांचे तज्ज्ञ मुलांना हे विषय आनंददायी आणि परिणामकारक पद्धतीने कसे शिकता येतील, याबद्दल प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन करतील.
- मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष डॉ. दीपक पवार " मराठी शाळांपुढील प्रश्न आणि शाळा व पालकांची जबाबदारी " या विषयावर मनोगत व्यक्त करतील.

ज्यांनी आपल्या पाल्यांना मराठी माध्यमाच्या शाळांमध्ये पाठवले आहे त्यांनी आपल्या मुलांसह यावेच आणि ज्यांची मुले मराठी माध्यमाच्या शाळेत शिकत नसतील, त्यांनीही मराठी शाळांमध्ये घडणाऱ्या नावीन्यपूर्ण उपक्रमांची माहिती मिळवण्यासाठी उपस्थित राहावे.

सर्वसामान्य नागरिकांच्या मनात आपल्या भाषेबद्दल जसे प्रेम असते, तसेच ती भाषा रसाळपणे आणि आपुलकीने लोकांसमोर मांडणाऱ्या साने गुरुजींबद्दलही आदर आहे. म्हणूनच साने गुरुजींची जयंती आणि मराठी भाषा पंधरवडा यांचा एकत्रित विचार करून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. सर्व शाळांना, संस्थाचालकांना तसेच महानगरपालिकेतील शिक्षक आणि शैक्षणिक अधिकाऱ्यांना यासाठी आवर्जून आमंत्रण देत आहोत.

आपले,
रविंद्र गावडे (प्रमुख कार्यवाह, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय)
डॉ. दीपक पवार (अध्यक्ष, मराठी अभ्यास केंद्र)
यशवंत ब. क्षीरसागर (अध्यक्ष, साने गुरुजी बालविकास मंदिर)

विद्यार्थी मित्रानो, काही कार्यक्रमांच्या निमंत्रण पत्रिका या आधीच्या पानांवर छापल्या आहेत. त्या नमुना म्हणूनच छापल्या आहेत. त्या पाहून सूत्रसंचालकाला कशी तयारी केली पाहिजे, हे आता आपण थोडक्यात बघणार आहोत. म्हणजेच निमंत्रण पत्रिकेवरून सूत्रसंचालकाला संयोजकांच्या सल्ल्याने प्रत्यक्ष कार्यक्रमासाठीची कार्यक्रमपत्रिका तयार करावी लागेल.

१) पहिली पत्रिका ज्यूलियन, ग्रेस, खानोलकर... या कवींच्या कविताविषयक कार्यक्रमाची आहे. हा कार्यक्रम 'संगीत सभा' बांद्रा इस्ट या संस्थेने आयोजित केलेला आहे. संगीतसभेच्या सभासदांना तो कार्यक्रम मोफत आहे, आणि इतरांसाठी प्रवेशशुल्क १००/-रुपये असे ठेवले आहे. यात काही गायक गायिकांचा देखील सहभाग आहे. या सगळ्यावरून हा संगीत विषयक कार्यक्रम आहे हे आपल्या लक्षात आले पाहिजे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्याची जबाबदारी तुमच्यावर आली तर प्रथम तुम्हाला यातील ३ कवींच्या कवितेविषयी माहिती मिळवावी लागेल. तसेच या कार्यक्रमात त्यांच्या कोणत्या कविता निवडल्या आहेत? त्या कोण गाणार आहेत? हेही तुम्हाला जाणून घेतले पाहिजे. कारण त्या त्या कवितेविषयी तुम्हाला निवेदन करताना बोलावे लागणार आहे. हे सगळे झाल्यावरच संहिता लिहिण्यासाठी घ्यावी. त्या कार्यक्रमाची ध्वनी व्यवस्था देखील कार्यक्रमाआधी तपासून घेतली पाहिजे. संगीताच्या कार्यक्रमात ध्वनिव्यवस्था ही खूप महत्वाची असते हे लक्षात ठेवावे.

२) दुसरी कार्यक्रम पत्रिका देखील संगीतविषयक कार्यक्रमाचीच आहे माणिक वर्मा यांच्या 'स्वर शताब्दी'च्या निमित्ताने 'माणिक वर्मा फौंडेशन' आणि ' ITC संगीत रिसर्च ॲकॅडमी' यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केला आहे. हा कार्यक्रम 'महाराष्ट्र आणि कलकत्ता येथील कलाकारांचा २ दिवसीय संगीत महोत्सवाचा आहे. 'माणिक स्वर संगीत'असे त्या कार्यक्रमाचे शीर्षक आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी जर तुमच्यावर आली तर प्रथम तुम्हाला या दोन्ही आयोजक संस्थांच्या कार्याची माहिती करून घेतली पाहिजे. यात सहभागी होणारे सर्व कलाकार मान्यवर आहेत. त्यांची माहिती मिळवली पाहिजे. ते काय सादर करणार आहेत हे ही जाणून घेतले पाहिजे. त्यांच्या विषयी बोलताना त्यांच्या सन्मान राखला जाईल अशीच भाषा वापरली गेली पाहिजे. त्या प्रत्येक कलाकाराचे वैशिष्ट्य देखील माहिती असले पाहिजे. इतकी सगळी तयार झाल्यावर मगच तुम्ही संहिता लिहायला घेतली पाहिजे. ती लिहून झाल्यावर संयोजकांपैकी महत्वाच्या व्यक्तीला ती दाखवली पाहिजे. शक्यतो सहभागी होणाऱ्या कलावंतांना देखील ती दाखवावी. त्यांच्या संबंधातील माहितीतील संदर्भ चुकू नयेत म्हणून ही काळजी घेतली जावी. जर त्यात त्यांनी काही बदल सुचवले तर ते आपल्या संहितेत करून घेतले पाहिजेत. जर कार्यक्रमाआधी थोडी तालीम करता आली तर सोन्याहून पिवळे. त्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढायला मदतच होईल.

३) तिसरी पत्रिका ही 'साहित्य अकादमी' या सारख्या प्रतिष्ठित संस्थेच्या कार्यक्रमाची आहे. 'साहित्य अकादमी' ही केंद्रीय पातळीवर काम करणारी संस्था आहे हे तुम्हाला माहिती असले पाहिजे. त्या संस्थेच्या महाराष्ट्रातील शाखेने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. तो मराठीतील प्रसिद्ध कवी अरूण म्हात्रे यांच्या कवितावाचनाचा कार्यक्रम आहे. इथे एकच व्यक्ती सादरीकरण करणार असल्याने तुमच्यावरील जबाबदारी वाढलेली आहे हे लक्षात घ्यावे. यात संगीत नाही. त्यामुळे हा कार्यक्रम रंगवण्याची जबाबदारी तुमच्यावर आणि कवी अरुण म्हात्रे यांच्यावरच आहे. तुम्ही अरुण म्हात्रे यांच्या कविता पूर्वीच वाचलेल्या असतील तर तुमचे काम सोपे होईल. पण जर वाचल्या नसतील तर मात्र तुम्ही त्यांचे कवितासंग्रह मिळवून वाचले पाहिजेत. त्यांच्या विषयी

त्यांनी आणि इतरांनी काय म्हटले आहे हे देखील पाहिले पाहिजे. मग त्यांच्याशी बोलून ते या कार्यक्रमात कोणत्या कविता सदर करणार आहेत हे जाणून घेतले पाहिजे. 'साहित्य अकादमी'च्या उपक्रमाविषयी देखील तुम्हाला सुरूवातीला काही बोलावे लागेल. ते त्या संस्थेच्या प्रतिनिधींकडून जाणून घेतले पाहिजे. काही भाग हिंदीत देखील सादर केला जाईल. तेंव्हा तुम्हाला हिंदीत निवेदन करावे लागेल. ही तयारी केल्यावरच तुम्ही आत्मविश्वासाने कार्यक्रम सादर करू शकाल.

४) चौथी पत्रिका ही डॉ. प्रदीप कर्णिक लिखित 'क्रोधे उत्पाटिला बळे' या कादंबरी प्रकाशनाची आहे. तो कार्यक्रम मौज प्रकाशन गृह, मुंबई आणि मराठी ग्रंथ संग्रहालय, दादर यांच्या संयुक्त विद्यमाने 'शतकोत्तर रौप्य महोत्सव उपक्रमांतर्गत' आयोजित करण्यात आलेला आहे.

डॉ. प्रदीप कर्णिक लिखित 'क्रोधे उत्पाटिला बळे' या कादंबरीचे प्रकाशन या कार्यक्रमात होणार आहे. त्यामुळे तुम्हाला आधी ती कादंबरी काय आहे ते जाणून घ्यावे लागेल. तसेच कर्णिक यांची साहित्यिक वाटचाल देखील जाणून घ्यावी लागेल. या कादंबरीचे प्रकाशन मराठीतील ज्येष्ठ कथाकार, कादंबरीकार भारत सासणे यांच्या हस्ते केले जाणार आहे. ते ९५ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष देखील आहेत. तर त्यांच्या साहित्याची माहिती देखील तुम्हाला करून घ्यावी लागेल. या कार्यक्रमात वक्ते म्हणून जेष्ठ अनुवादक चंद्रकांत भोंजाळ, समीक्षक, संशोधक डॉ. नितीन रिंढे, आणि कवयित्री सुनंदा भोसेकर उपस्थित रहाणार आहेत. आता सूत्रसंचालक म्हणून तुम्हाला प्रथम दोन्ही संस्थांची माहिती जाणून घेतली पाहिजे. तसेच 'शतकोत्तर रौप्य महोत्सव उपक्रमांतर्गत' ग्रंथालयाने काय काय उपक्रम केले ते जाणून घेतले पाहिजे. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, कितीही माहिती जमा झाली तरीही त्यातील योग्य त्या माहितीचाच उपयोग या कार्यक्रमात तुम्ही केला पाहिजे. ज्यांच्या हस्ते प्रकाशन होणार आहे, आणि जे वक्ते बोलणार आहेत त्यांची माहिती घेऊन मगच तुम्ही कार्यक्रमाची संहिता लिहायला घेतली पाहिजे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कोण करणार आणि आभार कोण मानणार याचीही नोंद तुम्ही घेतली पाहिजे. एकदा ही सगळी माहिती नोंदवली गेली की, तुम्हाला कार्यक्रमाला उभे राहताना आत्मविश्वास वाटतो आणि त्याचा कार्यक्रमाच्या यशस्वीतेवर परिणाम होतो. या कार्यक्रमाची संहिता पुढे दिली आहे. ती अभ्यासून आपण नोंदवलेले निरीक्षण बरोबर आहे का हे तुम्ही तपासून पहावे.


५) या कार्यक्रमपत्रिकेबद्दलची निरीक्षणे मी मुद्दाम नोंदवत नाहीये. त्यावर तुम्ही काम करावे अशी अपेक्षा आहे.

४.२.२ प्रा. रमेश तेंडुलकर स्मृती विशेषांकाच्या प्रकाशनाची पत्रिका आणि त्याची संहिता

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय संचालित मराठी संशोधन मंडळाने प्रा. रमेश तेंडूलकर यांच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त मराठी संशोधन पत्रिकेचा विशेषांक प्रकाशित केला होता. त्या कार्यक्रमाला भारतरत्न सचिन तेंडुलकर हजर होते. प्रा. रमेश तेंडुलकर हे त्यांचे वडील. त्या कार्यक्रमाला तेंडूलकर कुटुंबीय देखील हजर होते. तसेच मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष म्हणून मा. शरद पवार हे देखील हजर होते. त्यामुळे या कार्यक्रमाला खूप महत्व प्राप्त झाले होते. त्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती राणी दुर्वे यांनी केले होते.

त्या मराठीतील ज्येष्ठ लेखिका आहेत. त्या कार्यक्रमाची पूर्ण संहिता इथे मुद्दाम देत आहोत. नंतर त्यावरची निरीक्षणे देखील नोंदवणार आहोत. त्यावरून आपल्याला अभ्यास करता येईल.

नमुना पत्रिका



नमुना संहिता :

नमस्कार, मंचावरील उपस्थित मान्यवर, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे अध्यक्ष आदरणीय श्री पवार साहेब, संपूर्ण भारतवर्षाचा 'लाडका लेक' म्हणावे असे भारतरत्न श्री सचिन तेंडुलकर, खासदार सुप्रिया सुळे, मराठी विश्वकोश मंडळाचे अध्यक्ष श्री राजा दीक्षित, मराठी संशोधन मंडळाचे श्री. चंद्रकांत भोंजाळ, संशोधन मंडळाचे आजी संचालक डॉ. नितीन रिंढे आणि माजी संचालक डॉ. प्रदीप कर्णिक, माझ्या समोरील मान्यवर आणि खास निमंत्रित असा श्रोतृवर्ग, कवी नितीन तेंडुलकर, आणि उपस्थित तेंडुलकर कुटुंबीय यांचे मी आपल्या कार्यक्रमात मन:पूर्वक स्वागत करते.

मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय संचालित मराठी संशोधन मंडळा तर्फे आज प्रा. रमेश तेंडुलकर यांच्या २५ व्या स्मृतीदिनानिमित्त मराठी संशोधन पत्रिकेच्या तेंडूलकर सरांवरच्या विशेषांकाच्या प्रकाशन सोहळ्याप्रित्यर्थ आपण सगळे इथे जमलेलो आहोत.

मराठी संशोधन मंडळ ही मराठीच्या अभ्यासकांना आधार आणि अभिमान वाटावी अशी संस्था आहे. जुन्या मराठी वाङ्मयाचे संशोधन, संपादन, प्रकाशन; मराठी भाषा, व्याकरण, बोली, लिपी यांचा अभ्यास; मराठी वाङ्मयकोश आणि संशोधन साधनांची निर्मिती; दुर्मीळ हस्तलिखितांचा शोध; संशोधकांना

मार्गदर्शन, नव्या संशोधकांना पाठबळ आणि त्रैमासिक पत्रिकेचे प्रकाशन अशा भरगच्च कार्यक्रमांची आखणी मंडळाच्या पहिल्या कार्यकारणीने स्थापनेदरम्यानच केली होती आणि त्याच दिशेने मंडळाचे काम आजतागायत चालू आहे. आदरणीय सी. डी. देशमुखांपासून भारतरत्न पां. वा. काणे, प्रा. कृ. पां. कुलकर्णी, प्रा. अ. का. प्रियोळकर अशा दिग्गज लोकांच्या आशीर्वादाने ही संस्था कार्यरत आहे. १९७९ ते १९८९ अशी दहा वर्ष मराठी संशोधन मंडळाच्या संचालकपदाची जबाबदारी तेंडुलकर सरांनी समर्थपणे सांभाळली आणि त्याच काळात पत्रिकेचे ते संपादक देखील होते. एका कठीण काळात तेंडुलकर सरांनी मंडळासाठी केलेल्या कार्याची स्मृती जागविणे आणि त्या निमित्ताने त्यांच्या साहित्यिक कार्याचे मूल्यमापन करावे म्हणून आजचा हा संशोधन पत्रिकेचा विशेषांक प्रसिद्ध होत आहे. अर्थातच तेंडुलकर सरांच्या साहित्याविषयी आणि मंडळातील योगदानाविषयी कार्यक्रमादरम्यान बोलणे होईलच, पण तेंडुलकर सरांच्या खास आठवणीही आपण आज सचिन तेंडुलकर यांच्याकडून ऐकणार आहोत. एकूणच आजची संध्याकाळ ही आपल्या सगळ्यांसाठी रमेश तेंडुलकर सरांच्या स्मृतीजागराची सुंदर संध्याकाळ असेल

कार्यक्रमास सुरुवात करताना इथं विशेष नमूद करायला मला आवडेल की, आजच्या कार्यक्रमाचे आपले अध्यक्ष पवारसाहेब यांचा भक्कम आधार या संस्थेला आहे. पवार साहेबांचा दिनक्रम किती व्यस्त असतो हे मी सांगणे म्हणजे सूर्य रोज पूर्वेला उगवतो, आकाशात चंद्र तारे असतात वगैरे वैश्विक सत्य सांगण्याइतके निरर्थक विधान होईल. तर त्या व्यग्र दिनक्रमातही त्यांचे संस्थेच्या कार्याकडे लक्ष असते. आणि मुख्य म्हणजे प्रसिद्ध होणारे पत्रिकेचे अंक ते आवर्जून बघतात आणि चांगल्या कार्याचे कौतुकही करतात. आजच्या प्रा. रमेश तेंडूलकर विशेषांकासाठी त्यांची उपस्थिती त्याच आस्थेने आहे. वडिलांच्यावरील विशेषांकाच्या निमित्ताने करण्यात येणाऱ्या संशोधन मंडळाच्या कार्यक्रमासाठी सचिन तेंडूलकर यांचे, त्यांच्याही व्यग्र दिनक्रमातून इथं येणं आणि आमच्यासोबत वडिलांच्या खास आठवणी शेअर करण्याचं कबुल करणं हे आमच्यासाठी आनंददायी आहे. मंडळातर्फे मी दोघांचेही आभार मानते.

आता मान्यवर पाहुण्यांचे स्वागत आणि प्रास्ताविक भाषणासाठी मी डॉ. नितीन रिंढे यांना आमंत्रित करते. डॉ. नितीन रिंढे हे मराठी संशोधन मंडळाचे सध्याचे संचालक आहेत आणि पत्रिकेचा ऐवज अधिकाधिक दर्जेदार करण्याचे मोठेच काम ते करीत आहेत. डॉ. नितीन रिंढे हे चेतना महाविद्यालयात प्राध्यापक आहेत. समीक्षक व संशोधक म्हणून रिंढे यांचे नाव मराठी विश्वामध्ये प्रस्थापित झाले आहे. कादंबरी ह्या साहित्य प्रकारात त्यांची डॉक्टरेट आहे, त्या अर्थाने कादंबरीवर त्यांची authority आहे असे म्हणता येईल. डॉ. नितीन रिंढे –

(सगळ्यांचे स्वागत आणि प्रास्ताविक डॉ. नितीन रिंढे करतील)

धन्यवाद डॉ. नितीन रिंढे... आता मुख्य सोहळ्याला आपण सुरूवात करूयात. मी सचिन तेंडुलकर यांना मराठी संशोधन पत्रिकेच्या प्रा. रमेश तेंडूलकर विशेषांकाचे प्रकाशन करावे अशी विनंती करते.

(प्रकाशन झाले असे सचिन तेंडुलकर जाहीर करतील)

धन्यवाद . दुग्धशर्करा योग म्हणावे असे वडिलांच्यावरील विशेषांकाचे प्रकाशन त्यांच्या लाडक्या सचिनच्या हातून झाले आहे. या अंकाची किंमत २०० रुपये आहे. पण आजच्या विशेष दिवशी हा अंक १०० रुपयांमध्ये उपलब्ध असेल.

रमेश तेंडुलकर सरांनी या संस्थेला जे अमूल्य योगदान दिले होते त्याची काही अंशाने तरी उतराई होण्याची भावना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची आहे. अत्यंत साधा, सालस, बुद्धिवंत आणि दिलखुलास कवी मनाचा माणूस असे मी तेंडुलकर सरांचे वर्णन करीन.

प्रकाशन सोहळ्यानंतर कार्यक्रम पुढे नेताना मी नितीन तेंडुलकर यांना आपल्या वडिलांची एक आणि आपली एक कविता सादर करण्याची विनंती करते.

(नितीन तेंडुलकर कविता सादर करतील)

धन्यवाद नितीन. आमच्या घरात खूप वर्षापूर्वी आपली भेट कवितांच्याच निमित्ताने झाली होती प्रदीप, मी, माझे वडील आणि ते आमचे लहानसे घर. क्षणार्धात सगळे आठवून गेले. काळ हा एकाच वेळी past आणि current दोन्ही असतो. एकाच वेळी दोन स्तरावर आपल्याला नेण्याची मनाची ताकद अफाट असते. असो.

यानंतर आपल्या दोन वक्त्यांना बोलण्यासाठी मी आमंत्रित करणार आहे. तत्पूर्वी एक छोटा प्रसंग सांगते. फार वेळ घेणार नाही. मला वाटतं १९९२-९३ चे वर्ष असावं. मी माझ्या नोकरीच्या निमित्ताने चेन्नईला (त्या वेळी ते मद्रास होतं) राहत होते. बेझंट नगर म्हणून छान समुद्रसमीप भागात आम्ही राहत होतो. मला आठवतेय, क्रिकेटियर श्रीकांतचा बंगला आमच्या कोपऱ्यावरच होता. आणि आम्ही येणाऱ्या जाणाऱ्या पाहुण्यांना आवर्जून सांगायचो की, हा बंगला क्रिकेटियर श्रीकांतचा आहे म्हणून. आमच्या बंगल्याच्या समोर निळा अथांग समुद्र, किनाऱ्यावर अष्टलक्ष्मीचे एक दगडी कोरीव देऊळ. त्या देवळात रोज सकाळी लागणाऱ्या सुब्बलक्ष्मीच्या सुरेल भजनांनी जाग यायची. ९२-९३ चा काळ असा विपुल दुकानांचा नव्हता. कुठं कुठं एकटे दुकटे मॉलसदृश दुकान असायचे त्याचीही अपूर्वाई वाटायची. आम्ही, मी आणि माझी एक मैत्रीण अड्यार नावाच्या बेझंटनगर जवळच्या भागात एका नवीनच उघडलेल्या चकचकीत काचेच्या बेकरीत यायचो. एक पाच-सहा पायऱ्या चढून आत जावे लागायचे. अशी ती छान एअरकंडिशन बेकरी होती. एकदा संध्याकाळी साधारण सहा-साडेसहाचा सुमार असेल. आम्ही दोघींनी बेकरीत जाण्यासाठी खालच्या पायरीवर पाय ठेवला. तर वरच्या पायरीवर साक्षात एम.एस. सुब्बलक्ष्मी ! त्यांच्या सोबत कुणी मदतनीस बाई होत्या. सुब्बलक्ष्मी तेंव्हा ७०-७५ वर्षाच्या तरी असतील. पण साक्षात तेज. गळ्यात,कानात काही हिऱ्याचे दागिने, साऊथ इंडियन नऊवारी रेशमी निळी–जांभळी साडी आणि त्यापेक्षा ही त्यांचे लखलखीत रूप. आम्ही दोघी खालच्या पायरीला खिळून उभ्या राहिलो.त्या जिन्याच्या छोट्या जागेमध्ये आम्ही चारजणीच होतो. इतक्या हाकेच्या अनातारावर तो दैवी स्वर ! आमची ती अवस्था बाईंच्या लक्षात आली असावी. त्या किंचितशा हसल्या, आम्हाला पुसटसा हात केला आणि सावकाश उतरून आमच्या समोरून गेल्या. खरं तर काहीशी तीच अवस्था आज माझी झाली आहे. खरंच वाटत नाहीये की, मी ज्या व्यासपीठावर लोकांचा महान नेता आदरणीय पवार साहेब आहे आणि अबाल-वृद्ध सगळ्यांच्या 'दिलोंकी धडकन' सचिन तेंडुलकर आहे, त्या व्यासपीठावर मी देखील त्यांच्या सोबत आहे. प्रेक्षकात असणेही जिथे मी भाग्याचे समजत होते तीच मी संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत आहे ! देणाऱ्याचे सहस्त्र हातांचे दान, तो कधी काय दान देईल सांगता येत नाही, यापरते मी काय म्हणावे.मला ही संधी सहज देण्यासाठी मी संशोधन मंडळाच्या आजी-माजी संचालकांचे आभार मानते. I am honoured and over whelmed.

आता मी बोलण्यासाठी आमंत्रित करते डॉ. प्रदीप कर्णिक यांना. प्रा. रमेश तेंडुलकर यांच्या सोबत त्यांनी प्रदीर्घ काळ म्हणजे जवळपास दोन दशके काम केले आहे. आम्ही घरातले सगळे म्हणतो की, मुंबई

मराठी ग्रंथसंग्रहालय आणि संशोधन मंडळाविषयी बोलायला लागला की प्रदीपला घटका-पळे-तास पुरत नाहीत. तसेच तेंडूलकर सरांविषयी त्याला आदर आहे आणि त्यांनीही त्याला घडवला आहे त्याच प्रेमाने. नुकतीच 'क्रोधे उत्पाटिला बळे' ही मौज प्रकाशनातर्फे त्याची कादंबरी आली आहे. तसे तर प्रदीपची ओळख करून देण्यासाठी खूप काही बोलण्यासारखे आहे. तूर्तास प्रचंड कामाचा हा मराठीसाठी झपाटलेला माणूस आहे असंच मी म्हणेन. मी कर्णिक यांना या विशेषांकाविषयी, इथले संचालक असण्याविषयी आणि एकूणच त्यांच्या सहवासाविषयीच्या आठवणी सांगण्यासाठी निमंत्रित करते.

(डॉ. प्रदीप कर्णिक यांचे भाषण)

धन्यवाद प्रदीप. आता मी राजा दीक्षितसर यांना बोलण्यासाठी निमंत्रित करते. मराठी विश्वकोशाचे ते विद्यमान अध्यक्ष आहेत. पुणे विद्यापीठातून इतिहास विभागातून ते निवृत्त झाले आहेत काही काळ 'नवभारत' मासिकाचे संपादन त्यांनी केले आहे. 'प्रार्थना समाजाचा इतिहास' या पुस्तकाचे मुळ लेखन आणि संपादन द्वा.गो. वैद्य यांनी केले. याच पुस्तकाची दुसरी आवृत्ती विस्तृत टिपा आणि प्रस्तावनेसह दीक्षित सरांनी संपादित केली आहे. 'वाटचाल फर्ग्युसनची' हा फर्ग्युसनच्या १८८५ ते थेट २०१० पर्यंतच्या १२५ वर्षाचा अभ्यासपूर्ण मागोवा त्यांनी घेतला आहे. एकूणच १९-२० व्या शतकाचा त्यांचा गाढा अभ्यास आहे. मी दीक्षित सरांना त्यांच्या अभ्यासू नजरेतून गवसलेले प्रा. रमेश तेंडुलकर सांगण्यासाठी आमंत्रित करते.

(श्री राजा दीक्षित यांचे भाषण)

धन्यवाद सर.

आता या पुढे माझे काम सोपेही आहे आणि कठीणही आहे. उरलेल्या तिघांची मी काय ओळख करून देणार?

माजी खासदार सुप्रिया सुळे या देखील आपल्या वडिलांप्रमाणेच मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या कामात रस घेतात आणि आधार देतात. त्यांनाही संस्थेबद्दल आस्था किंवा माया हा शब्द खरंतर मी त्यांच्या बाबत वापरेन. मुंबई ग्रंथ संग्रहालय संस्थेच्या त्या विश्वस्त आहेत. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाण आणि मुंबई ग्रंथ संग्रहालय दोन्हीकडे उत्तमोत्तम कार्यक्रम होत राहावेत याकडे त्यांचा कल असतो. समाजोन्मुख असणाऱ्या माणसाकडे सगळ्यांचेच लक्ष असते. मला त्यांचे भावते ते माणूसपण, जे अनेकदा त्यांच्या कृतीतून दिसते. स्त्रियांच्या प्रश्नाविषयी तर त्या अधिक सजगतेने काम करतात. मी सुप्रियाताईंना बोलण्याची विनंती करते.

(सुप्रियाताईंचे भाषण)

धन्यवाद सुप्रियाताई. आम्ही नेहमीच तुमची संसदेतील धुवांधार भाषणे ऐकत असतो. आज प्रत्यक्ष तुम्हाला ऐकायला मिळाले. खूप छान वाटले. स्त्रियांचा, आणि त्यातही प्रगल्भ स्त्रियांचा राजकारणात समावेश दिलासादायक आहे. हा स्त्रियांचा राजकारणातील सहभाग तुमच्या नेतृत्वाखाली उदंड वाढो ही सदिच्छा. आता सचिन तेंडुलकर यांच्याशी गप्पा करतील श्री. प्रसन्ना संत. प्रसन्ना संत हे आपले वडील चंद्रशेखर संत यांच्या प्रमाणेच क्रीडा पत्रकार आहेत. ते सचिनचे जवळचे मित्र आहेत आणि एकूणच सचिन यांचा प्रवास त्यांनी खूप जवळून पहिलेला आहे. सचिन यांच्याकडे आपल्या वडलांच्या खास आठवणी आहेत. एरवी प्राध्यापक, कवी, समीक्षक, संचालक, असणारे तेंडुलकरसर वडील म्हणून सचिन यांच्या हृदयात कसे स्थान मिळवून आहेत. ते आपल्याला या गप्पातून ऐकायला मिळेल. तेंडूलकर सरांची एक नवी

ओळख आणि ती देखील प्रत्यक्ष सचिनकडून ही या संध्याकाळची खास भेट आहे. आपल्या सगळ्यांसाठी हा एक अपूर्व योग आहे.

प्रसन्ना संत यांच्याकडे सूत्र देण्याआधी त्यांच्या परवानगीने मी आपले काही क्षण मागून घेते.- बहुदा शांताबाई शेळके यांच्या पुस्तकात मी वाचले आहे आणि चिनी किंवा जपानी भाषेत कोट असावे. आत्ता नक्की आठवत नाही, पण त्याचा मथितार्थ असा की, आकाशात चंद्र एकच असतो, पण पृथ्वीवरील प्रत्येक तलावात एक चंद्र असतो. तसेच सचिन एक आहे मात्र जगभरातील त्याच्या प्रत्येक चाहत्याच्या हृदयात सचिन प्रतिबिंबित आहे. असे लाखो करोडो सचिन लोकांमध्ये प्रतिबिंबित करणारा सचिन काय किंवा अलौकिक सुरांनीच साक्षात जन्म घेतला असावा अशा लताबाई काय...परमेश्वरी वरदहस्त असलेली ही माणसे ज्या काळात पृथ्वीवर आली त्याच काळात आम्हीही जन्मलो आहोत याचेच आम्हाला अप्रूप आहे आबालवृद्ध सगळेचजण या दोघांचाही उल्लेख बोलताना सहसा एकेरीच करतात यातच त्यांच्यावर लोक किती प्रेम करतात हे दिसून येतं.

आता अधिक काही न बोलता प्रसन्ना संत यांच्याकडे मी सूत्र सोपवते.

(प्रसन्ना संत आणि सचिन तेंडूलकर यांची बातचीत)

धन्यवाद प्रसन्ना आणि सचिन. खूप प्रेमाने आणि भरभरून बोलले सचिन आपल्या वडिलांविषयी. बाप-लेकी असे एक पुस्तक आहे. ज्यात बाप आणि लेकीचे नाते उलगडून सांगितले आहे. पण या बाप आणि लेकाचे किती हृद्य नाते होते ते सचिन यांच्याकडून समजले.

आता मी आमंत्रित करते अध्यक्षीय भाषणासाठी आदरणीय श्री. पवार साहेब यांना. संपूर्ण देशाच्या राजकारणात वारंवार महत्त्वाची भूमिका बजावणारे आणि महाराष्ट्राच्या राजकारणाची नस ज्यांना माहिती आहे अशा लोकानेत्याची मी काय ओळख करून देणार? पण राजकारणापलीकडचे म्हणून मघाशी मी सांगितले तसे ते मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचे अध्यक्ष या नात्याने संशोधन मंडळाच्या कामात नेहमी रस घेतात आणि त्यांचा भक्कम आधार या संस्थेला आहे. प्रत्येक कुटुंबात जशी वडीलधारी माणसे असतात आणि त्यांचा आपल्याला आधार वाटतो तशीच काहीशी भावना सार्वजनिक जीवनात समाजात वावरणाऱ्या काही व्यक्तींबद्दल आपल्या मनात असते. तोंडदेखले नक्कीच बोलत नाही पण ज्यांचे अस्तित्वही आधार वाटावे अशा थोडक्याच व्यक्ती आता समाजात राहिलेल्या आहेत आणि पवारसाहेब त्यातले एक आहेत. सुप्रियाताईंसाठी तीर्थरूप असणारी ही व्यक्ती मराठी समाजासाठी तीर्थस्वरूप आहे. त्यांच्या सावलीत आपण आहोत अशी भावना सोबत आहे. त्यांना नमस्कार करून अध्यक्षीय भाषणासाठी मी त्यांना आदरपूर्वक आमंत्रित करते.

(श्री शरद पवार यांचे अध्यक्षीय भाषण)

खूप खूप धन्यवाद पवारसाहेब या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून मी भरून पावले इतका उत्तम झाला हा कार्यक्रम. काही ऋणानुबंध असतात, कदाचित माझे तेंडुलकर सरांशी, कदाचित या मंचाशी, कदाचित त्यावर उपस्थित व्यक्तींशी, असे काही आज अचानक घडून गेले. रमेश तेंडुलकरांच्याच एका कवितेच्या दोन कडव्यांनी मी समारोपाकडे येते....

प्रत्येकच आपुल्या रस्त्याला/ असे दुजापण रस्ता एक / ओळख त्याची फक्त उरे पण / जसा धुक्यातच पूल सुरेख/

त्या रस्त्याला चंद्र धुक्याचा / धुक्याचीच अन हिरवी झाडे/ फुले धुक्यातच फुलती, मिटती / धुक्यात अन गुरफटती वाडे ...

तेंडूलकरांच्या रस्त्याला सचिन नावाचा सुंदर धुक्यातला दुजा रस्ता जोडलेला होताच

कार्यक्रमाच्या शेवटी आभार प्रदर्शनासाठी मराठी संशोधन मंडळाचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अनुवादक श्री चंद्रकांत भोंजाळ यांना निमंत्रित करते आणि मी राणी दुर्वे, आपली रजा घेते. धन्यवाद.

****

इथे या कार्यक्रमाची सांगता झाली.

आता या संहितेचे निरीक्षण करून खालील गोष्टी आपल्या लक्षात येतात.

१) कार्यक्रमाच्या सुरूवातीलाच मंचावर आणि सभागृहात मान्यवर लोक उपस्थित असल्याने त्यांचे स्वागत केलेले आहे. त्यातही वरिष्ठता क्रम (seniority order) पाळलेला आहे. म्हणजे आपण ज्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करायची जबाबदारी स्वीकारली आहे, तिथे मंचावर आणि सभागृहात कोण कोण व्यक्ती हजर राहणार आहेत, याची नोंद घेणे आवश्यक आहे.त्यांचा वरिष्ठता क्रम देखील समजून घेतला पाहिजे. नाहीतर काहीतरी चूक होणे, एखाद्या मान्यवराचे स्वागत करायला विसरणे अशा घटना घडतात. आणि गैरसमज निर्माण होतात.
   एखादी वरिष्ठ मान्यवर व्यक्ती उशिरा आली तरी जेंव्हा संधी मिळेल तेंव्हा तिचे स्वागत आठवण ठेवून केले गेले पाहिजे.
२) मग ज्या संस्थेने तो कार्यक्रम योजला आहे, त्या संस्थेची माहिती सांगितलीच गेली पाहिजे. इथे ती मराठी संशोधन मंडळ या संस्थेची सांगितली आहे. त्यातही तेंडुलकर सरांचे आणि या संस्थेचे ऋणानुबंध देखील स्पष्ट केलेले आहेत.
३) मग त्या कार्यक्रमात सहभागी व्यक्तीचा परिचय सांगितला आहे.
४) मग स्मृती अंकाचे प्रकाशन करून घेतले आहे.त्या नंतर कार्यक्रम ठरल्याप्रमाणे पुढे गेलेला दिसतो.
५) पण यात ऐनवेळी एक बदल केला गेला होता. श्री. पवार साहेबांनी अशी विनंती केली की, मी अध्यक्षीय भाषण सचिन तेंडुलकर यांच्या आधी करून घेतो. कारण सचिन यांच्यानंतर कुणी बोललेले बरे दिसणार नाही. मग त्यांच्या विनंतीला मान देऊन तसे केले गेले. त्या प्रमाणे कार्यक्रमात बदल केला गेला. अशा वेळी सूत्रसंचालन करणाऱ्या व्यक्तीने गडबडून न जाता तो बदल स्वीकारायचा असतो. असो

तर ही होती नमुना संहिता.

नमुना संहिता -२

विद्यार्थी मित्रांनो, आता एक दुसरी नमुना संहिता पुढे देत आहे. ती भक्ती संगीताविषयीच्या कार्यक्रमाची आहे. त्यासाठी कशी माहिती जमा करावी लागते आणि त्या संहितेची भाषाशैली कशी असते तेही तुम्हाला कळू शकेल.ही संहिता अहिल्यानगरचे आनंद कुलकर्णी यांच्याकडून प्राप्त झालेली आहे.

१) **सुंदर ते ध्यान, उभे विटेवरी.... संत तुकाराम**

पंढरीच्या पांडुरंगाचे वर्णन करताना संत तुकाराम महाराज स्वतःच त्या रुपात रंगून जातात. पण या मध्ये ते एकदाही पांडुरंगाचे किंवा विठ्ठलाचे नाव घेत नाहीत. त्या पंढरीरायाचे श्रीमुख पाहण्यातच त्यांना सुख वाटते.

या विठ्ठलाचे हात कमरेवर आहेत. याचे फार सुंदर कारण दिले जाते. विठ्ठल हे कृष्णाचेच रूप. द्वापारयुगानंतर कृष्णाने अवतार संपवला आणि ते पुंडलिकाच्या विनंतीनुसार कलियुगात पांडुरंग रुपात राहिला. कृष्णावतारात या हातांनी खूप काम केले होते. कंसासह अनेक राक्षसांचा वध, गोवर्धन करंगळीवर सात दिवस धरणे, महाभारत युद्धात अर्जुनाच्या रथाचे सारथ्य करणे, शिवाय युधिष्ठिराच्या यज्ञात पत्रावळी उचलणे, त्यामुळे थकून जाऊन त्याने आता आपले हात कटीवर ठेवले आहेत. गळ्यात तुळशीहार आहे, कारण हा सर्वसामान्यांचा देव आहे. कासेला पितांबर, कानात मकरकुंडले आणि कंठात कौस्तुभमणी घातला आहे. ही मकरकुंडले देखील भक्ताने प्रेमाने दिलेल्या माशाची आहेत. तर आनंद घेऊ यात ' सुंदर ते ध्यान....' या अभंगाचा.

२) खेळ मांडियला वाळवंटी ठाई .. .. संत तुकाराम महाराज

पंढरपूरला आषाढी कार्तिकेला चंद्रभागेच्या वाळवंटात कीर्तनाची फार जुनी परंपरा आहे. त्याची एक कथा आहे, आषाढीला संत ज्ञानेश्वरकालीन सारे संत पंढरीत जमले होते. त्यावेळी कीर्तन मंदिरातच होत असे. सारे कीर्तनाला जमले. माऊली कीर्तनाला उभे राहिले. समोर नजेर गेली तर त्यात त्यांना कान्होपात्रा आणि चोखामेळा दिसेनात. ज्ञानेश्वर माउलींनी नामदेवांना विचारले. पण बडव्यानीच उत्तर दिले की एक कर्महीन तर दुसरा जातीहिन. ते मंदिरात कसे येणार? माऊली नाराज झाली. म्हणाले, 'जिथे चोखोबा आणि कान्होपात्रा असेल तिथेच कीर्तन होईल." मग सगळे वाळवंटात आले. त्या दोघांना घेऊन कीर्तन झाले. प्रत्यक्ष पांडुरंग मंदिर सोडून वाळवंटी आले आणि नाचले. तीच प्रथा पुढे चालू राहिली. या वाळवंटातील कीर्तनाने मोठा सामाजिक बदल झाला. उच्चनीचता संपली. प्रत्येकाच्या हृदयातील विठ्ठलाला सगळे नमस्कार करू लागले.याचेच फार मार्मिक वर्णन तुकाराम महाराजांनी आपल्या ' खेळ मांडियेला...' या अभंगात केलं आहे.

३) विठू माऊली तू, माऊली जगाची.... जगदीश खेबुडकर.

जगदीश खेबुडकर असा हरहुन्नरी कवी की, ज्याने काव्याचे इतके विविध प्रकार हाताळले की, त्यांच्या प्रतिभेविषयी आश्चर्यचकित झाल्याशिवाय राहात नाही. लोकसंगीत, अभंग, ओवी, लावणी, प्रेमगीत, भक्तीगीत, कव्वाली, किती प्रकार सांगावेत. त्यांच्याच प्रतिभेतून फुललेले 'अरे संसार संसार...' या चित्रपटातील हे भक्तीगीत 'विठू माऊली तू माऊली जगाची...'

वारकरी जेंव्हा वारीत सहभागी होतो. तेंव्हा तो सर्वांना माऊली म्हणूनच संबोधतो. त्या पांडुरंगाला तो आपल्या आईच्या रुपात पाहतो. तो त्याच्या कृतज्ञतेचे आभार मानतो. कुरुक्षेत्र असणाऱ्या संसाराचे त्याच्या कृपेने पंढरी म्हणजे आनंदवन झाल्याचे मानतो. जयवंत कुलकर्णी, सुधीर फडके, आणि सुरेश वाडकरांच्या आवाजात असणाऱ्या या गाण्याचा आनंद आता आपण घेऊ यात...

४) अनुरणिया या थोकडा.... संत तुकाराम.

संत तुकाराम यांना भागवत धर्माचा कळस मानले जाते. कारण त्यांनी प्रस्तुत केलेला विचार हा समतेचा आणि मोठ्या ज्ञानाचा आहे. सोळाव्या शतकात जेंव्हा पश्चिमेचे जग अज्ञानात चाचपडत होते,तेंव्हा आमचे संत अणुरेणूच्या सूक्ष्मतेविषयी जाणून होते एकीकडे संत तुकाराम महाराज स्वतःला अगदी सूक्ष्म म्हणतात तर दुसरीकडे ते आभाळाएवढा असल्याचेही सांगतात. नव सिद्धीतील अणिमा आणि महिमा या दोन्ही सिद्धी आहेत. 'गिळून सांडिले कलेवर..' म्हणताना तो विरोधाभासी विचार वाटत असला तरी त्यात सुंदर विचार आहे की मिथ्या जगाचा भ्रम सोडून मी भागवत भक्तीच्या जगात आलो. आता मला काहीच मिळवायचे राहिले नाही, आता उरले आहे ते केवळ इतरांसाठी कार्य करणे... ऐकुयात 'अनुरणिया थोकडा....'

५) आम्ही जावे कवण्या ठाया... संत जनाबाई

भागवत धर्मात स्त्री संतांची समृद्ध परंपरा आहे. संत सखू, संत कान्होपात्रा, संत सोयराबाई, संत मुक्ताई, वगैरे. यातीलच एक मोठे नाव म्हणजे संत जनाबाई होय. संत नामदेवांच्या घरी काम करणारी जनाबाई स्वतःला नाम्याची दासी म्हणवून घेण्यात धन्य मानते. पांडुरंगाचे जनाबाईवर विशेष प्रेम होते. पांडुरंग जनाईची कामे करण्यासाठी तिच्या घरी येत असे. तिचे दळण विठ्ठलाने दळले आहे. पाणी भरले आहे. जनी आंघोळीला गेली पण पाणी न्यायचे विसरली. तर माऊलींनी पाण्याची बादली दिली. एकदा पांडुरंग जनीकडे कामात मदत करायला आला. काम करता करता आपल्या गळ्यातला हार तिथेच विसरला. मंदिरात विठ्ठलाच्या गळ्यातला हार गायब झाल्याने सर्वत्र गोंधळ माजला. हाराचा शोध सुरू झाला. तो जनाबाईकडे सापडला. साहजिकच सगळे तिच्या मागे लागले. तिला काहीच माहिती नव्हते. आपले निर्दोषपण सिद्ध करायला ती विठ्ठलालाच साकडे घालते... 'आम्ही जावे कवण्या ठाया..."

६) समाधी साधन, संजीवन नाम....

ज्ञानेश्वर माऊलींनी या अभंगामध्ये समाधी स्थितीचा उल्लेख केला आहे. समाधी म्हणजे सम बुद्धी. ती प्राप्त करायची साधने काय आहेत, तर 'नामस्मरण, शांती, दयाबुद्धी, आणि सर्वांप्रती समभाव..' होय. माऊली म्हणतात अशी' शांतीची पै शांती' मला सद्गुरू कृपेने लाभली (निवृत्ती उतारू), आणि म्हणून मी तो अखंड समाधीचा आंतरिक आनंद अनुभवून सुक्ष्मामध्ये नित्य घेऊ शकलो. नाथांची गुरुपरंपरा माझ्या सद्गुरूंनी, निवृत्तीरायांनी माझ्या अंतःकरणात उतरवली. स्थिर केली आहे.

शम, दम, कळा, विज्ञान सज्ञान.... शम म्हणजे अंत:करणाची उपरती, दम म्हणजे मनाचे आकलन, क्षमा, धैर्य, अहिंसा, समता,सत्य, सरलता, इंद्रियजय, मृदुता, शांतवृत्ती, औदार्य, क्रोध-रहित्व यांचे दमन आणि सर्वात महत्वाचे म्हणजे वृत्तीमध्ये उमटणाऱ्या वासनेच्या तरंगाचे दमन. विज्ञान म्हणजे सायन्स या अर्थाने नव्हे तर विशेषत्वाने जाणणे, सखोल जाणणे या अर्थाने आणि सज्ञान म्हणजे जे काही जाणले ते आचरणात आणणे.

परतोनी अज्ञान ये घरा ... एकदा का हे कळले की, आत्ता जे काही अज्ञान आहे, अजाणतेपण आहे, ते परत येणार नाही, एकदा हे कळले की 'सुटलो' माऊलींच्या मनात विसाव्या वर्षीच समाधीचे विचार घोळू लागले होते. त्याच काळातले हे त्यांचे चिंतन असावे. प्रस्तुत आहे, 'समाधी साधन, संजीवन नाम...."

७) माझे माहेर पंढरी...

शांतीब्रम्ह संत एकनाथांचा जन्म आणि कर्मभूमी ही सातवाहन राजांची राजधानी पैठण होय. काळाच्या ओघात ज्ञानेश्वरांच्या भावार्थदीपिकेत झालेले अयोग्य बदल दुरुस्त करून ज्ञानेश्वरीची शुद्ध प्रत तयार करण्याचे महान कार्य संत एकनाथांनी केले. त्यांच्या घरात पारंपारिक रित्या पंढरीची वारी होती. त्यांचे पणजोबा संत भानुदास. अनागोंदी म्हणजेच आत्ताच्या हंपीला, विजयनगरचा राजा कृष्णरायने, नेलेल्या विठ्ठलाला परत आणण्याचे श्रेय संत भानुदास महाराजांचे आहे. भानुदास पुत्र चक्रपाणी, त्यांचे पुत्र सुर्यनारायण आणि त्यांचे पुत्र संत एकनाथ. संत एकनाथांना त्यामुळे पैठण सासर वाटते. तर पंढरी आपले माहेर. या माहेरी विठ्ठल रखुमाई हे आईवडील, पुंडलिक हा भाऊ, तर चंद्रभागा ही बहिण वाटते. चला आपणही त्यांच्या बरोबर माहेरची सफर करूयात....

८) हरिभजनावीण काळ घालवू नको रे....

तळकोकणावरच्या नाथ संप्रदायाच्या प्रभावाचं ठसठशीत उदाहरण म्हणजे संत सोहिरोबानाथ. त्यांच्या काव्याचा आणि विचारांचा गाभा वारकरी प्रेरणेचाच आहे. म्हणूनच बा. भ. बोरकर त्यांना 'कोकणचा ज्ञानेश्वर' म्हणतात.

'हरिभजनावीण काळ घालवू नको रे, अंतरीचा ज्ञानदिवा मालवू नको रे..' हे गाणं कुणाचं? या प्रश्नावर शेकडा नव्याण्णवांचं उत्तर असतं, पंडित जितेंद्र अभिषेकी. पण यातला सगळ्यांना भावणारा संदेश आहे, संत सोहिरोबानाथांचा. सोहिरोबानाथांचे असे आणखी अभंग भजनात नेहमी गायले जातात. पण अंतरीचा ज्ञानदिवा न मालवण्याचा संदेश देणारा हा अभंग म्हणजे सोहिरोबानाथांच्या आध्यात्मिक भक्तिमार्गाची ओळख बनली आहे. नाथपंथीय सोहिरोबानाथांनी गुरु गहिनीनाथांच्या उपदेशानंतर भक्तिरसाची अनेक पदं, अभंग, ओव्या रचल्या. मोठी ग्रंथ रचना केली. संत नामदेवानंतर हिंदीतून काव्य रचना करणारे आणि उत्तर भारतात ओळख असणारे संत सोहिरोबानाथ हे महत्वाचे संत होत. ते गोव्यातील एकमेव प्रसिध्द संत.

चला तर त्यांच्यासवे आपणही हरिनाम घेऊयात....

९) घेऊनी दत्ताची पालखी....

'दत्त' हा शब्द 'दत्त' आणि 'आत्रेय' या दोन शब्दांनी बनला आहे. 'दत्त' या शब्दाचा अर्थ आपण ब्रम्हच आहोत, मुक्तच आहोत, आत्माच आहोत. अशी निर्गुणाची अनुभूती ज्याला आहे असा, आणि 'आत्रेय' म्हणजे अत्री ऋषींचा मुलगा. श्री दत्तात्रयाच्या जन्माविषयी विविध कथा प्रचलित आहेत. मात्र या सगळ्या कथांमधून श्रीदत्त हे अत्रीऋषी आणि माता अनसूया यांचा पुत्र आणि विष्णूचा अवतार आहे, असाच बोध होतो.

अत्रीऋषींनी पुत्रप्राप्तीसाठी ऋक्ष कुलपर्वतावर घोर तपश्चर्या केली. त्याच्या तापाने सारे त्रिभुवन पोळून निघाले. अत्रीऋषींच्या या प्रखर तपाने संतुष्ट होऊन ब्रम्हा-विष्णू-महेश हे तिन्ही देव प्रकट झाले. आणि त्यांनी अत्रीऋषींना तपाचे कारण विचारले. अत्रीऋषींने त्यांना विनवले की, आपण माझ्या उदरी पुत्र रूपाने जन्म घ्यावा. तिन्ही देवानी त्यांची विनंती मान्य केली. देवत्रयींच्या आशीर्वादाने अनुक्रमे ब्रम्हापासून सोम, म्हणजे चंद्र, विष्णू पासून दत्त आणि शिवापासून दुर्वास हे तीन पुत्र अनसूयेच्या उदरी जन्माला आले .

श्री दत्तजन्माची एक कथा ब्राम्हणपुराणात आहे. अत्रीऋषींनी ब्रम्हा-विष्णू-महेश यांची पुत्रप्राप्ती साठी आराधना केली. ते संतुष्ट झाल्यावर त्यांनी देवांना विनवले की, आपण माझ्या घरी पुत्ररूपाने जन्म घ्यावा आणि मला एक रूपवती कन्याही प्राप्त व्हावी. देवांच्या आशीर्वादाने दतात्रेय, सोम.दुर्वास हे तीन पुत्र आणि शुभात्रेयी नावाची कन्या अत्रीऋषिना प्राप्त झाली.

याचबरोबर दत्तात्रेयांच्या जन्माची आणखी एक कथा प्रसिद्ध आहे. ती अशी की, राहूने सूर्याला ग्रस्त केले असता सर्व पृथ्वी अंधःकारमय झाली. अत्रीने सूर्याला राहूच्या मगरमिठीतून सोडवले आणि पुन्हा पृथ्वी प्रकाशमान केली. अत्रीच्या या महत्कार्यामुळे संतुष्ट झालेल्या शिव आणि विष्णू यांनी अनुक्रमे दुर्वास आणि दत्त यांच्या रूपाने अत्रींच्या घरी जन्म घेतला. दत्तात्रेय हे उत्पत्ती, स्थिती आणि लय यांचे प्रतीक आहे. एकीकडे दुर्वासांची उष्णता तर दुसरीकडे चंद्राची शितलता आहे. माहूर, गिरनार, कोल्हापूर, गाणगापूर आदी दत्त स्थाने आहेत. ते दत्त संप्रदाय (यात श्रीपाद श्रीवल्लभ, नरसिंह सरस्वती, अक्कलकोट स्वामी आदि येतात) आणि नाथ संप्रदायाचे (यात नवनाथ येतात) आद्य प्रवर्तक आहेत. चला निघू या घेऊन दत्ताची पालखी.....

****

इथे ही निवेदनाची संहिता संपली. याचे निरीक्षण केल्यावर आपल्या असे लक्षात येईल की, याची कार्यक्रम पत्रिका उपलब्ध झालेली नसल्याने सुरूवात शेवट करता आलेला नाही. यातील सहभागी कलावंतांची नावे देखील आपल्याला कळलेली नाहीत. पण या निवेदकाचा अभ्यास यातून दिसतो आहे. त्यामुळे वाचनाचे महत्व आपल्या लक्षात आले असेलच. 'असाध्य ते साध्य, करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे.' असे संत तुकोबारायांनी म्हणूनच ठेवलेले आहे. ते जरी लक्षात ठेवले तरी तुम्ही यशस्वी सूत्रसंचालक /निवेदक बनू शकता.

नमुना संहिता -३ :

नमस्कार,

डिसेंबर महिन्यातील सतरा तारखेच्या, शनिवारच्या या सुंदर संध्याकाळी, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयच्या शारदा मंगल सभागृहात 'क्रोधे उत्पाटिला बळे' या प्रदीप कर्णिक लिखित आणि मौज प्रकाशित कादंबरीच्या प्रकाशन सोहळ्यात, मी राणी दुर्वे, आपल्या सगळ्यांचे स्वागत करते. माणसाप्रमांणेच प्रत्येक पुस्तक हे आपले आपले भागधेय घेऊन जन्माला येते अशी आपली माझी एक धारणा आहे. लेखकाकडून पुस्तक लिहून झाले की ते त्याच्या हातातून निसटते आणि आपला प्रवास आपणच घडवून आणते. प्रकाशन सोहळ्यास यंदाच्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष सासणेसरांची अध्यक्षीय उपस्थिती, चंद्रकांत भोंजाळ, सुनंदा भेसेकर, नितीन रिंढे, यांच्यासारख्या मान्यवरांकडून आढावा,

दस्तुरखुद्द मौजकडून प्रकाशित, मुंबई मराठी संग्रहालयासारख्या साहित्याचा इतिहास आणि अनेक मोठ्या व्यक्तींचा वारसा सांगणाऱ्या, शतकोत्तर रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या वास्तुत घडणारा सोहळा आणि तुम्हा सगळ्या दर्जेदार, जाणत्या तसेच कुटुंब सदस्य श्रोत्यांची उपस्थिती-मला सांगा याहून अधिक भाग्य ते काय असावे एका पुस्तकासाठी? असाच भाग्यशाली प्रवास या पुस्तकाचा या पुढेही होवो अशा शुभेच्छा देऊन मी आपल्या परवानगीने प्रकाशन समारंभाला सुरूवात करते.

हा कार्यक्रम मौज प्रकाशन गृह आणि शतकोत्तर रौप्य महोत्सव उपक्रमांतर्गत, मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय दादर यांच्या संयुक्त विद्यमाने सादर होत आहे. मराठी साहित्यविश्वात मौज प्रकाशनाचे एक अढळ स्थान आहे. पुस्तकाला भागवतीय मौजेचा छप्पा असणे ही मोठी बाब समजली जाते. अशा या मौज प्रकाशन गृहातर्फे सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यासाठी मी मौजेचे श्री श्रीकांत भागवत यांना आमंत्रित करते.
(श्रीकांत भागवत यांचे भाषण)
धन्यवाद. कादंबरी मौजतर्फे प्रकाशित होत आहे याचे अप्रूप मराठी लेखकाला वाटणे सहाजिक आहे.

यानंतर मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाचे विश्वस्त श्री. अरविंद तांबोळी, यांना विनंती करते की, त्यांनी संग्रहालायाच्या वतीने पुष्प गुच्छ देऊन स्टेजवरील सर्व पाहुण्यांचे स्वागत करावे.

सर्वप्रथम या कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठीतील ज्येष्ठ लेखक आणि ९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष श्री भारत सासणेसर यांचे स्वागत करावे.
या नंतर त्यांनी मौज प्रकाशनाचे श्री श्रीकांत भागवत यांचे स्वागत करावे.
या नंतर या कादंबरीचे लेखक डॉ. प्रदीप कर्णिक यांचे स्वागत करावे. (तुमचेच पुस्तक आहे पण काही ठिकाणी औपचारिकता पाळावी लागते)
मी विनंती करते की ज्येष्ठ अनुवादक आणि लेखक श्री चंद्रकांत भोंजाळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करावे.
या नंतर कवयित्री, लेखिका सुनंदा भोसेकर यांचे स्वागत करावे. तसेच संशोधक लेखक डॉ. नितीन रिंढे यांचे स्वागत करावे.
(सर्वाना पुष्प गुच्छ देऊन झाल्यावर सगळे पुन्हा जागेवर बसतील)

पुस्तक तर छानच झाले आहे. पण त्या पुस्तकाला देखणेपण देणाऱ्या कव्हरबद्दल श्री चंद्रमोहन कुलकर्णी यांचे मन:पूर्वक अभिनंदन, कौतुक आणि आभार. तसेच डॉ. रमेश वरखेडे यांची फार अर्थपूर्ण प्रस्तावना या कादंबरीला लाभली आहे. कादंबरीचे वेगळेपण, त्यातील प्रयोग आणि नायकाची संभ्रमावस्था उलगडून दाखवण्याचे चोख काम वरखेडे यांनी केले आहे. मौजेने संपादकीय साज चढवला आहे.

या लेखकाच्या निर्मिती प्रक्रियेत लेखकाच्या बरोबरीनेच श्री चंद्रकांत भोंजाळांनी प्रवास केला आहे. असे क्वचितच कुणी इतके बरोबर असते. त्यामुळे पुस्तकावर बोलण्याचा पहिला हक्कही भोंजाळांचाच. श्री चंद्रकांत भोंजाळ यांचा आकाशवाणीत निर्मिती सहाय्यक आणि यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठात निर्माता ऑडिओ-व्हिज्युअल, तसेच विभाग प्रमुख, असा प्रदीर्घ अनुभव आहे. अनेक ऑडिओ-व्हिज्युअल फितींची निर्मिती त्यांनी केली आहे. ज्याला राष्ट्रीय पातळींवर गौरवलेले आहे. अनुवादाच्या क्षेत्रात भोंजाळांचे विशेष कार्य आहेच. १५० पेक्षा जास्त भारतीय लेखकांचे साहित्य त्यांनी मराठी भाषेत आणले आहे.त्यांच्या ३५० पेक्षा जास्त अनुवादित कथा विविध दिवाळी अंकातून प्रकाशित झालेल्या आहेत.

अनुवादासाठी १९९७ साली साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळालेला आहे. तसेच इतर अनेक पुरस्कार त्यांच्या नावावर आहेत. त्यांची स्वतःची अशी ७० हून जास्त पुस्तके प्रकाशित झाली आहेत. आणि अजून काही पुस्तके प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

दादर सारख्या गर्दीच्या ठिकाणी कार्यक्रम आहे तर वेळेचे भान मला आहेच. साधारण दीड-पावणे दोन तासाच्या अवधीत आपल्याला कार्यक्रम करायचा आहे, पण पुस्तकाचा जन्म, प्रवास, पुस्तकाचे मौज पर्यंत पोहोचणे याचे थोडक्यात वर्णन श्री भोंजाळ यांच्याकडून ऐकूया आणि मग आपण प्रत्यक्ष पुस्तक प्रकाशन करुया.

(श्री चंद्रकांत भोंजाळ यांना आमंत्रण.)

धन्यवाद भोंजाळ... मौजेपर्यंत पुस्तक नेण्याच्या प्रवासात प्रदीपला साथ देण्याबद्दल आभार. ॲडव्होकेट नीता कर्णिक यांना पुस्तक प्रकाशन सोहळ्यासाठी स्टेजवर येण्याचे मी आमंत्रण देते. पुस्तक प्रकाशन करण्याची मी सासणे सरांना विनंती करते.

(पुस्तक प्रकाशन सोहळा.)

पुस्तकाचे विधिवत प्रकाशन झाले असे मी जाहीर करते. सर्व मान्यवरांचे आभार. पुस्तकांच्या प्रती मौजतर्फे विक्रीसाठी इथे ठेवलेल्या आहेत. पुस्तकाची किंमत ७५० रुपये आहे. पण आज सवलतीच्या किंमतीत ते पुस्तक मिळणार आहे.

या नंतर आपण ऐकणार आहोत दोघांना, सुनंदा भोसेकर आणि डॉ. नितीन रिंढे यांना. ज्या काळाचे प्रतिनिधित्व प्रदीप करीत आहे त्या काळाची सहकारी कवयित्री लेखिका सुनंदा आहे तर नंतरच्या काळाचे प्रतिनिधित्व नितीन रिंढे करत आहेत. दोघांपैकी एका वक्त्याने प्रत्यक्ष काळ लेखकासोबत जगलेला आहे तर दुसऱ्याने कादंबरी प्रकाराचा अभ्यास करून मोठ्या कालपटाचा शोध घेतलेला आहे. यामुळे मला वाटतं की, एक प्रकारे समतोल साधला जात आहे की, एका रेषेच्या अलीकडील आणि पलीकडील पिढीला ही कादंबरी कशी वाटली. आपापल्या स्थानावरून ते या कादंबरीचे कसे अवलोकन करतात, त्यांचे या कादंबरीबाबत काय भाष्य आहे हे आपल्याला कळणार आहे. मी दोघांची ओळख आत्ताच करून देते म्हणजे नंतर माझा विशेष अडसर रहाणार नाही.

सुनंदा भोसेकर. मला आठवतेय, एकदा एका कविसंमेलनात सुनंदाने कविता वाचल्या होत्या. इतरही अनेक कवयित्री तिथे होत्या. कमल देसाई, मला वाटते प्रेक्षकांमध्ये होत्या. सगळ्यांचे कवितावाचन झाले आणि प्रेक्षकात बसलेल्या कमल देसाईंनी माईक मागून घेतला आणि आतिषबाजी करावी अशा प्रकारे त्यांनी सुनंदाच्या कवितांची, त्यातल्या प्रतिमांची इतकी तारिफ केली की आम्ही अवाकच झालो. तशा सुनंदा आणि मी मैत्रिणी आहोत आणि शेजारी देखील आहोत. निंदकाचे घर असावे शेजारी अशी मी तिच्या कवितांची पहिली वाचक आणि कधीकधी निंदकही असते. पण तरीदेखील थोडे आपल्याच मैत्रिणीचे कौतुक करण्याचे दूषण पत्करूनही सांगते की तिची कविता कळायलाच एक वेगळे ट्युनिंग लागते. स्त्री असण्यापलीकडील माणूसवादी कविता, अत्यंत प्रतिभाशाली ओळी लाभणारी आणि सहजी प्राप्य नाही अशा प्रतिमांचे चकाकते विश्व बाळगणारी ती कवयित्री आहे असे म्हणता येईल. जितके सामाजिक, राजकीय भान तिच्या कवितेला आहे, तितकेच निसर्गाची नजाकत आणि सौंदर्य तिच्या कवितेत आहे. खूपच कवयित्री आहेत ज्या स्त्री असण्याची रेषा ओलांडून लिहितात. कवितेइतकाच लेखिका म्हणूनही

तिचा प्रवाह जोमदार आहे. तिचे दोन कविता संग्रह आहेत. 'अनोळखी प्रदेशात' आणि 'रे गोपाळा'. पुरस्कार मिळालेले आहेतच. आपल्याच कवितांना तिने अधिक न्याय द्यावा असे मी तिला वारंवार सांगत असते. असो. थांबते.

डॉ. नितीन रिंढे यांची ओळख करून देण्याआधी एक मोठा श्वास घेऊन थांबावे एवढा त्यांच्या कामाचा तपशील आहे. चेतना महाविद्यालयात डॉ. रिंढे हे प्राध्यापक आहेत आणि पीएचडी गाईड म्हणून २०१९ पासून मुंबई विद्यापीठाशी संलग्न आहेत. साहित्य आणि कथा सिद्धांत, साहित्याचा सांस्कृतिक इतिहास व आधुनिक मराठी साहित्याचा त्यांचा अभ्यास आहे. 'पंचवीस कविता', 'लीळा पुस्तकांच्या', 'पासोडी' ही त्यांची पुस्तके आहेत. 'लीळा पुस्तकांच्या' हे पुस्तकांविषयीचे पुस्तक आहे.रिंढे यांना अनेक महत्वाचे पुरस्कार मिळालेले आहेत.महाराष्ट्र साहित्य परिषद, डॉक्टरेटच्या थिसीस साठी प्रियोळकर पुरस्कार, रघुनाथ पुरस्कार, लोकमंगल पुरस्कार, महाराष्ट्र फाऊंडेशन पुरस्कार, असे अनेक पुरस्कार त्यांना मिळालेले आहेत. पण या सर्वात आजच्या प्रकाशित पुस्तकाच्या बाबतचा विशेष म्हणजे डॉ. नितीन रिंढे यांचा 'मराठी कादंबरी – पैस आणि परिघ' असा टिकात्मक प्रबंध आहे. मराठी कादंबरीवर इतका मोठा अभ्यास असलेल्या व्यक्तीकडून 'क्रोधे उत्पाटिला बळे' या प्रदीपच्या कादंबरीचे मराठीच्या अवकाशात असलेले स्थान आणि वैशिष्ट्य ऐकणे म्हणूनच औत्सुक्याचे ठरते. विविध पुस्तकात त्यांचे सामावलेले चॅप्टर्स, त्यांनी लिहिलेले शोध निबंध, आणि सेमिनार/कॉन्फरन्समधील त्यांचा सहभाग या विषयी मी माहिती देत राहिले तर एक वेगळा कार्यक्रम करावा लागेल. इतकी दमदार वाटचाल करणाऱ्या डॉ. रिंढे यांनी प्रदीप नंतर नुकतीच मराठी संशोधन मंडळाची संचालक म्हणून धुरा अंगावर घेतली आहे. त्यांच्या कार्यास शुभेच्छा देते आणि बोलण्यासाठी प्रथम सुनंदा भोसेकर यांना आमंत्रित करते

(सुनंदा भोसेकर यांचे भाषण.)

धन्यवाद सुनंदा. या नंतर मी डॉ. नितीन रिंढे यांना आमंत्रित करते.

(डॉ. नितीन रिंढे यांचे भाषण.)

धन्यवाद डॉ. नितीन रिंढे. दोघांनीही या कादंबरीचे विविध पैलू आपल्यासमोर उलगडून दाखवले.

लेखक डॉ. प्रदीप कर्णिक यांना मी मनोगत व्यक्त करण्यासाठी आमंत्रित करण्यापूर्वी कादंबरीची एक झलक म्हणून पुस्तकाच्या प्रस्तावनेतील काही भाग मी वाचून दाखवणार आहे. अर्थात वेळेचे भान ठेवूनच. डॉ. रमेश वरखेडे यांची प्रस्तावना दीपस्तंभासारखी कादंबरीला प्रकाश दाखवत राहील.

(वरखेडे यांच्या प्रस्तावनेतील काही भाग.)

ओम शांती !

आम्ही दोघी या कादंबरीच्या समारंभात आहोत असे एका मैत्रिणीला कळले तर तिने फोन करुन विचारले की हनुमानाच्या आयुष्यावरील पौराणिक कांदबरीच्या व्यासपीठावर तुम्ही काय करणार आहात? तिला वाटले की मारुती स्तोत्रातील ही ओळ म्हणजे ही मारुती विषयक कादंबरी आहे. असो !

मला स्वतःला ही कादंबरी एखाद्या आरसेमहालासारखी वाटली. आत शिरलो की बाहेर पडायला दार मिळत नाही. एकच व्यक्ती कधी उभी, आडवी,जाड, बारीक, तिरकी वाटते आणि गोंधळाची अवस्था होते. कादंबरी फॉर्मच्या सगळ्या रूढ चौकटींना धक्के मारण्याचे काम ही कादंबरी करते. क्रोध हा केंद्रबिंदू आहे.

इतका क्रोध माणसाच्या मनात का जागा व्हावा याचा शोध घेताना गांधीजींमुळे अहिंसेचे तत्वज्ञान आपल्याला फुकटात मिळाले म्हणून आपल्याला त्याची किंमत नाही हे प्रदीप सांगून जातो.
तर आपले मनोगत व्यक्त करण्यासाठी मी प्रदीपला आमंत्रित करते.

(प्रदीप कर्णिक यांचे मनोगत.) (संपताना वेळ ६.३०)

प्रदीप म्हणाला त्या प्रमाणे साहित्य संस्कारांच्या बाबत माझे वडील रवींद्र माधव दुर्वे यांचा खोलवर ठसा आमच्या कुटुंबातील आणि विशेषत: आमच्या पिढीतील अनेकांवर आहे. जेंव्हा आमचा जन्मही झाला नव्हता तेंव्हा ते सत्यकथेचे प्रतिथयश कवी होते. त्यांच्यामुळे आम्ही सत्यकथा स्टँडर्डलाच परिचित झालो आणि कमी अधिक प्रमाणात लिहिते-वाचते झालो. ३ डिसेंबर ही माझ्या वडिलांची पुण्यतिथी. त्याच डिसेंबर महिन्यात, मौजतर्फे प्रदीपचे पुस्तक प्रकाशित व्हावे हा धागा कुटुंबातील सत्यकथेचे कवी रवींद्र दुर्वे ते मौजेचा लेखक प्रदीप कर्णिक असा जोडला गेला आहे. जसा विहिरीचा संदर्भ मघाशी संगीताला तसाचा हाही जोडला गेलेला एक बिंदू.

' किती उंची गाठली या पेक्षा किती गर्तेतून वर आलो' वडिलांच्याच कवितेतील एक ओळ आहे. आज मौजपर्यंत पोचलेल्या प्रदीपचा प्रवास किती खोलातून सुरु झालेला आहे हे मला माहिती आहे. आणि म्हणूनच याचे मोल खूप अधिक आहे. कॉलेजमध्ये साधा मराठी विषय घेण्यासाठी देखील त्याला अनेकांना राजी करावे लागले होते, इथपासून रुपारेल कॉलेजमधील ग्रंथपाल ते मराठी संशोधन मंडळाचा संचालक या पदापर्यंतचा प्रवास आणि त्याचे स्वतःचे वेळोवेळचे शारीरिक अडथळे... हा प्रवास सोपा नव्हता. या ताज्या कादंबरी व्यतिरिक्त नाटके, व्यक्तिचित्र, ग्रंथसमीक्षा, संपादित पुस्तके, या विविध प्रांतात त्याने केलेल्या मुशाफिरीची यादी मोठी आहे. मराठी संशोधन मंडळाची धुरा अंगावर घेतल्यापासून त्याने जिद्दीने अंकाचे रंगरूप बदलून टाकले. 'महाराष्ट्राचा मानबिंदू : मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय' हा त्याच्या डॉक्टरेटच्या प्रबंधाचा विषय होता. आज मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्याच सभागृहात त्याची कादंबरी प्रकाशित होत आहे. हा देखील मानबिंदूच आहे.

आता अध्यक्षीय भाषणासाठी मी सासणेसरांना निमंत्रित करते. खरं तर त्यांची ओळख करून देण्याचे धारिष्ट मी करू नये. प्रसासकीय सेवेत उच्च अधिकारी पद भूषवणारे आणि जिल्हाधिकारी बीड या पदावरून निवृत्त झालेले भारत सासणे यांची ग्रंथसंपदा आणि एकूणच साहित्यनिर्मिती इतकी मोठी आहे की, स्तिमित व्हायला होते.या परस्पर भिन्न अशा टोकांना एवढ्या उंचीवर तोलणारा त्यांचा अंत:स्त्रोत किती अफाट ताकदीचा असेल ! 'जॉन आणि अंजिरी पक्षी' पासूनचे आठ दहा लघुकथा संग्रह , 'बाबीचे दु:ख', 'दाट काळा पाऊस', 'अदृष्ट' 'त्वचा' सारखे दीर्घकथा संग्रह,... मी सगळीच नावं घेत नाही... बालसाहित्य, नाटक, एकांकिका, कादंबरी – 'दूर तेथे दूर तेंव्हा, 'सर्प', ललित संग्रह, अनुवादित साहित्य, आणि आगामी या सदरात मोडणारी अनेक पुस्तके. प्रमुख वाङ;मयीन पुरस्कार म्हणून त्याच्च्या नावावर ३७ पुरस्कार आहेत. महाराष्ट्र शासनानेच त्यांना सातवेळा पुरस्कार दिलेला आहे. ज्यांच्या कर्तुत्वाने दिपून जावे असे ज्येष्ठ साहित्यकार म्हणून सासणे सर आपल्या सगळ्यांना परिचित आहेत. २०२२ सालच्या म्हणजे यंदाच्या,९५ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ते भूषवित आहेत. तर यापूर्वी २०१० सालच्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. २०१४ सालच्या मराठवाडा साहित्य संमेलनाचेही ते अध्यक्ष होते.उदगीरचे सरांचे या वर्षीचे भाषण मी काल-परवा ऐकत होते. सद्यस्थितीचे

दबलेपण, अस्वस्थपण, हिंसा... मग ते मनातली असो, कुटुंबातील असो किंवा समाजातली असो या विषयी लेखकाने बोलले पाहिजे. त्याने सत्याचा शोध घेतला पाहिजे, आणि ठामपणे सत्याकडे आणि भयहीनतेकडे जायला हवे हे त्यांनी त्या व्यासपीठावरून शांत स्वरात पण विस्तृतपणे सांगेतले आहे.

मजा अशी की क्रौर्य आणि करुणा दोन्ही शब्द क या अक्षरानेच सुरु होतात. पण करुणेला अंत नाही, पर्याय नाही, आणि क्रौर्याला फार काल अस्तित्व नाही. सत्याइतके बळ कशातच नाही. आणि अहिंसेच्या महाप्रचंड ताकदीची या भय पैदा करू पाहणाऱ्या खुज्या लोकांना माहितीच नाही. असो.

हिंसा-अहिंसा याचा उहापोह करू पाहणाऱ्या या कादंबरीविषयी सासणेसर काय म्हणताहेत हे ऐकायला आम्ही सगळेच उत्सुक आहोत.

(श्री भारत सासणे यांचे भाषण.)

धन्यवाद सर.

कार्यक्रमाच्या समाप्तीकडे जाताना मी आभार प्रदर्शनासाठी मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या श्रीमती उमा नाबर यांना पाचारण करते.

(आभार प्रदर्शन)

समाप्ती... इतका सुंदर कार्यक्रम संपला आहे असे जाहीर करताना मी सगळ्यांना चहापानाची आठवण करून देते आणि हो, आठवणीने आजच्या सवलतीच्या दारात कादंबरी विकत घ्या. आणि वाचा. आपला अभिप्राय प्रदीपला जरूर कळवा सांगते. धन्यवाद.

नमुना संहिता -४

पुढे दिलेली संहिता ही रेडिओवरून प्रसारित झालेल्या कार्यक्रमाची संहिता आहे, जर रेडिओवर निवेदक म्हणून काम करण्याची संधी मिळाली तर तिथे निवेदकाची भूमिका कशी वठवायची हे यावरून तुमच्या लक्षात येईल. तिथे वेळेची मर्यादा असते त्यामुळे निवेदन संक्षिप्त स्वरूपात लिहिलेले आहे हे लक्षात घ्यावे. जर हाच कार्यक्रम प्रेक्षकांच्या उपस्थितीत करायचा असेल तर हे निवेदन विस्तृत लिहायला संधी आहे. तर ते निवेदन बघुयात.

कार्यक्रमाचे नाव आहे – आठवणीच्या हिंदोळ्यावर

नमस्कार, आपण ऐकत आहात १००.७ एम. एच. वर आकाशवाणी मुंबई केंद्राची एफ.एम. गोल्ड वाहिनी. आठवणीच्या हिंदोळ्यावर या कार्यक्रमात मी तेजस्विनी सिंग आपल्या सगळ्यांचं मनापासून स्वागत करते. 'एकटी', 'गोरा कुंभार', ' पाहु रे किती वाट', ' पुत्र व्हावा ऐसा', ' घरकुल, ' असे एकाहून एक सरस चित्रपट दिग्दर्शित करून मराठी रसिकांच्या मनावर कायमचा ठसा उमटवणारे दिग्दर्शक 'राजा ठाकूर ' यांच्या आठवणींना आज आपण उजाळा देणार आहोत.

(गाणं – सैनिक हो तुमच्या साठी... चित्रपट- पाहू रे किती वाट)

राजा ठाकूर यांचा जन्म २६ नोव्हेंबर १९२३ रोजी झाला होता. त्यांचे वडील पोलीसखात्यात होते. पण त्यांना नाटकांचा छंद होता. गंधर्व कंपनीच्या मुंबईतल्या पहिल्या प्रयोगाला ते आवर्जून जात असत. ते येताना त्या नाटकाचं पुस्तक विकत आणत असत. त्यांच्या कपाटात नाटकाची पुस्तकं हमखास असायची.

वडील नाटकाला जाताना राजा ठाकूर आणि त्यांचे मोठे बंधू दादा ठाकूर यांनाही बरोबर घेऊन जात असत. आपल्या लहानपणीच्या आवडीचा त्यांनी चित्रपटासाठी चांगला उपयोग करून घेतला.

(गाणं - प्रथम तुज पाहता...चित्रपट – मुंबईचा जावई)

वडिलांच्या नाट्य आणि संगीत प्रेमामुळे त्यांना असे वाटत असे की, आपल्या मुलांनी दुसऱ्याची नोकरी करू नये. सरकारी नोकरीत जाऊ नये. मुलांनी काहीतरी कलागुण वाढवावेत. वडिलांनी राजा ठाकूर यांना त्याचं संगीत आणि नाट्यप्रेम पाहून एक उत्तम हार्मोनियम आणून दिली होती. त्यांच्यासाठी एक संगीत शिक्षकही ठेवला होता. त्याचा परिणाम त्यांच्या चित्रपटातील संगीतावर जाणवल्याशिवाय राहत नाही.

(गाणं – आज कुणीतरी यावे....चित्रपट- मुंबईचा जावई)

राजा ठाकूर ह्यांना त्यांच्या वडिलांनीच 'देशबंधू नाटक मंडळी'त नेऊन पोहोचवलं होतं. पण नाटक कंपनीत आपल्याला वाव नाही हे ओळखून ते पुढं 'नवयुग ' मध्ये आले. तिथे काहीकाळ काम केल्यावर ते मास्टर विनायक यांच्याबरोबर काम करू लागले. मास्टर विनायक यांच्या 'चिमुकला संसार', 'माझं बाळ', 'गजाभाऊ' इत्यादी चित्रपटासाठी सहायक म्हणून अनुभव घेतल्यावर राजा ठाकूर पुन्हा 'नवयुग' मध्ये संकलक म्हणून आले. पुढे १९५३ नंतर राजा ठाकूर यांची दिग्दर्शक म्हणून कारकीर्द खऱ्या अर्थाने सुरू झाली.

(गाणं – हे राष्ट्र देवतांचे... चित्रपट- घरकुल)

'बोलविता धनी' हा राजा ठाकूर यांनी १९५३ साली दिग्दर्शित केलेला पहिला चित्रपट. त्या चित्रपटापासून सुरु झालेली त्यांची दिग्दर्शकीय कारकीर्द १९५५-५६ पर्यंत कळसाला पोहोचली होती. 'मी तुळस तुझ्या अंगणी' साठी त्यांना राष्ट्रीय पारितोषिक मिळालं होतं. तो त्यांनी दिग्दर्शित केलेला केवळ तिसरा चित्रपट होता.

(गाणं – मलमली तारुण्य माझे....चित्रपट –घरकुल)

एक दिवस विनोदी नट धुमाळ यांनी एका गायक नटाची कथा अण्णा माडगुळकर आणि राजा ठाकूर यांना ऐकवली. त्या गायक नटाला स्वतःची कंपनी नीट चालवता येत नाही. अशा वेळी एक तमासगीर बाई त्या गायक नटाच्या गाण्यावर लुब्ध होऊन त्याचं शिष्यत्व मिळावं म्हणून विनंती करते. 'मला तुमच्या कंपनीत घ्या.' अशी मागे लागते. गायक नट विचार करतो की, हिला घेतल्याने आपल्या कंपनीला आपण आर्थिक संकटातून बाहेर काढू शकू. अण्णांनी कथा ऐकल्यावर एकदम पसंतीची टाळी दिली. त्यांच्यातला शीघ्रकवी जागा झाला. त्यांनी समोरच्या कागदावर ओळी लिहिल्या....

(गाणं – माझ्यासाठी बोल ना लावील तुला राजसा कुणी... चित्रपट- मी तुळस तुझ्या अंगणी..)

१९६१ मध्ये राजा ठाकूर यांनी 'पुत्र व्हावा ऐसा' हा चित्रपट दिग्दर्शित केला. या चित्रपटात त्यांनी तीन बालकलावंतांकडून स्वाभाविक वाटतील अशी कामं करून घेतली. 'पुत्र व्हावा ऐसा' हा चित्रपट तांत्रिक दृष्ट्या वाखाणण्यासारखा आहे. वसंत प्रभू याचं संगीत, तलत महमूद यांनी गायलेली दोन गाणी ही ह्या चित्रपटाची वैशिष्ट्ये आहेत. 'सुमन कल्याणपूर' यांनी गायलेलं 'जिथे सागरा धरणी मिळते, तिथे तुझी मी वाट पहाते' हे गाणं आज ही ऐकायला छान वाटतं. मग ऐकुयात तेच गाणं.

(गाणं- जिथे सागरा धरती मिळते...चित्रपट- पुत्र व्हावा ऐसा.)

पुढे 'रंगल्या रात्री अशा' या चित्रपटात राजा ठाकूर यांनी लावण्या, नाट्यगीतं, गझल, आणि भजन या सगळ्या प्रकारांना एका कथासूत्रात ओवलं असल्यानं संगीताची एक मेजवानीच रसिकांना लाभली. त्यातलं 'मला हो म्हणतात लवंगी मिरची' आणि 'धनी तुमचा आणि माझा एक काढा फोटू' या लावण्या सुलोचना चव्हाण यांनी खास लावणीच्या आदाकारीने गायल्या होत्या.

(गाणं – मला हो म्हणतात लवंगी मिरची.... चित्रपट- रंगल्या रात्री अशा)

मित्रांनो, आज आपण राजा ठाकूर यांच्या चित्रपटातील गाणी ऐकलीत. 'आठवणीच्या हिंदोळ्यावर' हा कार्यक्रम संपला. पुन्हा भेटूयात पुढच्या कार्यक्रमात. नमस्कार.

****

हा रेडिओवरील कार्यक्रम असल्याने त्याला वेळेची मर्यादा होती. पण प्रत्यक्ष मंचावर ही कार्यक्रम होणार असेल तर प्रत्येक गाण्याविषयी अधिक बोलता येईल. त्या चित्रपटाच्या वेळचे किस्से सांगता येतील. आणि तो कार्यक्रम अधिक रंगतदार करता येईल. तशी संहिता लिहून पहा.

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) सुरुवातीला मंचावरील आणि कुणाचे स्वागत केले आहे?

२) ते स्वागत करताना कोणत्या गोष्टीची काळजी घेतली आहे?

३) एखादी वरिष्ठ मान्यवर व्यक्ती उशिरा आली तर कोणती खबरदारी घेतली पाहिजे?

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

Honoured : सन्मानित

Over whelmed : भारावून गेलेला

Seniority order : वरिष्ठता क्रम

Authority : अधिकार

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

स्वयं-अध्ययन प्रश्न-१

१) सुरूवातीला मंचावरील आणि सभागृहातील उपस्थित असलेल्या मान्यवरांचे स्वागत केलेले आहे.

२) ते स्वागत करताना वरिष्ठता क्रम पाळला गेलेला आहे.

३) एखादी वरिष्ठ मान्यवर व्यक्ती उशिरा आली तरी जेंव्हा संधी मिळेल तेंव्हा तिचे स्वागत आठवण ठेऊन केले पाहिजे.

४.५ सारांश

आपण या घटकात काही नमुना निमंत्रण पत्रिका बघितल्या. त्या नंतर तीन संहिता बघितल्या. त्या प्रत्यक्ष कार्यक्रमाच्या संहिता होत्या. त्यावरून आपण काही निरीक्षणे नोंदवली. त्यावरून आपल्या लक्षात आले असेल की, सूत्रसंचालन हे किती जबाबदारीने करायचे काम आहे. त्यासाठी आपले निरीक्षण, वाचन आणि अभ्यास वाढवला पाहिजे.

४.६ सरावासाठी स्वाध्याय

वर नमुना पत्रिका या सदरात ५ व्या क्रमांकाची पत्रिका छापलेली आहे. पण तिच्या बाबतचे कोणतेही भाष्य केलेले नाही. ती बघून त्याची संहिता लिहायची असेल तर काय केले पाहिजे? कोणती कोणती तयारी केली पाहिजे? याची नोंद करा. आणि संहिता लिहून पहा.

४.७ क्षेत्रीय कार्य

आपल्या परिसरात आयोजित केलेल्या सामाजिक अथवा सांस्कृतिक कार्यक्रमांना भेट द्या . आयोजित केलेल्या कार्यक्रमाची कार्यक्रम पत्रिका मिळवा. अशा प्रकारचे कार्यक्रम आपण आयोजित करत आहोत या भूमिकेतून त्याची तयारी कशी कराल याविषयी कराव्या लागणाऱ्या कृतींची सविस्तरपणे नोंद करा.

४.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) केळुस्कर महेश, माझा आवाज, अनघा प्रकाशन, ठाणे.
२) लागू श्रीराम, वाचिक अभिनय, राजहंस प्रकाशन, पुणे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२
दूरध्वनी क्र.(०२५३) २२३१४७५, २२३१७१४
Website : https ://ycmou.digitaluniversity.ac www.ycmou.ac.in

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

प्रत्याभरण

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाची तसेच त्यातील पुस्तकांची रचना, काठिण्य पातळी, भाषाशैली, विषय-विवेचन, स्वयं - अध्ययन प्रश्न, यासंदर्भात सूचना तसेच अभिप्राय असल्यास पुढील पत्यावर किंवा खाली दिलेल्या ई-मेलवरून कळवावी.

संपर्कासाठी पत्ता

संचालक, मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखा

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक - ४२२ २२२

ईमेल : marathi.shu@ycmou.ac.in किंवा dir.shu@ycmou.ac.in

(१) संपूर्ण नाव : _____

(२) संपूर्ण पत्ता : _____

(३) मोबाईल क्र. : _____ ईमेल : _____

(४) शिक्षण : _____ हुद्दा : _____

(५) अभिप्राय /सूचना : _____

_____

(i) अभ्यासक्रमाची रचना : _____

_____

(ii) काठिण्य पातळी : _____

_____

(iii) भाषाशैली : _____

_____

(iv) विषय विवेचन : _____

_____

(v) इतर : _____

_____